१८ जानेवारी १९६९ । ४० पैसे

# माणूस

साप्ताहिक

माझं समाधान व्हायला अजून खूप
अवकाश आहे...फार वेळ आहे......

**मोगूबाई कुर्डीकर**



# यापुढील अंकी

सैनिकांप्रमाणे शास्त्रज्ञही बहुधा आयात वा निर्यात करता येत नाहीत, असे डॉ. भाभा म्हणाले होते.

गेली वीस वर्षे आपल्याकडे मात्र हाच उद्योग जोरात सुरू आहे. यामुळे आपली प्रगती होत आहे. आपण ' वैज्ञानिक ', 'आधुनिक' वगैरे जगात प्रवेश करीत आहोत, अशी आपल्यापैकी बहुतेकजणांची ठाम समजूत आहे.

या समजुतीला एक लहानसा धक्का गेल्याच वर्षी ' अन्न-स्वतंत्रता संचलना 'ने दिला. काही नामवंत शास्त्रज्ञांच्या मुलाखतींमुळे या समजुतीला आणखी एक धक्का बसेल.

**शास्त्रज्ञांच्या या मुलाखती ' माणूस 'च्या यापुढील २६ जानेवारी अंकात प्रसिद्ध होत आहेत.**
**मुलाखतींचे संयोजन : दत्तप्रसाद दाभोळकर.**

समारोपाच्या मुलाखतीत विज्ञानक्षेत्रात हिमालयाएवढे काम केलेले वयोवृद्ध डॉ. कृ. श्री. नरगुंद यांनी सांगितले आहे, " आयुष्यभर साध्या सैनिकाची भूमिका मी पार पाडत आलो. आणि शेवटी तीच माझी आवडती भूमिका आहे. कृपया पुन्हा माझ्या मुलाखती घेण्यालाही येऊ नका. तुमच्यात आणि माझ्यात दोन-तीन पिढ्यांचे अंतर आहे.

**कव्हर पान ३ पाहा**

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : चौतिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न.

'माणूस'च्या अंकातील श्री. गोपाळ दुरवंडे यांचे पत्र वाचले. 'माणूस' मधून आजपर्यंत कोणावरही चिखलफेक झालेली नाही. माझ्याकडून 'युक्रान्द'वर चिखलफेक झाली आहे, हे दुरवंडेनी मला पटवून दिल्यास मी दिलगिरी व्यक्त करावयास तयार आहे. मात्र लोकशाहीत वस्तुस्थितीचे दिग्दर्शन आणि मतभिन्नता म्हणजे चिखलफेक समजली जात नाही. त्यासाठी श्री. दुरवंडेना माझ्या सबंध अहवालात एक तरी विधान खोटे वा चूकीचे आहे हे दाखवून द्यावे लागेल.

दुरवंडे प्रि. शहांचा हवाला देतात म्हणून सांगतो. माझे आणि शहांचे अनेक बाबतीत कडवे मतभेद आहेत. पण अहवाल म्हणून, हा अहवाल योग्य व चांगला आहे असे शहांचे मत आहे ! अजूनही, दुरवंडेंना माझ्या लेखातील 'खोटारडी' विधाने मला दाखवायची असल्यास, ते सांगतील त्या वेळी, प्रि. रेगे, प्रि. शहा, वा डॉ. राणे यापैकी कोणाच्याही घरी येऊन, माझ्या विधानांचा खरेपणा श्री. दुरवंडेंना पटविण्यास मी तयार आहे. 'माणूस'च्या व्यासपिठाला माझ्याकडून कमीपणा आला असा गैरसमज होऊ नये म्हणून हे पत्र लिहित आहे.

**दत्तप्रसाद दाभोळकर, गोरेगाव**

मूल्य ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

सु. ल. सोमण

# नूतन_वर्षाचे संकल्प !

नववर्षदिनी पंतप्रधानांनी राजधानीत वार्ताहरांना मुलाखत दिली. ह्यापूर्वी जवळजवळ वर्षांपूर्वी पंतप्रधान श्रीमती गांधींनी वार्ताहरांना मुलाखत दिली होती. एका पत्रकाराने वर्णन केल्याप्रमाणे श्रीमती गांधी यंदाच्या मुलाखतीत सर्वच प्रश्नांवर अधिक आत्मविश्वासाने बोलत होत्या—मग प्रश्न आर्थिक असोत, राजकीय असोत की आणखी कोणते असोत—त्यांनी ह्या मुलाखतीत अनेक प्रश्नांना उत्तरे दिली. त्यांनी हाताळलेल्या प्रश्नांत भारताचे आर्थिक प्रश्न होते, चौथी पंचवार्षिक योजना होती, विभिन्न राष्ट्रांबरोबरच्या आर्थिक-औद्योगिक सहकार्याचे प्रश्न होते, जयप्रकाश व राजाजींच्या सूचनांचे परामर्ष होते, भारताचे परराष्ट्र धोरण होते, मध्य आशिया होता आणि पत्नीला मारहाण करावी की नाही हाही प्रश्न होता ! आर्थिक बाबींबर त्या बऱ्याच आशावादी दिसल्या; तर मध्यावधी निवडणुकांतील काँग्रेसच्या यशाबाबतही निश्चित दिसल्या ! तद्वतच काही उणीवांचीही त्यांनी जाणीव असल्याचे दाखवून दिले. "१९२६ मधील काँग्रेसच्या स्वातंत्र्याच्या ठरावाची खरीखुरी अंमलबजावणी अजून आपणांला करावयाची आहे" असे सांगून त्यांनी प्रांजलपणे कबूल केले की अद्यापही बहुसंख्य जनतेपर्यंत खरेखुरे स्वराज्य, स्वातंत्र्य पोचलेले नाही; आणि त्यासाठी निर्णायक पावले टाकावयाचा संकल्प त्यांनी सोडला. स्वातंत्र्यप्राप्तीला वीस वर्षे लोटली तरीदेखील पंतप्रधानांना असे म्हणावे लागते ही परिस्थिती खरोखरीच शासनाला, मान्यवर नेत्यांना, सत्ताधारी व विरोधी पुढाऱ्यांना लाजिरवाणी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचे झपाट्याने औद्योगीकरण सुरू झाले, मोठमोठ्या योजना क्वचित् कुवतीबाहेरच्याही राबवल्या गेल्या. प्रचंड पाश्चात्य कर्जांची ओझी जनतेवर लादली गेली. शेतीकडे अक्षम्य दुर्लक्ष्य झाले. प्रमाणाबाहेर चलनफुगवटा झाला. आणि परिणामत: सामान्य जन महागाईने त्रस्त झाला. मध्यंतरीच्या काळात राष्ट्रीय उत्पादनात—दरडोई उत्पन्नात, वाढ झाल्याचे सरकारी पत्रके सांगू लागली. उत्पन्न वाढले उत्पादनात वाढ झाली, पण जादा फायदे मिळाले ते वरच्या वर्गालाच आणि दोन समाजांच्या आर्थिक पातळीतली तफावत एवढी वाढली की सामान्य जनता, समाजवादाचे घडे गिरवता गिरवता वरिष्ठ आर्थिक पातळीतल्या समाजाकडून पूर्वीपेक्षाही जास्त पिळली जाऊ लागली. ह्या असह्य परिस्थितीतूनच मधून मधून उद्गार ऐकू येऊ लागले, ह्यापेक्षा ब्रिटिश आमदानीतले दिवस चांगले होते ! आणि ह्या लाजिरवाण्या उद्गारांबद्दल सर्वांत जास्त जबाबदार शासनालाच धरले पाहिजे ! शासनकर्त्यां

काँग्रेसमुळे हा धनिक समाज आपापली आर्थिक साम्राज्य सतत विस्तारीतच राहिला आणि त्यांच्या गुलामगिरीत सामान्य समाज भरडला जाऊ लागला. काँग्रेसपाठोपाठ अन्य विरोधी नेतेही काही प्रमाणांत ह्या परिस्थितीला जबाबदार होते. भांडवलदार समाजाकडून निवडणूक प्रचारार्थ देणग्या मिळवणाऱ्या पक्षांनी सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने भरीव प्रयत्न मात्र केले नाहीत! कामगारांचे नेतृत्व सांगणाऱ्यांनीही स्वतःचे पक्षीय हित राबवण्यासाठी त्यांच्यातल्या व सामान्य जनतेतल्या असंतोषाचा गैरफायदा उचलण्यापलीकडे काहीही विधायक कार्य केले नाही. सामान्य जनांच्या निव्वळ हिताच्या दृष्टि-कोणातून फारच थोडे कार्य झाले!

आजपर्यंत केंद्रीय नेते ह्याबाबत 'आलबेल'च्या व समाजवादाच्या आरोळ्या ठोकत होते! परंतु सेक्युलॅरिझम, राष्ट्रीय एकात्मता, समाजवादी लोकशाही समाज वगैरे लंब्याचवड्या शब्दांची पखरण न लावता प्रधानमंत्र्यांनी अवघ्या एक-दोन वाक्यांत जनसामान्यांची तळमळ बोलून दाखवली व इतर काही भल्या मोठ्या तात्त्विक सिद्धांतांचे संकल्प न सोडता स्वराज्याची जाणीव खऱ्याखुऱ्या अर्थाने प्रत्येक भारतीयात निर्माण करण्यासाठी पावले टाकायचा नवीन वर्षाचा संकल्प सोडला हे फार चांगले झाले! परंतु नुसते संकल्प सोडून ते सिद्धीस न्यायच्या योजना सादर न केल्या गेल्यास त्यांचा काय फायदा? आजचे प्रश्न आहेत: अन्न-स्वतंत्रता, दोन समाजांतली भयानक विषमता कमी करणे आणि प्रत्येक भारतीयाचे राष्ट्रीय शिक्षण! ह्यांच्या काही निश्चित योजना आखल्या गल्या पाहिजेत, जन-सामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्या राबवल्या गेल्या पाहिजेत—त्यासाठी वेळी देणग्या देणाऱ्यांविरुद्ध कडक पावले उचलावी लागतील! ह्या प्रश्नापुढे सेक्युलॅरि-झम्, जातीय वैमनस्य, भाषिकवाद, राष्ट्रीय एकात्मता वगैरे प्रश्न क्षुल्लक आहेत! हे प्रश्न रिकाम्या पोटी नव्हे, भरल्या पोटी हाताळायला हवेत!! सत्ताधारी व विरोधी दोन्ही नेत्यांनी ही जबाबदारी संयुक्तपणे उचलायला हवी.

ह्याच परिषदेत श्रीमती गांधींनी भारत—चीन प्रश्नाचादेखील उल्लेख केला. श्रीमती गांधी सध्या स्वतःच परराष्ट्र खाते सांभाळत असल्यामुळे त्यांच्या ह्या प्रश्नावरील मताला बरीच प्रसिद्धी मिळाली. श्रीमती गांधींनी चीनबरोबर पुन्हा बोलणी होऊ शकतील व पुनश्च मित्रत्वाचे संबंधही प्रस्थापित होऊ शकतील—कोलंबो तत्त्वानुसार किंवा अन्य कुठल्याही तत्त्वानुसार—असे ह्या परिषदेत घोषित केले. तसा प्रयत्न करताना भारताची प्रतिष्ठा राखली जाईल व चीनने गिळंकृत केलेल्या प्रदेशाचाही विसर पडू दिला जाणार नाही हेही त्यांनी निश्चित स्वरूपात सांगितले. भारताच्या ह्या सूचनेचे स्वागत चीन कसे करील? भारताच्या सामर्थ्या-विषयी काही खात्री पटल्याशिवाय चीन ह्या सूचनेला प्रतिसाद देईल का? कुणी सांगावे, तसा प्रतिसाद कदाचित चीन देईलही! बदलत्या राजकारणाचे रंग जर

कदाचित चीन ओळखत असला व त्याबरोबर बदलण्याचे त्याने ठरवले असले तर कदाचित् चीन भारताबरोबर वाटाघाटी करीलही. एकतर वासष्टच्या पराभवानंतर भारताचे सामर्थ्य निश्चितपणे वाढले आहे. आणि काही अंशी जागतिक राजकारणात एकाकी पडलेल्या चीनलाही भारतीय सीमेवर असंतोष घुमसत राहणे फारसे फायद्याचे राहणार नाही. शिवाय ज्या इराद्याने चीनने भारताची सीमा पेटती ठेवून भारताच्या विकासात खीळ घालायचा प्रयत्न केला त्यातही चीन फारसा यशस्वी झालेला नाही. पाकिस्तानला अमेरिकन वर्तुळातून खेचून काढण्यातही त्याला यश आले नाही. फार काय, चीनच्या धोरणामुळे उपखंडातल्या प्रश्नात रशियानेही प्रवेश केला. आज रशियाला शह द्यायच्या दृष्टिकोणातूनच चीनने अमेरिकेशी बोलणी सुरू करायचा प्रयत्न चालवला आहे. कदाचित् त्याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून व एकंदर आतापावेतोच्या धोरणाने चीनचाही फारसा फायदा झालेला नसल्याने चीन कदाचित भारतविषयक धोरणाचा फेरविचार करील व श्रीमती गांधींच्या सूचनेला प्रतिसाद देईल असे वाटते. शिवाय चीनने जागतिक राजकारणात बड्या दोघांशी स्पर्धा करायचे ठरवलेले असल्याने त्याला आपले धोरण बदलून भारताशी मैत्री करायची इच्छा असल्यास काही वावगे नाही. कदाचित बदलत्या परिस्थितीची ही जाणीवच श्रीमती गांधींनी व्यक्तविली असावी. अर्थात नवीन मैत्रीच्या अपेक्षेत असताना जुने अनुभव दिल्ली विसरू शकणार नाहीच! चीनच्या धोरणात कदाचित बदल होईलही, असे वाटायला लावणारी घटना, श्रीमती गांधींच्या वरील वक्तव्यानंतर अवघ्या दोनच दिवसांत घडली. नेपाळातल्या सनकोसी प्रकल्पाच्या भागात हिंडणाऱ्या भारतीयांविषयी चिंता करू नका अशा सूचना त्या भागात काम करणाऱ्या चिनी तंत्रज्ञांना व कामगारांना देण्यात येतील व यापुढे त्या भागात येणाऱ्या जाणाऱ्या भारतीयांना त्रास होणार नाही, असे आश्वासन काठमांडूतील चिनी चार्जे–द. अफेअर्सनी नेपाळच्या परराष्ट्रखात्याला दिले असल्याचे वृत्त आहे. एक्स्प्रेस गटाचे पत्रकार श्री. फ्रँक मोराईस ह्यांना आठ–पंधरा दिवसांपूर्वी ह्याच भागात चिनी कामगारांनी त्रास दिला होता. एरवी नेहमीच्या आडमुठेपणे वागणाऱ्या चिन्यांच्या ह्या आश्वासनाचा अर्थ प्रतिसादाची सुरुवात असा घ्यायचा का? सावधपणाने व भारतीय प्रतिष्ठेला बाध न येता चीनशी मैत्री घडून येत असेल तर तिचे स्वागतच व्हायला पाहिजे! शत्रुत्व असतानाही, चीनने कुठल्याही फारशा मदतीशिवाय साधलेल्या प्रगतीचे, एक महत्त्वाची आंतरराष्ट्रीय शक्ती म्हणून मिळविलेल्या स्थानाचे–राष्ट्रीय दृष्टिकोणातून चिंतन, मनन आवश्यक आहे! मैत्रीच्या धाग्यातून ते अधिक योग्यपणे करता येईल व शिवाय रूसो-पाक शस्त्रसंबंधांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला शह देता येईल! अर्थात ह्या दृष्टीने पावले टाकताना १९६२ चा इतिहास नेहमी नजरेसमोर ठेवायला पाहिजे, हे पुन्हा सांगायला नकोच!

# मध्यपूर्वेतील दुष्टचक्र

बैरुत विमानतळावर इस्रायली विमानांनी झंझावती हल्ला केला आणि विमानतळावरची चौदा विमाने जागच्या जागी उद्ध्वस्त केली. हल्ला करणारी इस्रायली जेटस्, कुठल्याही विरोधाशिवाय आणि इस्रायलींच्या कुठल्याही नासधुशीशिवाय सुखरूप परतली. युनोत अर्थातच ह्या घटनेचे पडसाद उठले आणि सुरक्षा समितीत, कदाचित् इस्रायल-अरब संघर्षाच्या संपूर्ण काळात प्रथमच, इटलीचा अपवाद वगळता इस्रायलचा एकमताने निषेध करण्यात आला आणि इस्रायलने ह्यापुढे काही शांततेला घातक हालचाल केल्यास त्याविरुद्ध कृती करण्याची तंबी सुरक्षा समितीने इस्रायलला दिली. सुरक्षा समितीच्या ह्या धमकावणीला इस्रायलने फारशी भीक घातली नाही आणि दुसऱ्याच दिवशी, जॉर्डन सीमेवरून होणाऱ्या कमान्डोरेड्सच्या प्रत्युत्तरात इस्रायलने जॉर्डनमधील तळावर नापाम बॉम्ब्स टाकले. ह्या सर्व प्रकरणामुळे मध्यपूर्वेतले वातावरण जास्तच स्फोटक बनले आहे. बैरुत प्रकरणात लेबॅनॉनचे माजी परराष्ट्रमंत्री फुआद बुत्रोस ह्यांनी सुरक्षा समितीत बोलताना सांगितले की इस्रायलची कुठलीही आगळीक केलेली नसताना इस्रायलने हे बेछूट आक्रमण केले आहे. 'अल् फतेह' ह्या निर्वासित अरबांच्या दहशतवादी संघटनेच्या सभासदांना लेबॅनॉन आसरा देतो किंवा त्यांना लेबॅनॉनमध्ये शिक्षण मिळते, ह्या इस्रायली आरोपांचाही त्यांनी साफ इन्कार केला. इस्रायलचे परराष्ट्रमंत्री अबा एबन त्यांनी आपली भूमिका समजावून देताना अरब दहशतवाद्यांनी अथेन्सच्या विमानतळावरील इस्रायली विमानावर केलेल्या हल्ल्यांचा निर्देश केला होता व केवळ आक्रमकांना दहशत बसविण्याचा आपला उद्देश बैरुतवरील हल्ल्यामागे, जशास तसे ह्या तत्त्वावर होता असे सांगितले. ह्या सर्व प्रकरणात इस्रायलच्या पदरात दोषाचे माप पुरेपूर घातले गेले, इस्रायलचा सुरक्षा समितीतर्फे निषेध केला गेला; पण अथेन्स विमानतळावरील इस्रायली विमानांवरील हल्ल्याबाबत मात्र सर्वथैव मौन पाळले गेले. एकंदरीत हे थोडेसे एकतर्फीच घडले आहे !

१९४८ मध्ये इस्रायलच्या निर्मितीपासून सातत्याने इस्रायलच्या अस्तित्वालाच त्याच्या अरब शेजाऱ्यांनी धोका निर्माण केला. प्रत्यक्ष रणभूमीवर मोशे दायानच्या सैनिकांनी अरबांचा दोनदा पराभव केला. परंतु पॅलेस्टाईनच्या निर्वासित अरबांनी अल् फतेह ही संघटना स्थापन केली आणि इस्रायली सीमांवरून, प्रदेशांतून सतत गनिमी हल्ले चढवले. ह्या दहशतवाद्यांना इस्रायलला चारी बाजूंनी वेढणाऱ्या अरब राष्ट्रांतून आसरा, सैनिकी शिक्षण, सैनिकी मदत मिळते, त्यांच्या छुप्या हल्ल्यांचे सूत्रसंचालनही बहुधा ह्याच प्रदेशातून होत असते. बॉम्बफेक, सुरुंग वगैरे घातपाती प्रकारांनी इस्रायलला जेरीस आणायचे व त्यांना, त्यांनी व्यापलेल्या

प्रदेशातून माघार घ्यायला लावायची असे साधारणतः धोरण अरब राष्ट्रांनी आखलेले असावे; परंतु पंतप्रधान एशकोल व संरक्षणमंत्री मोशे दायान ह्यांनी अलीकडेच जाहीर केल्याप्रमाणे, ह्या अशा 'कमांडोरेड्स'ना, 'ठोशास ठोसा' ह्या न्यायानेच उत्तर द्यायचे, म्हणजे ज्या शेजारी राष्ट्रांतून हल्ला होईल, कुरापत काढली जाईल त्या राष्ट्राला जरब बसेल, असा बदला लगोलग घ्यायचा! ह्याच धोरणानुसार, काही महिन्यांपूर्वी इस्रायलची 'ऐलाट' युद्ध विनाशिका बुडवताच इस्रायलने सुएझच्या परिसरातली तेल संशोधन केंद्रे उद्ध्वस्त केली. अरबांनी युद्ध-विराम रेषेवर हल्ला चढवताच इस्रायल्यांनी अरबांच्या विद्युत्केंद्रावर व नाईल नदीच्या पुलावर जबरदस्त हल्ले चढवले. इस्रायलच्या ह्या घोषित धोरणाला अनुसरूनच लेबॅनॉन व जॉर्डनवरचे सांप्रतचे हल्ले इस्रायलने चढवले.

इस्रायल हे छोटेसे राष्ट्र आहे. लोकशाही राजवट तेथेही चालू आहे–आज जरी इस्रायल प्रत्येक चकमकीत यशस्वी होत असला तरी, चारी बाजूंनी वेढलेला असल्याने व अरबांना साम्यवादी जगाकडून मिळत असलेल्या नवनवीन शस्त्रास्त्रांमुळे, तो नेहमीच अरबांवर मात करू शकेल हे फारसे संभवनीय नाही. गनिमी युद्ध, सततची तणातणी व वाढते जागतिक दडपण ह्यांमुळे इस्रायललाही मध्यपूर्वेत शांतता नांदायला हवी आहे. एशकोल, अबा एबन ह्यांनी ही गोष्ट वारंवार बोलून दाखवली आहे. तरीदेखील त्यांच्या सीमांवर सतत उच्छेद चालू असणेही त्यांना परवडणारे नाही. कारण त्यातून त्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होतो! अरबांनाही अजून लांब पल्ले गाठायचे आहेत व म्हणूनच त्यांनाही शांतता हवी आहे. ह्यासाठीच, जागतिक संघटनांनी केवळ इस्रायललाच तंबी देऊन मध्यपूर्वेत शांतता नांदणार नाही; तर दोन्ही बाजूंनी होणाऱ्या आक्रमक हालचालींना पायबंद घालून आणि अरब निर्वासितांच्या पुनर्वसनाची जबाबदारी सर्वच संबंधित राष्ट्रांना घ्यायला लावूनच हा प्रश्न सोडविण्याची तयारी केली पाहिजे.

भारतानेही ह्याबाबतच्या आपल्या धोरणाचा फेरविचार करायची पाळी आली आहे. इस्रायलची निर्मिती व त्या राष्ट्राचे अस्तित्व ह्या गोष्टी आता जुन्या झाल्या आहेत, त्यांचा इतिहास उगाळत बसण्यात काहीच हशील नाही. त्याचप्रमाणे इस्रायलच्या अस्तित्वासाठी, त्याच्या व्यापारासाठी, सुएझच्या परिसराचा वापर यासही अन्य राष्ट्रांप्रमाणे मान्य झाला पाहिजे. ह्या गोष्टी आता इतक्या पक्क्या झाल्या आहेत की, अरबांनीही ह्याबाबतचे आपले धोरण बदलले पाहिजे! अरब निर्वासितांचा प्रश्न, इस्रायल व त्याच्या शेजारी राष्ट्रांनी आपसात वाटाघाटी करून सोडवायला हवा, पण त्या आधी इस्रायलच्या सातत्याने केल्या जाणाऱ्या कुरापती आधी बंद व्हायला हव्यात! इस्रायली सैन्ये मागे घेतली जावीत, ह्या मागणीच्याबरोबर भारताने आपल्या मित्रराष्ट्रांनाही इस्रायलवर घातपाती हल्ले न करण्याची सूचना द्यायला हवी!

# इंडियन सायन्स काँग्रेस व परकी तंत्रज्ञ

१९१४ साली, दोन ब्रिटिश शास्त्रज्ञांच्या प्रयत्नामुळे स्थापन झालेल्या इंडियन सायन्स कांग्रेसचे ५६ वे अधिवेशन ३ ते ९ जानेवारीच्या दरम्यान मुंबईच्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (पवई) ह्या संस्थेच्या विद्यमाने हिंदू विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. अमर चंद्र जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. देशात शास्त्रीय विचारांना गती देणे, शास्त्रांच्या प्रगतिसाठी फंड उभारणे, देशभर व्याख्यानसत्रे चालवणे, शास्त्रीय प्रकाशने प्रसिद्ध करणे, दरवर्षी अधिवेशन भरवणे इ. कार्ये ह्या संस्थेतर्फे चालवली जातात. दरवर्षीच्या सभेला, अनेक पाश्चात्य शास्त्रज्ञही उपस्थित असतात. ह्या अधिवेशनाच्या श्रीमती गांधींच्या उद्घाटनाच्या भाषणात त्यांनी भारतीय शास्त्रज्ञांना राष्ट्र उभारणीच्या कार्यात, पंचवर्षीय योजनांच्या अंमलबजावणीच्या कार्यात आपला वाटा उचलायचे आवाहन केले. शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ इत्यादींना देशात योग्य संधी प्राप्त करून दिली गेली पाहिजे असेही त्या म्हणाल्या. बरेचसे तंत्रज्ञ व शास्त्रज्ञ भारतात संधी न मिळाल्याने व अन्यत्र वेतनही चांगले मिळत असल्याने भारताबाहेर जातात असे त्यांनी सांगितले–! ह्या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात कुलगुरुंनी कृषिक्रांतीवर भर दिला !

जवळ जवळ ह्याच सुमारास केंद्रीय अर्थखात्याचे राज्यमंत्री श्री. के. सी. पंत ह्यांनी राज्यसभेत काही उद्बोधक आकडेवारी दिली. त्यांनी सांगितले १९६४–६५ मध्ये परकी कंपन्यांनी डिव्हिडंड, रॉयल्टीज व तंत्रज्ञांच्या फीज ह्यांद्वारे जवळ जवळ चव्वेचाळीस कोटी रुपये भारतातून उचलले. मात्र त्याच वेळी भारतातील परकी गुंतवणूक मात्र ह्या रकमेच्या निम्म्यापेक्षाही थोडी कमी होती. रिझर्व्ह बँकेने जी पाहणी करून अहवाल प्रसिद्ध केला आहे त्यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते. रिझर्व्ह बँकेच्या अहवालात पुढे म्हटले आहे की –

**पाश्चात्य सहकार्यामुळे उभारण्यात आलेल्या प्रकल्पांपैकी ९० टक्के प्रकल्प असे होते की, ज्यांमध्ये तंत्रज्ञान** (Technical Know How) **व तंत्रज्ञांची आयात वाचवता आली असती.**

श्रीमती गांधींचे तंत्रज्ञांना आवाहन आणि रिझर्व्ह बँकेच्या अहवालाने उजेडात आणलेल्या हकीकती ह्यांतली तफावत पाहिली की वाटते, प्रशासन, उद्योगपती ह्यांनी राष्ट्रीय संपत्तीची, देशातल्या शास्त्रीय बुद्धिमत्तेची अवहेलना करून अक्षरश: उधळपट्टी चालवली आहे! हेच. मोठाले प्रकल्प देशातले तरुण शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ ह्यांच्या मदतीने, त्यांना शिकवून आणून चालवता आले असते...पण, पण तसे झाले असते तर देश स्वावलंबनाच्या दिशेने लवकर पावले टाकू लागला असता त्याचे काय ? ○

# मु क्ता फ ळे

## पृथ्वी सपाटच आहे !

अमेरिकेचे अपोलो–८ हे यान चंद्राला फेऱ्या मारून आले. त्यातील अंतराळवीरांना चंद्राभोवती घिरट्या घालताना, पृथ्वी लख्खपणे वाटोळी दिसली. पृथ्वी कशी वाटोळी आहे हे भूगोलाचे मास्तर पृथ्वीचा गोल आसाभोवती गर्र्कन फिरवून विद्यार्थ्यांनाही गेली कित्येक वर्षे दाखवीत आहेतच. अमेरिकन अंतराळवीरांनी सर्व भूगोलाच्या मास्तरांचा पृथ्वी वाटोळी आहे हा समज, आता बरोबर असल्याचे निर्विवादपणे सिद्ध केले आहे.

या महान घटनेचे इतर काय परिणाम व्हायचे असतील ते होवोत, परंतु इंग्लंडमध्ये गेली कैक वर्षे, पृथ्वी वाटोळी नसून ती सपाट आहे असे आग्रहाने प्रतिपादन करणारी 'फ्लॅट अर्थ सोसायटी' या नावाची जी संस्था कार्य करीत होती, त्या संस्थेची मोठी पंचाईत झाली आहे. आता ही संस्था नेमके 'कार्य' काय करीत होती हा प्रश्न बाजूला ठेवला, तरी 'सपाट पृथ्वी समाज' या संस्थचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार ही सर्व मंडळी वर्षानुवर्षे निवडली जात होती. अधिवेशने होत होती, हे काही कमी कार्य म्हणता येणार नाही. अमेरिकन यानाने वाटोळ्या पृथ्वीची छायाचित्रे प्रसिद्ध केल्यानंतर आता 'फ्लॅट अर्थ सोसायटी' ही संस्था निकालात निघाल्यासारखी आहे, असा सर्वांचा समज झालेला होता. मूर्खांनी चालवलेली ही भिकार संस्था आता बरखास्त होईल असा ओरडाही इंग्लंडमधल्या वृत्तपत्रांनी सुरू केला आहे. परंतु कळवण्यास आनंद वाटतो की, संस्थच्या चिटणिसांनी पत्रक काढून संस्था यापुढेही कार्य करीत राहील असे जाहीर केले आहे. चिटणीस आपल्या पत्रकात म्हणतात–

" सपाट पृथ्वी ताटासारखी वर्तुळाकार आहे एवढेच या चित्रावरून दिसून येते, चेंडूप्रमाणे ती वाटोळी आहे यावर संस्थेच्या सभासदांनी विश्वास ठेवण्याचे कारण दिसत नाही ! "

संस्था चालू ठेवण्याचा हा चिटणिसांचा आग्रह अंतराळवीरांबरोबर या निमित्ताने चंद्रावर जाण्याचा चान्स मिळवण्यासाठी आहे की काय, असा संशय ही संस्था पुण्यात असती तर कुणालाही आला असता. पण संस्थेच्या सभासदांना प्रामाणिक-

पणे 'पृथ्वी सपाटच आहे !' असे खात्रीपूर्वक वाटत असल्यास त्यांनी संस्था चालू ठेवण्याचा घेतलेला निर्णय हा सर्वथैव योग्यच म्हटला पाहिजे.

अशी आग्रही हट्टी माणसे आपल्या भारतातही आहेत याबद्दल आम्हांला तरी' अभिमान वाटतो. भारतात हिंदू राष्ट्र व मुसलमान राष्ट्र अशी दोन राष्ट्रे होती हा महंमदअली जिनांचा सिद्धांत 'पाकिस्तान' निर्मितीबरोबर जगात मान्य केला गेला. मुसलमान राष्ट्र 'पाकिस्तान' नावाने-अस्तित्वात आल्यानंतर शेष भारतात मुसलमानांनी कसलाही उन्मत्तपणा करता कामा नये असे सर्व लोक समजू लागले. हे म्हणजे पृथ्वी वाटोळी आहे हे मान्य करण्यासारखेच होते ! परंतु थोर थोर काँग्रेसवाले हे 'फ्लॅट अर्थ सोसायटी'च्या सभासदांप्रमाणे अतिशय जिद्दीचे असल्याने त्यांनी वेळोवेळी जाहीर केले आहे,

"ज्या अर्थी सर्व मुसलमान पाकिस्तानात गेले नाहीत त्या अर्थी हे राष्ट्र मुसलमानांचेही आहे ! त्यांच्या भावनांप्रमाणे आपण इतरांनी वागले पाहिजे. याप्रमाणे जे वागणार नाहीत ते सर्व जातीय होत !"

पाकिस्तान निर्मितीनंतर गेल्या ३० वर्षांत दुर्दैवाने 'सपाट पृथ्वी'वाल्यांची जशी सतत पीछेहाट झाली त्याप्रमाणे आता शेष भारतात **मुसलमानांना मुसलमान** म्हणून कसलेही खास स्वातंत्र्य वा अधिकार देता कामा नयेत असे म्हणणाऱ्या लोकांचा आवाज मोठा मोठा होत गेला व काँग्रेसवाल्यांची दुर्दशा सुरू झाली !

मामला आता गंभीर झाला आहे. या दृष्टीने परवा 'सांप्रदायिकताविरोधी समिती'ने दिल्लीला बैठकीपूर्वी काढलेले पत्रक फार महत्त्वाचे आहे. या पत्रकात म्हटले आहे-" राष्ट्रीयता हा भारतात फक्त हिंदूंचाच निरपवाद वारसा आहे असे म्हणण्याची गोळवलकर यांची यापूर्वी कधी छाती झालेली नव्हती." आमच्या माहितीप्रमाणे स्वातंत्र्यापूर्वीपासून गुरुजी गोळवलकरांचे हेच मत होते. त्यांच्या ज्ञानात वाढ झाल्याचा पुरावा अजून मिळत नाही.

पृथ्वीचा आकार वर्तुळाकार आहे असे पायथॅगोरस प्रथम म्हणाला. ॲरिस्टॉटलने पायथॅगोरसचा सिद्धान्त बरोबर असल्याचे सांगितले. कोपर्निकस व गॅलिलिओ यांनी तर सूर्याभोवती वाटोळी पृथ्वी फिरते आहे असे पुराव्यानिशी दाखवले. याच पद्धतीने धीट होत होत अखेर अंतराळवीरांनी चंद्राभोवती प्रदक्षिणा मारताना, पृथ्वी वाटोळीच आहे हे सिद्ध करणारी छायाचित्रेही आणली. असे जरी असले तरी 'फ्लॅट अर्थ सोसायटी'चे अध्यक्ष असेच सांगत राहणार की–

"पृथ्वी वाटोळी आहे असे म्हणण्याची अंतराळवीरांची यापूर्वी कधी छाती झाली नव्हती..."

'सांप्रदायिकताविरोधी समिती' ने आता सरकारला अशी सूचना केली आहे की, रोज आकाशवाणीवरून सकाळी व रात्री––हा देश हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन या सर्वांचा आहे––अशा अर्थाची घोषणा प्रक्षेपित करण्यात यावी. ही सूचना महत्त्वाची

आहे ! आकाशवाणीवरून हा प्रचार सरकारने ताबडतोब सुरू केल्याशिवाय य देशावर आलेले गंडांतर टळणार नाही.

लंडनच्या 'फ्लॅट अर्थ सोसायटी'नेदेखील बी. बी. सी. वरून दिवसातून तीन वेळा– सकाळी, दुपारी व संध्याकाळी–" पृथ्वी ही सपाट आहे " अशी घोषणा देण्याची व्यवस्था केली तर त्यांच्या संस्थेवर आलेले गंडांतर टळल्याशिवाय राहणार नाही. संपूर्ण घोषणा अशी असावी–

पायथॅगोरस मुर्दाबाद !
ॲरिस्टॉटल मुर्दाबाद !
कोपर्निकस मुर्दाबाद !
गॅलेलिओ मुर्दाबाद !
अपोलो आठ नष्ट करा ! !
सपाट पृथ्वी झिंदाबाद ! ! !

प्रचार असा दणदणीत हवा ! मग काय बिशाद लोक ' पृथ्वी वाटोळी आहे यावर विश्वास ठेवतील.

---

# चलो देवनार

---

बंगालमधील मैमनसिंग या ठिकाणची ही हकीकत आहे. गोष्ट जुनी आहे. १९४४ सालातली. गोवर्धनदास नावाचा व्यापारी युद्धकाळात व्यापार करण्यासाठी तिथे गेला होता. युद्धकाळ हा व्यापाऱ्यांचा पर्वकाळ असल्याने गोवर्धनदास लव-करच चांगला गबर झाला. त्याचा बंगला झाला. अंगणात सुबक तुळशीवृंदावन झाले. दारात मालकीची बग्गी आली. परसदारी गोठ्यात चार गुरेढोरे झुलू लागली. गावातल्या पडक्या देवळाचा जीर्णोद्धार करण्यासाठी देवळाला मोठी देणगी देण्याचे आश्वासन त्यानी देवस्थानच्या कळकट ब्राह्मणांनादेखील दिले. एकंदरीत धंद्यात भावनाशून्य आणि इतर वेळी अत्यंत धार्मिक असा गोवर्धनदास पैसेवाला माणूस झाला.

गोवर्धनदासच्या सुखाला इतक्यात दृष्ट लागली. एके दिवशी सकाळी गोवर्धन-दास धारोष्ण गोमूत्र आणण्यासाठी भल्या पहाटे गोठ्यात जातो, तो काय ? माने-भोवती असलेल्या दाव्याचा फास बसून गाय मरून पडलेली ! गोवर्धनदासने हंबरडा फोडला. बायकामुले धावत आली. गोवर्धनदासाचा विलाप चालू झाला होता–

" काल रात्री दावं मीच बांधलं. गाठ मारण्यात चूक झाली आणि गोहत्या घडली ! हे पाप आता मी कसं फेडूऽ ! "

गोठ्यात शेणामुताचा ' कालवा ' होताच. त्यात गोवर्धनदास, त्याची बायकामुले

या सर्वांनी हा कालवा सुरू केला. रडण्याचा आवाज ऐकून -शेजारीपाजमाजरी झाले. गोवर्धनदासाच्या हातून गोहत्या झाल्याची बातमी गावात पसरली. कर्मधर्म संयोगाने नव्हे तर देवळाच्या जीर्णोद्धाराची आठवण देण्याकरिता दोन ब्राह्मण देऊळ संस्थानिक गोवर्धनदासकडे त्याच वेळी आले. गोवर्धनदासाने त्यांचे पाय धरले–

" हूं पापी छूं ! " हाच एक घोष त्याने सुरू केला. ब्राह्मणांनी गोवर्धनदासाला सांगितले– " शोक आवरा शेटजी. सगळ्या पापावर हिंदूधर्मांत प्रायश्चित्ताची सोय आहे. एवढे मोठे लोकमान्य टिळक त्यांनीदेखील मिशनऱ्यांबरोबर चहा प्यायल्या-बद्दल प्रायश्चित्त घेतले. पाप सर्व करू लागले की, ते पाप राहत नाही. आता सगळेच कुणाबरोबर कुठेही चहा पितात ! जाऊ द्या ' शेटजी तुम्ही प्रायश्चित्त घ्या, की गोहत्येचा दोष संपला. "

प्रायश्चित्त सुरू झाले, गोवर्धनदासांना गोणपाट नेसवण्यात आले, अर्धा ग्लास गोमूत्र प्राशन करून त्याला पहिला दिवस निर्जळ उपवास घालण्यात आला. पुढचे तीन दिवस गोवर्धनदास गोठ्यात ज्या ठिकाणी गाय मेली त्या ठिकाणी झोपत असे. फक्त भाताशिवाय या तीन दिवसांत त्याला काहीही खाण्यास देण्यात आले नाही. हे तांदूळदेखील त्याने गावात भीक मागून आणावयाचे असत. मौन असल्याने भीक मागताना त्याला गाईसारखे हंबरून भीक गोळा करावी लागत होती. गोठ्यात परत येताच त्याच्या गळ्याभोवती गाईप्रमाणे दावे बांधण्यात येत होते. या सर्व विधीनंतर चौथ्या दिवशी त्याच्या सर्वांगावर भरपूर गोमूत्र शिंपडण्यात आले. नंतर स्नान करण्यास परवानगी देण्यात आली. ब्राह्मणभोजन घातल्यानंतर दक्षिणा दान झाल्यावर गोवर्धनदास गोहत्येच्या पापातून नक्की मुक्त झाला असे ब्रह्मवृंदाने जाहीर केले.

गोहत्या हे पाप आहे असे या देशातले ८५ टक्के हिंदू लोक मानीत असले, तरी या देशात स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही उदंड गोहत्या चालू राहील याची सरकारने काळजी घेतली आहे. हे बरोबरच आहे. कारण पाप ही कल्पना धर्माधिष्ठित आहे. निधर्मी राज्यात धर्माधिष्ठित पाप करायला बंदी कशी घालणार ? हिंदूंच्या धर्मांधतेविरुद्ध सरकारने घेतलेला पवित्रा अगदी योग्य आहे.

स्वतंत्र भारतात गोहत्या घडते तरी कशी हे प्रत्यक्ष पाहण्याकरिता आम्ही एकदा जातीने एका कसाईखान्याला भेट दिली. कसाईखान्याच्या आवारात, पोटे खपाटीला गेलेल्या गाई-बैलांबरोबरच त्यांची वासरे व काही धष्टपुष्ट गाईही त्यांत दिसत होत्या. या गुरांचे व्यापारी गुरे तपासण्यासाठी नेमलेल्या डॉक्टरला अगदी मुठीत ठेवतात. डॉक्टरने प्रथम यांतली काही जनावरे हत्या करण्यालायक नाहीत म्हणून वेगळी केली. थोड्या वेळाने गुरांच्या दलालाने डॉक्टरांना भेटून त्यांची समजूत घातल्यावर तीच जनावरे पुढच्या हप्त्यांत मारण्यासाठी योग्य अशी ठर-

ण्यात आली. जनावरांची कसोशीने होणारी ही चिकित्सा पाहून आमचे समाधान झाले.

इतका वेळ चहा पिण्यात दंग असलेली लुंगीधारी कसाई मंडळी गाई-बैल कापण्याच्या पत्र्याच्या गृहाकडे गेलेली होती. या गाईगुरांना हत्यागृहात ढकलण्यासाठी आठ-नऊ वर्षांच्या पोरांचा तांडा हातात काटेरी काठ्या घेऊन त्यांना आता हाणीत सुटला.

गुरांपाठोपाठ आम्हीही कसाईखान्याच्या वधगृहापाशी गेलो. आता रक्ताचा इतका निसरडा झाला होता की, दरवाजातून ढकललेली गाईगुरे पाय घसरून पडू लागली. काही जीवाच्या आकांताने मागे पाय घेऊ लागली.

गाईगुरांचे चारी पाय बांधून त्यांना कप्पीवरून खेचीपर्यंत हा गोंधळ चालू होता. मग सर्व गाईगुरे माना टाकून आर्त डोळ्यांनी निपचित पडून राहिली. याच वेळी एक मुल्ला कुठूनतरी अवतीर्ण झाला व गाईगुरांच्या रांगांतून फिरून त्यांनी गाईंना व कसायांना पापमुक्त करणारे काही धर्मश्लोक म्हटल्यानंतर आता हत्येला मोकळीक मिळाली. कसाई–खान्यातही सरकार धर्माला अजिबात विसरत नाही हे पाहून आम्हांला खूपच बरे वाटले. निधर्मी राज्यात गाई–गुरे ही मात्र कसायांच्या धार्मिक विधीपूर्वकच मारली जावीत हा हट्ट आम्हांला फारच कौतुकास्पद वाटला.

गाई–गुरांच्या निपचित पडलेल्या मानांवरून कसायांनी मग अल्लाद सुऱ्या फिरवल्या. गाईगुरे ही हलाल पद्धतीनेच मारली जावी, असा मुसलमानांचा संकेत असल्याने गाईंच्या व गुरांच्या माना फक्त अर्ध्याच कापण्यात आल्या व गाईगुरांना मारायचे ठरल्यानंतर त्यांना जास्तीत जास्त जिवंत राहण्याची संधी देणारा हा हत्याप्रकार हा निधर्मी राज्यातील भूतदयेचा पुरावा नाही काय ? रक्ताचे पाट वाहू लागले. हलाल पद्धतीने काही मिनिटांनी गाईगुरे मेल्यानंतर, माना धडावेगळ्या करण्यात आल्या. थिजलेल्या डोळ्यांच्या शिरांचा ढीग मग वेगळा करण्यात आला.

अपघाताने चुकून हातून गाय मारली गेली तर प्रायश्चित्त घेणारे गोवर्धनदास या देशात ८० टक्के आहेत. हे सर्व धर्मभोळे. या देशातील सर्व व्यवहार हिंदू जीवनपद्धतीला अनुसरून घडले पाहिजेत असे म्हणणारे असल्याने त्यांच्या जातीयवादाचा सरकारने काटेकोरपणे बंदोबस्त करणे अगत्याचे आहे. ज्यांना या देशात गोहत्याबंदी करणे हे मागासलेपणाचे लक्षण वाटते ते सर्व सुशिक्षित, विद्वान हिंदू असल्यामुळे ते स्वत: ‘ खाटीक ’ होण्याची शक्यता नाही. गाय हा उपयुक्त पशू आहे हे सांगणाऱ्या सावरकरांनी “ हिंदूंनो मग खाटीकही व्हा ! ” हा दिलेला संदेश तरी गोहत्याबंदीविरोधकांनी लक्षात घ्यायला हवा. अर्थात जर देशात गोहत्येला बंदी करायची नसेल व हिंदूंना गाई मारणारे कसाई होणेही परवडणारे नसेल तर गाई

मारण्याकरिता, मुसलमान कसाई शहरात आणि गावोगावी सांभाळणे शासनाला आवश्यक नाही काय ?

गांधी शताब्दी वर्षात महाराष्ट्र सरकारने तीन मोठे प्रकल्प सुरू केले आहेत. कोंबडी सोलण्याचा कारखाना नुकताच पुण्याला सुरू करण्यात आला आहे. या कोंबडीसोलण्याच्या कारखान्याचा जेवढा गाजावाजा झाला तेवढा बोरिवली येथे निघालेल्या डुकरे सोलण्याच्या कारखान्याचा झाला नाही. महाराष्ट्राचे शेतकी मंत्री पी. के. सावंत यांनी या वधस्थानाचे उद्घाटन केले. ८५ लाख रुपये खर्चून उभ्या केलेल्या या कारखान्याचे उद्घाटन मंत्रिमहाशयांनी केले म्हणजे नेमका काय समारंभ केला हे प्रसिद्ध झालेले नाही. बहुधा पहिले डुक्कर सावंतांनी इलेक्ट्रिक शॉकने बेशुद्ध तर केले नसेल ! असेल बुवा ! कृष्णगिरी उपवनाच्या मागे हे आता आणखी एक प्रेक्षणीय ठिकाण झाले आहे. येथे दिवसाला १०० डुकरे मारण्याची ' कपॅसिटी' आज आहे. ही दुप्पट होईल असा अंदाज आहे.

कोंबडी–डुकरांच्या पाठोपाठ आता मुंबईत उपनगरात देवनार येथे बकरी, गाई-गुरे मारण्याचा मोठा कसाईखाना १ जुलैला सुरू होत आहे. ४॥ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या या अद्ययावत कसाईखान्याचे उद्घाटन, डॉ. झाकीर हुसेन यांनी करणे यथोचित होईल. किमानपक्षी फक्रुद्दीन अली अहंमद यांना आणले तरी चालेल. आम्ही ही बातमी वाचली आणि आमच्या पोटात धस्स झाले. इथे आता गाईगुरे यंत्राखाली निमिषार्धात मारली जातात की काय अशी धास्ती आम्हांला वाटत होती. तो मुल्ला, ते कसाई, ते धर्मश्लोक यांशिवाय गोहत्या करण्याचा अविचार सरकार करील की काय अशी भीती आम्हांस वाटत होती. कसाईखान्यातील हा धर्म आणि हलाल पद्धतीतील भूतदया यांना भारत पारखा होतो की काय असे वाटत होते. परंतु वृत्तपत्रांत वाचले– "The actual killing will be done by butchers by their traditional methods" [कसाई त्यांच्या परंपरागत पद्धतीनेच गाईगुरे मारतील] जीव गोमूत्रात पडला !

गोहत्याबंदी व्हावी असे म्हणणाऱ्या धर्मभोळ्यांना गोळ्याच घातल्या पाहिजेत. मागासलेले कुठले ! देवनारमधील गाईगुरांची हत्या मात्र परंपरागत पद्धतीनेच व्हावी. इथे प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे हत्त्या करण्याचे स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे–नाही तर निधर्मी राज्याला अर्थ काय ?

समस्त गोवर्धनदासांनो, तुम्ही गोमूत्र पीत राहा ! गोमातांनो, चलो देवनार !!

– ग्यानबा

# गोव्यातील वसाहतविरोधी परिषद

एस्. एस्. खानोलकर

पाश्चात्य राष्ट्रांत इतरांशी तुलना करता पोर्तुगाल हे मागासलेले राष्ट्र असून त्याचा दर्जाही तिसऱ्या प्रतीचा आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारात आज परिस्थिती वेगळी आहे. ब्रिटिश साम्राज्यावरचा सूर्य केव्हाच मावळला, फ्रेंच साम्राज्यशाहीही धुळीला मिळाली; पण पोर्तुगालचे आपल्या वसाहतींवरील वर्चस्व मात्र अद्याप कायम आहे.

हिंदुस्थानसारखा प्रचंड देश ब्रिटिशांच्या दास्यातून मुक्त झाला. पण त्यानंतर गोवा पोर्तुगालपासून सोडविण्यास १७ वर्षे लागली. हिंदी सैन्याने गोव्याच्या हद्दीत पाय ठेवताच पोर्तुगीज शरण आले. गोव्याची मुक्ती एवढी सोपी होती तर आपण सतरा वर्षे वाट का पाहिली ?

हिंदुस्थानने पोर्तुगालच्या वाटेला जाऊ नये, याकरिता इंग्लंड-अमेरिकेचे हिंदुस्थान सरकारवर सतत दडपण चालू होते. गोव्याच्या बाबतीत हिंदुस्थान लष्करी हस्तक्षेप करणार नाही म्हणून पोर्तुगाल व त्याच्या अमेरिका-इंग्लंड आदी पाठीराख्या शक्ती गाफील राहिल्या. हिंदुस्थानने गोव्याच्या बाबतीत लष्करी हस्तक्षेप करण्यास थोडासा जरी विलंब केला असता तरी गोव्याची परिस्थिती काश्मीरसारखी झाली असती, असे श्री. मेनन यांनी आपल्या गोव्यातील भाषणात स्पष्ट केले आहे.

हिंदुस्थाननेच पोर्तुगालला पहिला तडाखा दिला. इतर वसाहतींवरील पोर्तुगीजांची पकड अद्याप कायम आहे. उदाहरणार्थ, अंगोला, मोझांबिक आणि मकाव या वसाहतींतील जनतेचा स्वातंत्र्यलढा दडपून टाकण्याकरिता! त्यांच्यावर भयंकर स्वरूपाचे अत्याचार होत असताना पोर्तुगालशी अमेरिका व इंग्लंड यांचे संबंध दोस्तीचे आहेत. पोर्तुगालचे सामर्थ्य वाढविण्याकरिता अमेरिकेने लाखो डॉलर्सचे कर्ज पोर्तुगालला दिले आहे व देत आहे. सन १९६३ च्या डिसेंबर महिन्यात साडेतीन कोटी डॉलर्सचे कर्ज अमेरिकेने दिल्याचे पोर्तुगालनेच जाहीर केले आहे.

# हे कृपाछत्र का?

पोर्तुगालने चालविलेली दडपशाही राष्ट्रसंघाच्या घोरणाविरुद्ध असताना अमेरिका व पोर्तुगालची घनिष्ठ दोस्ती का, याचे उत्तर आपल्याला या दोन राष्ट्रांतील आर्थिक संबंधांत सापडेल. पोर्तुगीजांच्या वसाहतींपासून अमेरिकेला कोणता आर्थिक फायदा होत आहे हे पाहावे लागेल.

पोर्तुगीजांच्या वसाहतींपासून अमेरिकन कंपन्यांना पुढील प्रकारचे फायदे मिळत आहेत: मोझांबिकमधील पेट्रोल काढण्याच्या बाबतीत सवलती अमेरिकन कंपनीला देण्यात आल्या आहेत. पोर्तुगीज गियानामध्ये चाळीस वर्षांच्या कराराने स्टँडर्ड ऑईल कंपनीला तेलाच्या सवलती मिळाल्या आहेत. त्याचप्रमाणे या वसाहतींत सोने व हिरे यांच्या ज्या खाणी आहेत त्यांत इंग्लंड व अमेरिकेचे भांडवल गुंतलेले असून त्यात या दोन्ही देशांना भरपूर नफा होत आहे; आणि म्हणूनच इंटरनॅशनल डेव्हलपमेंट बँकेकडून सन १९६४ साली साडेबारा कोटी रुपयांचे कर्ज पोर्तुगालला मिळाले. सन १९६५ मध्ये दोन कोटी डॉलर्सचे साहाय्य पोर्तुगालला मिळाले आहे.

वसाहतींतील जनतेने सालाझारशाहीविरुद्ध चालविलेला लढा दडपून टाकण्याकरिता फॅसिस्ट पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे व त्याकरिता अमेरिकेकडून मिळालेल्या शस्त्रांचा उपयोग करण्यात येत आहे. १९५१ ते १९६१ या दरम्यान पाच लक्ष डॉलर्सची अमेरिकन शस्त्रे सालाझारला मिळाली. मोझांबिकसारख्या लहानशा वसाहतीत सालाझारचे पन्नास हजार लष्करी सैनिक आहेत. वसाहती ताब्यात ठेवण्याकरिता पोर्तुगाल मोठ्या प्रमाणावर लष्करी खर्च करीत आहे.

मोझांबिकची लोकसंख्या सत्तर लक्ष आहे. यात कापूस, साखर व काजूगर यांचे चांगले उत्पन्न होते व हाच माल मोठ्या प्रमाणावर निर्यात केला जातो.

अंगोला विस्ताराने अर्ध्या हिंदुस्थानएवढा आहे, पण लोकसंख्या थोडी आहे. अठ्ठेचाळीस लक्ष लोकसंख्या आहे. हा भाग हिऱ्यांच्या खाणींकरिता प्रसिद्ध असून या भागातून कॉफी, दोर व हिरे मोठ्या प्रमाणांवर निर्यात केले जातात.

या संपन्न देशातील जनता अत्यंत दरिद्री आहे. सर्व लोणी गोऱ्या वसाहतवाल्यांच्या घशात जात आहे व हे शोषण चालू ठेवण्याकरिता निग्रो जनतेविरुद्ध लष्कराचा उपयोग करण्यात येत आहे. याच जनतेला सहानुभूती दाखविण्याकरिता नुकतीच गोव्यात श्री. व्ही. के. कृष्ण मेनन यांच्या अध्यक्षतेखाली एक परिषद भरविण्यात आली होती.

(१४ डिसेंबरच्या 'मेनस्ट्रीम'मधील लेखाच्या आधारे)



# गान तपस्विनी

## मोगुबाई कुर्डीकर

बुधवार २० नोव्हेंबर. आम्हां पोरींचा गोतावळा भोवती घेऊन किशोरीताई त्यांच्या काही अभंगांच्या चाली ऐकवीत होत्या न् हातात लिफाफा घेऊन घाईघाईने माई खोलीत आल्या. "अग, अग, बघा ग. तार आलीय्. तार म्हटली की घाबरायला होतं मला! आधी काय ते वाचा न् मग बाकीचं करा."–आम्ही आमचे काम बाजूला सारून आधी लिफाफा फोडून वाचायला लागलो. आणि एकच गलका करून उठलो. "माईंना दिल्लीचं अॅवॉर्ड मिळालं. माईंचा गौरव होणार. माईंना अॅवॉर्ड मिळणार."

आणि २२ नोव्हेंबरला रेडिओच्या सर्व केंद्रांवरून, वेगवेगळ्या वर्तमानपत्रांतून जेव्हा हे प्रकाशित झाले तेव्हा तर माईंवर अभिनंदनांचा, हारतुऱ्यांचा वर्षाव झाला. माईंबद्दलच्या प्रेमाने, आदराने, कौतुकाने साऱ्यांची अंतःकरणे भरून आली. जे ह्यापूर्वीच व्हायला हवे होते ते उशीरा का होईना, आज झाले, याबद्दल शासनाला धन्यवाद दिले जात होते. येणाऱ्या–जाणाऱ्यांची घरात नुसती रीघ लागली होती. सकाळपासून रात्री ११ वाजेपर्यंत टेलिफोन्सचा आणि ट्रंककॉल्सचा नुसता मारा होत होता. साऱ्यांच्या अभिनंदनांचा स्वीकार करता करता माई थकून जात होत्या. त्यांची ती धावपळ बाजूला उभी राहून मी बघत होते. साध्या पांढऱ्या शुभ्र साडीतल्या समोर उभ्या असलेल्या ह्या माई, 'एके काळी आपल्या वाघिणीसारख्या गाण्याने आकाशपाताळ एक करून सोडणाऱ्या, अल्लादिया खाँसाहेबांच्या शिष्या असं कुणाला तरी वाटेल का?' माझ्या मनात प्रश्न उभा राहिला.

नुकतेच एका पेपरमध्ये वाचले होते. माईंचा उल्लेख 'गानतपस्विनी मोगूबाई' असा केला होता. किती सार्थ विशेषण होते ते! खरोखरच माई एक तपस्विनीच!

## कु. सुशीला अय्यर ।।।।।।।।।

**पोस्टाची तार आली तर घाबरणाऱ्या आणि तंबोऱ्याच्या तारांमुळे मुग्ध होणाऱ्या माईंना नुकतीच राजमान्यता मिळाली .........**

माईंचे संगीत हे एक तपाचरण, तर माईंचे जीवनही तसेच तपाचरण ! संगीताकडे ' एक साधना ' म्हणून बघणाऱ्या ह्या माई, जीवनाकडेही अशाच ' एक साधना ' म्हणून बघणाऱ्या ! ' पावित्र्याकडे, मांगल्याकडे, सत्त्वाकडे नेणारी ही वाटचाल ' अशी जी संगीताबद्दलची, कुठल्याही कलेबद्दलची त्यांची भूमिका. तीच जीवनाबद्दलही त्यांची भूमिका ! आणि तीही कुठल्याही तऱ्हेच्या ओढून-ताणून आणलेल्या अभिनिवेशाने नव्हे तर एक निखळ सहजधर्म म्हणून ! अंगभूत स्वरूपात मूलभूत निष्ठा म्हणून ! !

आजपर्यंतच्या सहवासात मी पाहते आहे, ' श्रीमती मोगूबाई 'च्या ' माई ' कधी झाल्या आणि ' माई 'च्या ' आमच्या माई ' कधी झाल्या ते कळलेसुद्धा नाही. तशा माई स्वभावाने कडक, स्पष्टवक्त्या, काहीशा शीघ्रकोपी, अतिशय शिस्तबद्ध आणि नेमके वागणे. एकदम जवळ जायला भीती वाटावी अशा, पण आदर्श व्यक्तिमत्त्वाची ओढ अशीच अनावर असते. आदर्शाकडे माणूस स्वतःच्या नकळत झुकू लागतो. तसेच झाले. आम्ही साऱ्या मुली " आमच्या माई, आमच्या माई " करीत अशाच त्यांच्याभोवती कडे करीत राहिलो आणि माईंच्या व्यक्तिमत्त्वातले अनेक छोटे-मोठे पैलू आम्हांला दिसू लागले. रोमांचित व्हावे असे, वंदनीय वाटावे असे, नतमस्तक व्हावे असे ! !

स्वयंपाकघरात मुलांना, नातवंडांना, येणाऱ्या-जाणाऱ्यांना हवे नको ते बघणाऱ्या माईपासून व्यासपीठावर अनेक विद्वान कलावंतांसमोर तडफदार बंदिशी साकार करणाऱ्या माईपर्यंत अनेक माई आम्ही बघितल्या आहेत. त्यात माईंच्या व्यक्तिमत्त्वातले दोन ठळक पदर दृष्टीस पडतात. एक बुद्धिमान कलावंत माई आणि

दुसऱ्या सुविनीत, सोज्वळ गृहिणी माई! (हे दोन्ही गुण त्यांच्या दोन मुलींच्या स्वरूपात भिन्नभिन्नपणे साकार झाले आहेत.) माईंमध्ये हे दोन्ही पैलू एकमेकांत अभिन्नपणे मिसळून गेले आहेत. परमार्थाने एकरूप झाले आहेत. ह्यात कुठला कमी आणि कुठला जास्त हे ठरवणे कठीण व्हावे, अशा रीतीने एकरूप झालेले आहेत. माईंच्या गायनात करारी, कर्तव्यदक्ष, शिस्तबद्ध आणि त्याच वेळी विनीत, सोज्ज्वळ संसारिकेचा साक्षात्कार व्हावा तर त्यांच्या 'गृहिणी' म्हणून व्यक्त होणाऱ्या प्रत्येक कृति-उक्तींत कलावंतपणाचा प्रत्यय यावा असे हे नाते आहे, असे हे दोन्ही संसार एकमय होऊन गेले आहेत. कारण ह्या दोन्ही गोष्टी अंतिमतः माईंच्या स्त्रीवृत्तीत सामावणाऱ्या आहेत; खऱ्या अर्थाने त्यांच्यात असणाऱ्या स्त्रीवृत्तीचं दिग्दर्शन करणाऱ्या आहेत.

'स्त्रीधर्म' हा माईंचा 'प्रधानधर्म' आहे, म्हणूनच त्यांच्या आलापीतले, त्यांच्या तानेतले सौंदर्य आणि रेखीवपण त्यांच्या चपात्या करण्यात, भाकरी करण्यात, देवासाठी हार गुंफण्यात दिसून येतो. भाकरी करताना एकदा जसा आणि जेवढा हात फिरेल तसाच आणि तेवढाच तो दुसऱ्यांदा परत फिरेल. आणि शेगडीवर फुलून येणाऱ्या त्या भाकरीचा आकार बघितला की, माईंमधील कलात्मकतेच्या प्रत्ययाने भारावून जायला होते. "शृंगारौनि कर्म करावे," "योगः कर्मसु कौशलम्" ह्या उक्तींचा अर्थ कळायला लागतो.

तोच नीटसपणा, रेखीवपणा, तीच शिस्त त्यांच्या शिष्यांना गाणे शिकवताना, येणाऱ्या-जाणाऱ्यांशी बोलताना, किंबहुना त्यांच्या प्रत्येक आचरणात दिसून येते. म्हणूनच एका अर्थी माईंचं व्यक्तिमत्त्व हे खऱ्या अर्थाने स्त्रीवृत्तीने प्रकट होणारे व्यक्तिमत्त्व असूनही बुद्धिप्रधान व्यक्तिमत्त्व आहे. 'स्त्रीवृत्ती राखून साधलेला समतोल' हा माईंच्या जीवनाचा अन्वयार्थ म्हणावा लागेल. म्हणूनच त्यांच्या गाण्यातही भावनिक हळवेपणापेक्षा वैचारिक तीक्ष्णता महत्त्वाची ठरलेली आहे. ही वैचारिक तीक्ष्णता एक प्रकारच्या अद्वितीय स्वरूपात त्यांच्या कलेत दिसून येते. त्यांच्या कलेतील बुद्धिगम्य वैचारिकता ही एखाद्या योगिनीच्या भक्तीसारखी वाटते. योगामधली प्रखर निष्ठा पेटत्या धगीसारखी दिसत असतानाच भक्तीतील मार्दव व्यक्त करणारी निरुपम श्रद्धा तेवढ्याच मूलभूत स्वरूपात सिद्ध व्हावी अशी! म्हणूनच माईंचे गायन ही विलक्षण बुद्धिगम्य अनुभूती ठरत असताना विलक्षण स्वरूपाची सौंदर्यानुभूती देत राहते. विलक्षण जिद्दी व करारी अशा त्यांच्या गायनात वत्सल–प्रेमळपणाचा साक्षात्कार पाववीत असते. असे हे 'स्व–त्वा'ला जपत 'सत्–त्वाला' जपणारे व्यक्तिमत्त्व आहे. म्हणून ते संयमशील व्यक्तिमत्त्व आहे.

म्हणूनच इथे कलावंताइतकाच गृहिणीचा पिंडही महत्त्वाचा बनलेला आहे, असे मी म्हटले. व्यवहार आणि व्यवहारातीतता एकाच वेळी सिद्ध होत राहते. शिष्येकडून तालमीचे पैसे मोजून घेणाऱ्या माई 'जेवली नसशील तर ताट घे न् जेवायला

बैस' असे म्हणू शकतात. 'गळयातून तान नीट काढ' सांगणाऱ्या माई, "एवढा लहान पदर कसा, मोठा पदर काढ. पदर नीट घ" म्हणून सांगू लागतात. संगीतातल्या सुसंस्कारांइतकेच जीवनातील सुसंस्कारांना महत्त्व देत राहतात. गुरुभक्ती हे कलानिष्ठेचे फार मोठे महत्त्वाचे मूल्य म्हणून सांगतात. मोठयातले मोठे यश मिळत असताना प्रथम गुरूचे ऋण स्मरतात. कितीही मोठ्या मानाचे स्थान लाभले तरी 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' हे ब्रीद सोडू शकत नाहीत. सतत आत्म परीक्षण हा खरा मनुष्यधर्म असायला हवा असे आवर्जून सांगत राहतात.

आणि ह्यात सर्वांत विलक्षण बाब ही की, हे सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व कुणाच्याही आधाराशिवाय वयाच्या सातव्या वर्षापासून, आई सोडून गेल्यामुळे सैरभैर झालेल्या स्थितीत, नाही नाही त्या हालअपेष्टा सोसत, प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत माईंनी स्वतःच घडवलेले आहे. सदसद्विवेक, स्वतःचा सद्विचार आणि शुद्ध मन ह्यांचा आधार घेत माइनी आपल्या जीवनाचा प्रवास केलेला आहे आणि पदरची तीन पोरे नावारूपाला आणली आहेत. असे हे स्वयंभू व्यक्तिमत्त्व आहे. "अग, रजिष्टर मॅरेजं करतात आजकाल. सरकारात रजिष्टर करून मागत नाही. मनानं रजिष्टर करायला पाहिजे आधी." असे कुठलीही शाळा न पाहिलेल्या ह्या बाई म्हणू लागतात.

एका घटनेची आठवण अजून माझ्या मनात ताजी आहे. आम्ही दोघी मिळून माईंच्या एका शिष्येकडे गेलो होतो. अनेक फळांचे काप तिने माईंपुढे आणून भक्तिभावाने ठेवले. माईंना फळे आवडतात. मोठ्या आवडीने त्यांनी ती बशी उचलली आणि एका झटक्यात एकाएकी दूर सारली. "हे बघ, ह्यात आंब्याचे तुकडे नाहीत ना? असले तर मी हे खाणार नाही. एक तुकडाही मला यात चालणार नाही." त्या म्हणाल्या. मी ऐकतच राहिले. मला याचा अर्थ कळेना. नंतर वाटले, कदाचित डॉक्टरांनी त्यांना याबद्दल मनाई केली असेल. पण माई सांगू लागल्या, "आज पंचवीस वर्षे होऊन गेली. मी आंब्याचा एक तुकडाही तोंडात घातला नाहीय. अग, घरात हापूसचे पेटारेच्या पेटारे भरून पडलेले असतात, पण एक तुकडाही मला कधी खावासा वाटला नाही. मुलं त्यांच्या वडिलांना "आंबा, आंबा" म्हणून हाक मारीत. जोवर हे होते, तोवर एक दिवसही मुलं आंब्यावाचून जेवली नाहीत. किशोरीला तर बारा महिने आंबे लागायचे. ते गेले न् मी आंबा खाणं सोडून दिलं."

कुणाला न कळेल अशा बेतानं डोळे कसे पुसू असे मला होऊन गेले.

भीष्माने केलेली प्रतिज्ञा, त्याचे व्रताचरण अंतिमतः अप्रयोजक ठरते, असे म्हणण्याचा हा काळ! अशा ह्या काळात माई स्वतःसाठी एक विशिष्ट धर्म आखून घेताहेत. जेथे तेथे क्षुद्र तडजोड हाच भोवताली धर्म मानला जात असताना 'स्वधर्मा'ची कल्पना स्वतः आखून घेऊन तसे आचरण त्या करीत आहे. विलक्षण निष्ठेन, अनेक विरोधांना, अनेक कष्टांना न जुमानता, जीवनातील कठोर सत्यांना उघडया डोळयांनी पाहत, पोटात पेटती आग घेऊन. कारण जीवनधर्माची त्यांची

व्याख्या निराळी म्हणून ! जीवनधर्म हाच त्यांना प्रधानधर्म वाटतो म्हणून ! त्या खऱ्या अर्थाने निर्मळ ' जीवनवती ' म्हणून !

आणि ह्याची किंमत कुणाला कळेनाशी झाली की, " मऊ मेणाहून " असलेल्या आमच्या माई वज्राहूनही कठीण होऊ शकतात. काही वेळेला असह्य व्हावे इतक्या ! " एका स्त्रीला हे कसं जमतं ?" असा प्रश्न मनात उभा राहावा इतक्या ! पण त्यामागे खोल खोल कुठेतरी सत्यावरची प्रखर निष्ठा असते. अन्यायाविरुद्ध फुटून उठणारी चीड असते. आणि म्हणून ह्या काठिण्यालाही तीव्रता येते ! !

आणि जेव्हा ह्यातूनही काही साधत नाही असे दिसू लागते, न्यायालाही अन्यायी उत्तर मिळताना दिसते, सत्याला असत्य हसत राहते, तेव्हा हतबल माई एखाद्या लहान पोरीसारख्या रडत राहिलेल्या मी पाहिलेल्या आहेत. ते पाहायला लागले की, पोटात गलबलायला होते. जिभेवर उत्तर उरत नाही. डोळे जमिनीकडे लागतात. आपल्या नकळत !

ह्या साऱ्यांसाठीच माईंना कलेइतकेच जीवन महत्त्वाचे वाटलेले आहे. जीवनासाठी कला ही त्यांची निष्ठा आहे. किंबहुना सत्य, न्याय, धर्म आणि अब्रू यांच्यापुढे कलेला त्या नेहमी दुय्यम स्थान देतात. अब्रू जायची वेळ येणार असेल तर हातातला तंबोराही बाजूला सारायची तयारी हवी, हे त्यांचे तत्त्वज्ञान ! ' चारित्र्यसंपन्न, सत्यनिष्ठ, पवित्र जीवन आणि त्या जीवनाचे सौंदर्य आणि सामर्थ्य वाढवण्यासाठी, मांगल्य निर्माण करण्यासाठी, आणि त्याची अर्थवत्ता वाढवण्यासाठी कलानिर्मिती ' ही त्यांची धारणा आहे. म्हणूनच ' सत्य हेच सौंदर्य ' ही त्यांची पारमार्थिक सौंदर्यकल्पना आहे. ' Truth is beauty ' ह्या महत्–तत्त्वाचे व्यक्तरूप इतक्या सार्थ स्वरूपात मला दुसरीकडे क्वचितच आढळले आहे.

–अशी ही त्यांच्या जीवनविषयक जाणिवांत विलक्षण प्रगल्भता (Maturity) दिसते. ही प्रगल्भता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात, रोमरोमांत भिनलेली असल्याकारणाने कलेबद्दलही अंतिमस्वरूपाचे सिद्धांत व्यक्तविताना सर्व तऱ्हेची कलासंपन्नता स्वतःमध्ये असूनही एक प्रकारची व्यापक तटस्थता सतत व्यक्त होऊ शकते. आपला समतोल सतत स्थिर स्वरूपात त्यांना राखता येतो. कलाव्यवहारात एवढी मोठी पात्रता, एवढा मोठा अधिकार अंगी असूनही कला हेच स्वतःचे जीवन बनवलेले असूनही त्याबाबत हळवा अतिरेकीपणा स्वभावात येत नाही. जीवनातले सारे मोह, सारे शरीरधर्म ह्या कलेसाठी बाजूला सारणाऱ्या, कलेच्या बाबतीत मानवाला जेवढे शक्य असते तेवढे सारे करून बसलेल्या ह्या माई जीवनाची अंतिम असारता ओळखतात आणि म्हणून जीवनाचे खरे सार वेगळे मानतात. आणि म्हणून देव आणि देऊळ हे माईंचे वीक पॉइंट्स् आहेत आणि म्हणूनच स्ट्रॉंग पॉइंट्स् आहेत असे म्हणावे लागते. परमेश्वरभक्ती हा माईंच्या गुणसौंदर्याचा अंतिम आणि महत्त्वाचा निष्कर्ष आहे. कितीही तीव्र स्वरूपाचा हट्ट असो, माईंना एखादे देऊळ

दाखवीन, एखाद्या देवाचे दर्शन घडवीन असे म्हटले की, क्षणात त्या आपला हेका सोडतील, कुठलाही मोह सोडून निघून येतील.

अशा ह्या माई, कलाप्राप्तीसाठी हातातले सव्वाशे तोळे सोने स्वतःच्या हाताने बाजारात नेऊन विकून येणाऱ्या, कफल्लक बनून अत्यंत निकृष्ट दर्जाची कामेदेखील संगीतसाधनेसाठी करीत राहणाऱ्या, शरीराचे सारे सुखासीन उपभोग कलेसाठी त्याज्य मानणाऱ्या, कलाविषयातील सारे साक्षात्कार गवसून, अनुभवूनही काही तरी, कुठे तरी जीवन उरून राहते अशी अनुभूती प्रकट करतात. असे माईंचे जीवनविषयक चिंतन सखोल आहे. सामान्यतः कलावंताला आपल्या कलेपलीकडच्या जीवनाचा विचार नसतो. असला तरी त्याची फारशी खंत नसते. माईंचे तसे नाही. आपल्या कलेसाठी सर्वस्व उधळून लावूनही तसे नाही. माईंच्या जीवनविषयक चिंतनाचे व्यक्त रूप म्हणजे त्यांचे संगीत आहे म्हणून त्यांच्या संगीताचा दर्जा फार निराळा आहे. जीवनविषयक चिंतनात इतके सर्वतोपरी गढलेले, त्यातील अनाकलनीय गूढांनी स्तिमित झालेले. त्यातील अंतर्विरोधांनी व अगतिकतेने व्याकुळ झालेले आणि अंतिम मूल्यदर्शनाच्या दृष्टीने मानवी चिंतनाची विफलता कळल्यावरही पुन्हा पुन्हा त्याच्या आहारी जाणारे, परत त्यात अंतर्गत सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी धडपडणारे, "जीवनकलह" खऱ्या अर्थाने जगणारे आदर्श कलावंत आजच्या, थोडेसे नाव मिळताच टेंभा मिरवणाऱ्या तथाकथित कलावंतांच्या दुनियेत दुर्मिळच म्हणावे लागतील.

माई खरोखरच खूप मोठ्या आहेत. खूप खऱ्या आहेत. 'Truth is beauty' म्हणणाऱ्या ह्या माई नको तितक्या खऱ्या आहेत. म्हणूनच अनेक सुखांना, अनेक फायद्यांना त्या मुकल्या आहेत. कीर्ती आणि अर्थार्जन ह्या दोहोंना त्यांनी जीवनाच्या स्वत्वापुढे दुय्यम मानलेले आहे. म्हणूनच ह्या देवतेला इतर कशापेक्षाही, इतर कुणापेक्षाही देवच तेवढा जवळचा वाटतो, 'आपला' वाटतो. एका परीने परमेश्वर हेच त्यांचे जीवन बनून राहते. म्हणूनच दिल्लीला अ‍ॅवॉर्ड घ्यायला जायला त्या नाकबूल होतात. हरतऱ्हांनी मिनतवारी करून करून आम्हांला थकायला होते. संन्यासी वृत्तीने राहणाऱ्या माई म्हणू लागतात, "माझ्या किशोरीला गातं ठेवण्यासाठी व तिनं चांगलं गाण्यासाठी धडपडणं ह्यातच मला खरा आनंद आहे. तुम्ही मला हारतुरे घाला, सत्कार करा, अ‍ॅवॉर्ड द्या. पण मला माहीत आहे मी कुठे आहे ते. माझं समाधान व्हायला अजून खूप अवकाश आहे. अजून फार वेळ आहे असे म्हणून दुपारची वामकुक्षी करायला म्हणून त्या जराशा पहुडलेल्या असतात. तर त्याही वेळी त्यांचे पायांच्या बोटांनी ताल देणे चालू असते. गळा काहीतरी गुणगुणत असतो. त्या वेळी त्यांना अ‍ॅवॉर्ड दिसत नसतं, त्यांना फक्त सूर दिसत असतो. फक्त ताल लक्षात असतो. ते अंतर्गत संगीत मी ऐकत राहते. मुग्ध होऊन ऐकत राहते. ○

ट्रॅक्टर आणि बॉयलर

# परकी सहकार्याची गुलामगिरी

चंद्रशेखर मराठे

परदेशी सहयोग, तांत्रिक सहकार्य वा भांडवली गुंतवणूक असलेल्या भारतीय कंपन्यांची पाहणी रिझर्व्ह बँक ऑफ् इंडिया या सरकारी संस्थेने नुकतीच केली. या पाहणीत ८२७ कंपन्यांचा समावेश होता व या कंपन्यांनी केलेल्या १०५१ करारांची छाननी रिझर्व्ह बँकेने केली.

या ८२७ कंपन्यांची वर्गवारी अशी–

| | |
|---|---|
| भारताबाहेर स्थापन झालेल्या कंपन्यांच्या दुय्यम कंपन्या | –२२४ |
| भारतात स्थापन झालेल्या व पन्नास टक्क्यांपेक्षा कमी परकी भांडवल असलेल्या कंपन्या | –३६७ |
| निव्वळ तांत्रिक सहकार्याचे करार केलेल्या भारतीय कंपन्या | –२३६ |

१९६०–६१ ते १९६६–६७ या सात वर्षांच्या काळात भारतीय कंपन्यांनी रॉयल्टी, तांत्रिक सल्ल्याबद्दल मुशाहिरा व लाभांश या रूपाने परदेशी पाठविलेली रक्कम दुप्पट झाली. तांत्रिक सहकार्य घेतलेल्या भारतीय कंपन्यांनी १९६०–६१ मध्ये अकरा कोटी रु. डिव्हिडंडच्या रूपाने परदेशी पाठवले होते. १९६६–६७ साली हा आकडा एकोणतीस कोटी रु. झाला. त्याचप्रमाणे रॉयल्टी व तांत्रिक सल्ल्याबद्दल मुशाहिरा यापोटी १९६०–६१ सालात नऊ कोटी रु. परदेशी गेले तर १९६६–६७ सालात पंधरा कोटी रु. परदेशी गेले; आणि या रकमेपैकी तिसरा हिस्सा सरकारी क्षेत्रातील कंपन्यांचा आहे.

तांत्रिक सहकार्य घेतलेल्या सरकारी कंपन्या एकूण चोवीस आहेत. वरील सात वर्षांच्या काळात या कंपन्यांनी सरासरी चार कोटी रु. तांत्रिक मुशाहिरा म्हणून दिले. रॉयल्टी म्हणून या कंपन्यांनी दिलेली रक्कम १९६०–६१ मध्ये पंधरा लाख रु. होती तर १९६६–६७ मध्ये ती चौसष्ट लाख झाली. वरील १०५१ परकी करारांपैकी देशवार वर्गवारी खालीलप्रमाणे–

ब्रिटन-चाळीस टक्के, अमेरिका-एकोणीस टक्के, प. जर्मनी-चौदा टक्के. यांखेरीज जपान, स्वित्झर्लंड, फ्रान्स, स्वीडन व नेदर्लंड्स् ह्या देशांशीही करार झालेले दिसतात. रॉयल्टीच्या रक्कमेपैकी सत्याऐंशी टक्के रक्कम ब्रिटन, अमेरिका व जर्मनी यांना मिळते तर तांत्रिक फीपैकी सहासष्ट टक्के रक्कम ब्रिटन व अमेरिका यांस मिळते.

१०५१ करारांपैकी पंचावन्न टक्के करार मशीन टूल्स, विजेची उपकरणे व रसायने या उद्योगधंद्यांमध्ये झाले आहेत. यांखेरीज पेट्रोलियम, वाहतूक साधने, यांत परकी सहकार्याचे प्रमाण जास्त आढळून येते.

या पाहणीत आढळून आलेली सर्वांत अस्वस्थ करणारी गोष्ट म्हणजे चाळीस टक्क्यांहून अधिक करारांमध्ये भारतामधून होणाऱ्या त्या मालाच्या निर्यातीवर या ना त्या स्वरूपात बंधनें घातलेली आहेत. सुमारे १४९ करारांमध्ये अशा निर्यातीसाठी परकीय सहयोग देणाऱ्या कंपनीच्या परवानगीची अट आहे, तर १९७ करारांमध्ये कोणत्या देशास माल पाठवावयाचा याची बंधनें आहेत. बेचाळीस करारांमध्ये कोणत्या देशास माल पाठविता येणार नाही, याचे निर्बंध आहेत. चार करारांमध्ये विशिष्ट मालच निर्यात करता येईल अशी अट आहे तर वीस करारांत सहयोगी कंपन्या वा त्यांच्या एजंटांसच माल निर्यात करता येईल अशी तरतूद आहे. दोन करारांत वार्षिक निर्यातीवर मर्यादा घातली आहे तर पाच करारांत ट्रेडमार्कच्या वापरावर बंधन आहे. छत्तीस करारांमध्ये संबंधित मालाच्या निर्यातीस पूर्णपणे बंदी आहे.

निर्यातीवरील बंधनांखेरीज या करारांमध्ये अनेक प्रकारच्या जाचक अटी आढळून येतात. १५४ करारांमध्ये उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री व कच्चा माल अमुक देशातूनच आणावा, अशी अट आहे तर पासष्ट करारांत उत्पादनाचे स्वरूप निर्बंधित करण्यात आले आहे. पंचावन्न करारांत किमान रॉयल्टीची अट आहे तर अठरा करारांत विक्रीव्यवस्थेसंबंधी काही बंधनें आहेत.

सार्वजनिक व सरकारी क्षेत्रातील कंपन्यांवरदेखील वरीलपैकी काही बंधने आहेत, हे नमूद करणे जरूर आहे. इतकी बंधने असूनदेखील परकी कंपन्यांच्या भारतीय दुय्यम कंपन्यांची निर्यात वाढत आहे. १९६०–६१ मध्ये या कंपन्यांनी २५·४ कोटी रु.चा माल निर्यात केला होता तर १९६६–६७ मध्य ३६.८ कोटी रु. चा माल निर्यात केला. त्याचप्रमाणे परकी भांडवल गुंतवणूक असणाऱ्या भारतीय कंपन्यांची, निर्यात १९६०–६१ मध्ये १२.८ कोटी रु. होती ती १९६६–६७ साली ३३.६ कोटी रु. झाली. केवळ तांत्रिक सहकार्याचे करार केलेल्या या कंपन्यांची निर्यात १९६०–६१ साली तेरा कोटी रु. होती ती १९६६–६७ साली २२.८ कोटी रु. झाली.

परकी सहकार्याचे व भांडवलाचे अनाठायी स्तोम माजविणारांनी रिझर्व्ह बँकेच्या वरील अहवालाचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे. विशेष म्हणजे रिझर्व्ह बँकेने केलेली ही पाहणी, भारतात पहिलीच आहे. यापूर्वी या विषयाकडे कोणा सरकारी वा विनसरकारी संशोधकाचे लक्ष जाऊ नय याचे आश्चर्य वाटते. आपल्या देशाची निर्यात वाढू नये व उत्पादनतंत्र नेहमीच सहयोगी देशाच्या आधीन राहावे या दोन हेतूंनी परकी करारमदारांत किती लक्षपूर्वक बंधने घालण्यात येतात हे पाहिल्यावर परकी तांत्रिक मदतीच्या वा भांडवल गुंतवणुकीच्या साहाय्याने औद्योगिक विकास करणे हे केवळ हिताचे नाही असे नव्हे तर धोक्याचे आहे याची खात्री पटते. ○

खरे म्हणजे मधूचे कधीकाळी लग्न होईल, तो चारचौघांसारखा संसारात पडेल, असे मला तरी कधी वाटले नाही. आणखी कुणाला तसे वाटण्याची शक्यता नव्हती. कारण तसे कुणी त्याच्या आयुष्यात नव्हतेच. मधूच्या अस्तित्वाची जाणीव असणारे कुणीही नव्हते.

मधू कमालीचा कुरूप होता. जन्मतःच त्याचे रूप पाहून त्याची आई ढसढसा रडली. त्याच्या आईनेच, प्रत्यक्ष जन्मदात्रीनेच, त्याला तेव्हा जे दूर लोटले, ते परत कधी जवळ केले नाही ! नव्हे, ती लवकरच हे जग सोडून गेली ! कळकट काळ्या रंगाचा, खुजा, बटबटीत डोळ्यांचा, बसकट नाकाचा मधू कुणालाच जवळ नको होता. ' मधू ' या त्याच्या नावाने त्याच्या कुरूपतेत अधिक भर पडे ! घरच्या माणसांनी त्याच्या शारीरिक उणिवांचे भांडवल करून त्याला नेहमीच डिवचले. शाळेतसुद्धा त्याला कोणी आपल्याबरोबर खेळायला बोलावल्याचे मला आठवत नाही. बाकीच्या लोकांच्या वागणुकीमुळे मधू लोकांपासून आपोआपच दूर राहू लागला. कर्तव्य म्हणून त्याचे वडील त्याला शाळेत पाठवीत होते.

मधू मॅट्रिक झाला. एक दिवस न बोलता मुंबईला निघून गेला. तो असा का निघून गेला याचे कुणाला काही वाटायचे कारण नव्हते. एक दिवस तो एका फर्ममध्ये नोकरीलाही लागला. चार पैसे मिळवू लागला. पण मधू घुम्याच राहिला. गिरगावात बोरकर चाळीत त्याने जागाही मिळवली. सारे न बोलता, न गाजावाजा करता. अचानक गाठ पडूनच आम्ही दोघे गाववाले म्हणून जवळ आलो. म्हणजे मीच त्याला जवळ केले ! माझ्याशीसुद्धा तो कधी मनमोकळेपणाने आपली सुख-दुःख बोलल्याचे आठवत नाही. पण मी त्याच्याकडे अधूनमधून जात असे.

कामावरून तडक तो निघे आणि आपली खोली गाठून आपली आवडती चार मिनार फुंकत पडे. बेसुमार सिगरेट ओढण्यामुळे त्याच्या राकटपणात अधिकच भर पडली होती. बोरकरचाळीतही तो एकाकीच राहिला. चाळीतील कोणीही

# अगावेगळा!

– – – – – – –

जयाराम करंबेळकर

– – – – – – –

त्याची ओळख करून घेतली नाही, त्यालाही ती गरज भासली नाही.

अशा मधूच्या लग्नाबाबत कोण पुढाकार घेणार? निसर्गाच्या नियमाप्रमाणे वयात आलेल्या मधू-मध्ये काही खळबळ कधीच दिसली नाही.तो कुठे चौकात उभा राहिल्याचे आठवत नाही. सुंदर मुलीकडे त्याने वळून पाहिल्याचे दिसले नाही. बाल्कनीत उभा राहून तो कधी कुणाला अडचण झाला नाही. त्याचे रूप आणि बेसुमार सिगरेट ओढणे या गोष्टी सोडल्या, तर त्याच्यात काय वाईट होते? त्याच्या वयाची पस्तीस वर्षे अशीच गेली. अनेक कुरूप माणसांची लग्ने झाल्याचे मी पाहिले आहे. मधूकडे मात्र इतकी वर्षे कुणाचे लक्ष गेले नाही. मधू स्वतः होऊन काही प्रयत्न करण्याचा प्रश्नच नव्हता.



म्हणूनच मधूचे लग्न हे आश्चर्य होते. होय, मधूचे लग्न झाले. लग्नात मधूकडून वऱ्हाडी मंडळींत फक्त मी होतो; माझी पत्नी व मुले होती. त्याच्या चाळीतून कुणीही आले नव्हते. मधूची बायको रत्नागिरीच्या एका भिक्षुकाची मुलगी. नाना जोगांची मुलगी. नानांनी मुलगी वयात आल्यावर मुलगी उजवायची, या हिशेबाने लग्न करून टाकले. त्यांना मधूचे स्थळ कोठून कळले कुणास ठाऊक! त्यांनी काही जास्त खोलात जाऊन चौकशी केली नाही. अगदीच चौकशी केली नाही, असेही नाही. मधू पोटापुरते पैसे मिळवत होता. राहायला खोली होती आणि कुरूप असलातरी नवरा मुलगा होता. आणखी काय पाहिजे होते?

पण आश्चर्यात भर म्हणजे मधूची बायको अप्रतिम सुंदर होती. नक्षत्रासारखी

होती. लग्नाच्या वेळी प्रत्येकजण या विजोड जोडीबद्दल चर्चा करीत होता.

मधूबरोवर जेव्हा त्याच्या पत्नीने–शांताने–चाळीत प्रवेश केला, तेव्हा सबंध चाळ मधूकडे आणि मधूच्या बायकोकडे झपाटल्यागत पाहत राहिली. शांताच्या लयबद्ध चालीवरचे लक्ष चाळीतल्या बायकांनासुद्धा काढून घ्यावेसारखे वाटले नाही. नळावरच्या बायकांची कामे जिथल्यातिथे थांबली. बादली वाहून जात होती पण आज त्याकडे मालकाचे लक्ष गेले नाही. बंडोपंतांनी विडी पेटवण्याकरिता पेटवलेली काडी, हाताला चटका बसेपर्यंत हातातच राहिली. राधाकाकूंनी नेहमीप्रमाणे त्यांना घरात चलायची ताकीद दिली नाही. साऱ्या जगाला नावे ठेवणारी माली विस्फारलेल्या नजरेने शांताकडे पाहत होती. पोरांचे क्रिकेट क्षणभर थांबले. मधू चाळीच्या पहिल्या मजल्यावर येऊन आपल्या खोलीचा दरवाजा उघडून तो बंद करीपर्यंत चाळीतील सारी माणसे स्तब्ध होती. सर्वांच्या नजरा मधूच्या बायकोवर केंद्रित होत्या. चाळकऱ्यांनी आश्चर्याने केलेला ' आ ' मधूने दरवाजा बंद केल्यावर बंद केला !

प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होते. परमेश्वराच्या लहरीपणालाही सीमा आहे की नाही ? या विसंगतीचा अर्थ कसा लावायचा ? मधूच्या बायकोमुळे, तिच्या असामान्य लावण्यामुळे, नकळत का होईना, पण चाळीतल्या लोकांचे लक्ष आज मधूकडे गेले ! मधू आणि त्याची बायको यांची तुलना करण्याकरिता का होईना, मधूचे नाव बोलण्यात निघू लागले !

मधूच्या लग्नाने मधूचा कायापालट झाला. जादूची कांडी फिरवल्यागत शांताने घराचे रूप पालटून टाकले. शांताच्या प्रत्येक कृतीने चाळकऱ्यांच्या विस्मयात भर पडू लागली. प्रत्येकजण मधूचा हेवा करू लागला. तिच्या सौंदर्याची तारीफ केली गेली नाही, असा एक दिवसही जात नसे. आपल्या निर्मळ प्रसन्न हास्याने तिने सर्वांना आपलेसे करून सोडले होते. झाडून साऱ्या बायकासुद्धा तिच्या सौंदर्यावर फिदा होत्या ! माली तर कोणत्या ना कोणत्या निमित्ताने शांताकडे जाई, तिच्या गालावरच्या तिळाकडे डोळे भरभरून पाहत असे आणि घरी जाऊन आपल्या गालावर कृत्रिम ' ब्युटिस्पॉट ' उमटवीत असे.

मी अधूनमधून मधूकडे जात असे. मधू माणसात आल्याबद्दल मला बरे वाटत होते. एकाकी, जगाने वाळीत टाकल्यासारखा वागणारा मधू उत्साहाने ओसंडून वाहत होता. लग्न होऊन आल्यापासून मधूने शांताच्या सौन्दर्याविषयींची प्रशंसाच ऐकली. मधू त्यामुळे फुलून उठला. त्याच्या आयुष्याला अर्थ आला. त्याच्या आयुष्यात दुसरे काहीच वैशिष्टयपूर्ण नव्हते. त्यामुळे त्याला शांताच्या कोडकौतुकाचा हव्यास वाटू लागला.

मधू ऑफिसमध्ये नव्यानव्या ओळखी करू लागला. चाळीतील सर्व मंडळीही मधूच्या घरी जाऊ लागली. मधूचे घर भरलेले दिसू लागले. शांता नव्यानवलाई-

मुळे सर्वांचे आगत-स्वागत करी आणि आलेल्यांकडून कौतुकाची पावती घेई !

नव्यानवलाईचे दिवस संपले होते. पण मधूच्या घरातील वर्दळीला खळ नव्हता. मात्र आता स्त्रीवर्ग कमी होऊन पुरुषांची संख्या वाढली होती ! मधूची शिलकी रक्कम शांताला सजवण्यात खर्च होऊ लागली. नवीनवी सौन्दर्यप्रसाधने, हरतऱ्हेच्या साड्या घरात येऊ लागल्या. शांताला प्रथम प्रथम खूप आनंद झाला. तिला वाटे, नवरा कुरूप असला तरी त्याला मन आहे. त्याला माझे कौतुक आहे. पण तिचा हा भ्रम लवकरच नाहीसा झाला !

मधूचे कौतुक प्रेमापायी नव्हते. त्याला फक्त एकच हौस होती; की ज्याने त्याने शांताच्या सौन्दर्याचे वर्णन करावे ! मधूचा हेवा करावा ! तिच्या सौन्दर्याचे वर्णन ऐकण्याकरिता तो आतुरलेला असे ! 'मधू लेका, भाग्यवान आहेस. काय सुंदर बायको पटकावलीस !' हे वा अशा अर्थाचे कुणी काही बोलले की त्याला कृतार्थ झाल्यासारखे वाटू लागले.

कामावरून घरी येताना बरोबर कोणाला ना कोणाला तरी आणण्याची त्याला सवयच लागली. शांताची कुचंबणा होऊ लागली. मधूचा स्वभाव ओळखून आंबट शौकीनांची मधूभोंवती गर्दी होऊ लागली. मधू कुणाला घेऊन आला, की शांताला बाहेर येऊन बसावे लागू लागले. ती आली नाही तर मधू हाक मारून तिला बाहेर बोलावी. तिला नाइलाजाने बाहेर येऊन बसावे लागे आणि हे मधूचे तथाकथित मित्र शांताला न्याहाळीत बसत ! शांताला मेल्यागत होत असे. कुणीतरी ठरल्याप्रमाणे तिची स्तुती करी. मधू हलका फुलका होऊन जाई आणि स्वतःशीच हसे.

तिची स्तुती कुणी केली नाही तर तो कावराबावरा होई, त्याला चुकल्याचुकल्यासारखे वाटे. आणि त्याला हा तिचाच दोष वाटे ! लोक निघून गेल्यावर अशीच का बसलीस, हीच साडी का नेसलीस, घुश्यात का बसलीस, वगैरे प्रश्नांची शांतावर सरबत्ती होऊ लागली. शांताला कळेना की, नवऱ्याला कोणत्या शब्दांत आणि काय सांगावे ? नवऱ्याच्या डोक्यातले हे वेड कसे दूर करावे हे तिला कळेना. आजूबाजूला असे कोण नव्हते, की आधार वाटून मन मोकळे करावे ! तिला काहीच सुचेना तेव्हा न राहवून तिने आपल्या आई-वडिलांना बोलावले, तरी पण तिला नेमके काय सांगायचे होते, ते ती सांगूच शकली नाही. मुलीचे जावई जे कौतुक करत होता, ते पाहून आई-बाप खूषच झाले. माणसे जोडली पाहिजेत, असा उपदेश करून ती मंडळी निघून गेली. नेहमी नेहमी येणाऱ्या मंडळींबद्दल तिने तक्रार करून पाहिली, पण त्याचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही. दोघांचे खटके उडू लागले. कुणाविषयी कितीही वाईट सांगितले तरी मधूवर काही परिणाम होईना. त्यातल्या त्यात शांतावर एकच मेहरबानी होती की, चाळीतील पुरुषमंडळी आता कमी झाली होती ! म्हणजे त्यांना मधू बोलावत नसे असे नाही किंवा त्यांना यायची इच्छा नसे असेही नाही ! पण त्यांच्या गृहमंत्र्यांकडून आडकाठी घेतली जाऊ लागली !

शांताने हरतऱ्हेने मधूला सांगायचा प्रयत्न केला, मधूवर काही परिणाम होईना. तो लोकांना घेऊन येतच राहिला. तिने आडमुठेपणा करून पाहिला, पण मग मधूचा संताप आवरणे तिला जड जाऊ लागले. तो यायच्या वेळी तिला मुखवटा सजवून हसतमुखाने स्वागताला हजर राहणे भाग पडू लागले! हे मधूकरिता तिने केले असते, पण जी निर्लज्ज माणसे मधूबरोबर येत त्यांच्या नजरांचा अर्थ तिला हैराण करी.

मधूच्या चमत्कारिक वागण्यामुळे शांताच्या मनात मधूविषयी किळस निर्माण झाली, चीड उत्पन्न झाली. तिचा हसरेपणा लुप्त झाला. ती अबोल, अंतर्मुख बनली. दररोजच्या या संकटाला कसे तोंड द्यावे ते तिला कळेना. ती कठोर बनली!

आणि एक दिवस स्फोट झाला. मधू नेहमीप्रमाणे दोन-तीन टोळभैरव घेऊन घरी आला. शांताने दुरून पाहिले. तिच्या कपाळात तिडीक उठली. तिने दरवाजा उघडला नाही. दारावरचे धक्के वाढले. हाकांत धमकी दिसू लागली. शांता येणारे रडू आवरत व नशिबाला दोष देत दरवाजाला पाठ लावून उभी राहिली.

सबंध चाळ गोळा झाली. मधूचे दोस्त निर्लज्जासारखे उभे होते. शांताचा धीर सुटला. कळत नकळत शांताच्या हातून दाराची कडी उघडली गेली. दरवाजा सताड उघडला गेला व तिच्या निश्चयाबरोबर तीही खाली कोसळली!

पण कठोरपणाने शांता वर उठली. अश्रू आवरून अत्यंत निश्चयी सुरांत ती मधूच्या मित्रांना म्हणाली, 'माफ करा, पण इत:पर इथं येऊ नका!' तिचा तो नूर पाहून त्या लोकांनी मागच्या मागे पळता पाय काढला. चाळकरी मंडळी तिच्या या अवताराने आश्चर्यचकित होऊन स्वत:च्या खोल्यांत परतली. आणि मधू? मधू संतापाने थरथरत होता. त्याला खूप बोलायचे होते, पण संतापाने तोंडाबाहेर शब्द फुटत नव्हता. तिरीमिरीत त्याने दरवाजा बंद करून घेतला. आणि सटासट तीन-चार थपडा शांताच्या गालावर उठवल्या! एकदम एका कोपऱ्यात जाऊन थरथरत बसला!

शांताचे रडू आटले होते. रडायचे कशाला? मध्येच मधू ओरडला–

'काय, आरंभलंयस काय तू? मला वाटलं नव्हतं तू एवढी माणूसघाणी असशील म्हणून!'

'तुम्हांला एवढं कसं कळत नाही? कोणत्या भाषेत सांगू मी?'

'काही सांगू नकोस, ते लोक मला काय म्हणतील? माझंच चुकलं. त्यांना हात धरून बसवायला पाहिजे होतं! पण तू काय, या अवतारात होतीस!'

'कशाला तुम्ही हा तमाशा आरंभलाय? मला वाटलं होतं की, केव्हा ना केव्हा तुमच्या सारं लक्षात येईल. हे सारं संपून जाईल. पण ती शक्यता दिसली नाही. तुम्ही जे कोण हे मित्र आणता, ते कशाला येतात इथं? माहीत आहे? त्यांनी तुमचा स्वभाव ओळखलाय्. याला बायकोची स्तुती आवडते, हे ओळखून तुमचे हे

मित्र माझ्या शरीराकडे आधाशासारखे पाहत असतात. त्यांच्या नजरा माझ्या सबंध शरीरावरून फिरतात! त्या नजरांत मी गुदमरून जाते! हे तुमचे मित्र तुमच्यासमोर–प्रत्यक्ष माझ्या नवऱ्यासमोर–नजरांनी माझ्याशी व्यभिचार करतात! त्यांच्या त्या बुळबुळीत, रखरखीत नजरांनी माझं शरीर बरबटतंय! कसं चालतं तुम्हांला हे! कसं कळत नाही तुम्हांला?"

'हे बघ, नाही त्या कल्पना लढवू नकोस. मला काहीही ऐकायचं नाही. पण एवढं लक्षात ठेव, असा प्रसंग परत आणू नकोस.'

झाले. मधूचे बोलणे संपले. त्याने विषय आवरता घेतला. तिच्या बोलण्याचा काही म्हणजे काही उपयोग झाला नव्हता! जणू काही झालेच नाही अशा पद्धतीत मधू गप्प राहिला.

शांताला एकच आशा होती, तो तोंडाने बोलला तरी त्याच्या मनावर काही ना काही परिणाम झाला असेल! परंतु दुसऱ्या दिवशीही जेव्हा त्याच्याबरोबर दोघेजण घरी येताना तिने पाहिले, तेव्हा तिला काही सुचेना. या असल्या जिण्याचा काय उपयोग? सहनशीलतेची मर्यादा ताणून ताणून तुटली होती! तिने समोरच्या दरवाजाला कडी घातली. आणि मधू जिना चढताना पाहिल्यावर मागच्या दर-वाजाने पसार झाली.

मधूला वाटले की, कालचीच पुनरावृत्ती होणार! मधूने हाकांचा सपाटा लावला. दार तोडण्याची धमकी दिली. शांता नाहीच तर दार कोण उघडणार?

शांता निघाली ती थेट आमच्या घरी येऊन पोहोचली. तिला पाहून मी व सुधा आश्चर्यचकित झालो. ती आली ती तिने सुधाला मिठीच मारली. इतका वेळ मनाला घातलेला आवर मोकळा झाला. बांध फुटला! ती अगदी हमसाहमशी रडू लागली. कोणत्या प्रसंगाने ती आलीय, तिच्यावर संकट काय आहे, याची आम्हांला चटकन कल्पना येईना. सुधा तिला शांत करू लागली. पहिला कढ ओसरल्यावर शांतालाही धीर आला. मी न राहवून विचारले,

'हे काय, तुम्ही अशा कशा आलात? काय झालं? मधू कुठं आहे?'

शांता बराच वेळ गप्प राहिली. काय सांगावे, हे तिला ठरवता येईना.

"कृपया मला काही विचारू नका. पण उद्या सकाळी मला वडिलांकडे पोचवा-यची व्यवस्था करा. यांना थोड्याच वेळात पत्ता लागेल. मला घरी घेऊन जाण्या-करिता म्हणून ते इथे येतील–मारझोडही करतील; पण तुम्हांला माझी विनंती आहे, मला त्या नरकात जाऊ देऊ नका! मी भीक मागतेय. मला पाठची बहीण समजा आणि माझं रक्षण करा.' ती परत रडू लागली.

आम्ही दोघे एकमेकांच्या तोंडांकडे पाहत राहिलो. मला त्या दोघांच्या खटक्यांची कुणकुण लागली होती, पण शांता घरातून बाहेर पडण्याचा प्रसंग येईलसे मात्र वाटले नव्हते आणि आमच्याकडे येईल याचीही कल्पना नव्हती. मधू कोणत्याही क्षणी

येण्याची शक्यता होती आणि त्याला आम्ही कसे आडवू शकलो असतो, तेही मला कळेना. आम्ही मोठ्या अडचणीत आलो होतो. पण शांताची हालतही पाहवत नव्हती. तिचा विश्वासघात करायचेही धैर्य होत नव्हते. सुधा आणि मी काही न सुचल्याने एकमेकांच्या चेहऱ्यांवरचे भाव टिपू लागलो. या परिस्थितीत काय करायचे ते काही शांतासमोर आम्ही बोलू शकत नव्हतो. मधू कोणत्याही क्षणी अपेक्षित होता. शांता अत्यंत विश्वासाने निश्चिंत झाली होती ! कात्रीत सापडलो होतो आम्ही !!

सुधा शांताला घेऊन स्वयंपाकघरात गेली. ती आपले मन मोकळे करून करून सर्व सांगत होती. मी पुढे काय होणार या विवंचनेत होतो. एक नवऱ्याकडे परत न जाण्याचा निश्चय करून आलेली विवाहित स्त्री, एक रात्रीकरिता का होईना ठेवून घेणे काही सोपे नव्हते. आणि शांताचा नवरा माझा मित्र होता. तो उद्या मलाच कोर्टात खेचील. बेचैन झालो, नसते लफडे गळ्यात आले होते !

आणि मधू येऊन थडकला ! माझ्या छातीत गोळा उठला. मधूने शांता आली आहे का विचारले. मी मानेनेच होकार दिला. मधूने लागलीच शांताला हाक मारली. शांता काय करते हा मला प्रश्न होता.

शांता स्वयंपाकघर आणि बाहेरची खोली यांच्या मधल्या दरवाजाच्या कडेला टेकून उभी राहिली. मला तिच्या चेहऱ्याकडे पाहवेना. शांता निर्माल्यवत झाली होती. तिच्या शरीरातले सारे रक्त, सारे चैतन्य जणू नाहीसे झाले होते. ती शुष्क झाली होती. आणि दाराच्या चौकटीच्या आधारामुळे ती उभी होती. मी मधूशी काहीतरी बोलणार एवढ्यात मधू म्हणाला–

‘ तू इकडं आलीस होय ? मी तिकडं हाका मारमारून दमलो. तू कुठं निरोपही नाही ठेवलास ! बरं आलीस ते आलीस आणि हे पातळ नेसून आलीस ? घरात दुसरी साडी नव्हती का ? ’

पुढच्याच क्षणी शांता धाडकन खाली कोसळली !

# तो मी नव्हेच!



अॅड. माधव कानिटकर

लेखांक : ३

*अमरिकसिंगाच्या रूपाने जयपालने जणू दुर्दैवालाच माळ घातली. तिच्या सवतीच्या, बलजीतकौरच्या, साहाय्याने आठ महिन्यांची गरोदर असतानाच जयपाल माहेरी, सरदार लामसिंगांकडे पळून आली. पाठोपाठ अमरिकसिंगही तिला परत नेण्यासाठी आला. लामसिंगांनी नकार देताक्षणीच त्याने रिव्हॉल्व्हर झाडले आणि तो स्वतःच्याच आठ महिन्यांच्या निष्पाप बाळाचा कर्दनकाळ झाला. जयपाल व लामसिंग जबर जखमी झाले. सरदार अमरनाथ आणि अमरिकसिंग हे दोघेही बेहोष होऊन अस्ताव्यस्तपणे कोसळले ....*

*सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगांनी रीतसर पंचनामा करून सर्व जखमींना हॉस्पिटलमध्ये नेण्याची व्यवस्था केली. सरदार लामसिंग जबानी दिल्यावर तासातच मरण पावले. . .*

*सरदार अमरनाथांची प्रकृती लवकरच सुधारली. जयपाल सतत सात महिने मानसिक, शारीरिक हालांशी झुंजत होती. अमरिकसिंग लवकरच खडखडीत बरा झाला. दरम्यानच्या काळात अमरिकसिंगाने स्वतःच्या विकृत कल्पनांनी जयपाल, तिची बहीण हरबीर, लामसिंग यांच्या प्रतिष्ठेचे वाभाडे काढणारी बेमालूम कथा तयार केली. मॅजिस्ट्रेटसमोरील त्याच्या या निवेदनाने सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगही स्तिमित झाले. आरोप प्रत्यारोपांचा हा सामना चांगलाच अटीतटीचा होणार असे दिसू लागले.... इन्द्रसिंगांच्या मनाने आवाज दिला असेल, " होऽऽश्याऽऽर." ...*

चौदा दिवसांचा अवधी हां हां म्हणता संपला आणि ४ मे १९५० ला अमरिकसिंगाला पुन्हा एकदा अंबाल्याच्या फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात आणण्यात आले. या वेळी अमरिकसिंगाने वकील दिला होता. केस पुकारली गेली आणि अमरिकसिंगाने नाटके सुरू केली. आज सरकार पक्षाचे साक्षीदार हजर होते. पोलिसांचे चार्जशीट तयार होते. अवघ्या चौदा दिवसांत अंबाला पोलिसांनी भरपूर पुरावा गोळा केला होता. अमरिकसिंगाने १५ फेब्रुवारी १९५० ला सरदार लाभसिंग, सरदार अमरनाथ आणि जयपालकौर यांना गोळ्या घातल्या तो भीषण प्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहणारे (Eye-witnesses !) बरेच साक्षीदार होते. त्यांची स्टेटमेंटस् रेकॉर्ड झाली होती. एक खास अधिकारी मद्रासला रवाना झाला होता. त्याने अमरिकसिंगाच्या घराची झडती घेतली होती. अनेक स्त्रियांबरोबर अमरिकसिंगाने स्वतःचे काढून घेतलेले फोटो आणि अनेकींशी त्याचा अनैतिक संबंध होता असे सिद्ध करू शकणारी प्रेमपत्रे अधिकाऱ्याने पंचनामा करून जप्त करून आणली होती. शेजाऱ्या-पाजाऱ्यांची स्टेटमेंटस् त्याने रेकॉर्ड केली होती. प्रत्येक शेजारी म्हणत होता,

" अमरिकसिंगाला मी ओळखतो ! कसा ? एक नंबरचा दारुड्या आणि लफडेबाज म्हणून ! "

अमरिकसिंगाविरुद्ध पोलिसांनी पुराव्याचा डोंगर जमा केला होता आणि नेमका आजच अमरिकसिंगाच्या वकिलांनी अमरिकसिंगाला जामिनावर सोडण्यात यावे असा अर्ज मॅजिस्ट्रेटसाहेबांना सादर केला. त्यांचे म्हणणे असे होते की, आता पोलिसांची चौकशी संपलेली आहे, चार्टशीट तयार आहे ! मग आता आरोपी अमरिकसिंगाला जामिनावर सोडायला काय हरकत आहे ? पाहिजे तर फार

मोठ्या रकमेचा जामीन (Heavy bail ! ) घ्या ! शिवाय अमरिकसिंग सकाळी एकदा आणि संध्याकाळी एकदा अशी दिवसातून दोनदा अंबाला पोलीस स्टेशनला हजेरी देऊन जाईल. मग तर झाले ? शिवाय तो कोर्टात हजर राहीलच. कारण त्याला कायदा आणि न्यायव्यवस्था यांना टाळण्याची इच्छा नाही !

(Your worship ! accused has no desire to evade the provisions of law ! )

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी सरकारी वकिलांकडे पाहत त्यांना विचारले, " तुमचं काय म्हणणं आहे ? " आणि सरकारी वकिलाने अमरिकसिंगाच्या जामिनाच्या अर्जाला हरकत घेतली ! कसून विरोध केला ! त्यांनी सांगितले की, " मॅजिस्ट्रेटसाहेब, जो आरोपी एक खून करतो आणि दोन खुनांचा प्रयत्न करून स्वत: आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो त्याचा भरंवसा काय ? कशावरून तो आत्महत्या करणार नाही ? पळून जाणार नाही ? की सरकार पक्षाच्या महत्त्वाच्या साक्षीदारांना धमक्या देणार नाही ? जिवाशी गाठ पडली, की माणूस वाटेल तितक्या रकमेचा जामीन आणण्याची व्यवस्था करतो ! नुसते सकाळ-संध्याकाळ पोलीसस्टेशनवर हजेरी दिली म्हणजे झाले ? उरलेल्या वेळात आरोपी स्वस्थ बसेल ? माझा या आरोपीला जामीन द्यायला कसून विरोध आहे, युवर वर्शिप ! "

अमरिकसिंगाचे वकील ताड्कन उभे राहिले. त्यांनी पुन्हा एकदा मॅजिस्ट्रेट-साहेबांना म्हटले, " साहेब ! माझे सरकारी वकीलमित्र केवळ विरोधासाठी विरोध करताहेत. ते त्यांची ड्युटी करताहेत. किती झालं तरी ते एक मोस्ट ओबिडियंट गव्हर्न्मेंट प्रॉसिक्युटर आहेत ! जामीन मिळवणे हा आरोपीचा घटनेने मान्य केलेला महत्त्वाचा कायदेशीर अधिकार आहे, याचा विचार व्हावा, साहेब ! "

सरकारी वकील खवळले. खवचटपणाने अमरिकसिंगाच्या वकिलाकडे पाहत त्यांनी म्हटले, " माझ्या वकीलमित्रांनी मला ' मोस्ट ओबिडियंट ' म्हणून आत्ता जे सर्टिफिकेट दिलं त्याची मला त्यांच्याकडून जरुरी नव्हती ! तरीदेखील ते स्वीकारतो आणि त्यांचे मन:पूर्वक आभार मानून ( I am thankful to my learned friend ! ) विनंती करतो की, जसा आरोपीचा जामीन मागण्याचा हक्क घटनेने मान्य केलेला आहे, तसाच काही खास परिस्थितीत एखाद्या माणसाला बेमुदत तुरुंगात ठेवण्याचा अधिकार राज्य सरकारला त्याच घटनेने दिलेला आहे ! त्यासाठी फक्त कोर्टाची परवानगी लागते आणि तीच मी सरकारतर्फे मागतोय याचाही विचार व्हावा, युवर वर्शिप ! " खाली बसता बसता त्यांनी अमरिकसिंगाच्या वकिलांना टोमणा मारलाच ! त्यांच्याकडे पाहत सरकारी वकील म्हणाले, " मी असं धरून चालतो, की माझ्या वकीलमित्रांना इतपत ज्ञान असेल की, भारताची घटना ही फक्त बदमाश गुन्हेगारांसाठी लिहिलेली नाही ! "

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी दोन्ही वकिलांना थंड केले. खाली मान घालून बरेच काही

लिहिले आणि अर्जाचा निकाल दिला. आरोपी अमरिकसिंगाचा जामिनाचा अर्ज मॅजिस्ट्रेटसाहेबांनी फेटाळून लावला !

सरकारी वकिलांना कल्पना तरी होती का, की त्यांनी केलेला विरोध पुढे फार मोठा महत्त्वाचा आणि त्यांना बढती देणारा ठरेल म्हणून ?

आपल्याला जामीन मिळत नाही हे समजल्याबरोबर अमरिकसिंगाने नाटक सुरू केले. कोर्टातल्या एकाही इसमाला कल्पना आली नाही की, अमरिकसिंगाचे हे नाटक काहीच नव्हे. ही फक्त तो पुढे करणार असणाऱ्या मोठ्या नाटकाची नांदी आहे ! अमरिकसिंगाने कोर्टाला ओरडून सांगितले, "साहेब ! मला तारीख पाहिजे !"

"कशासाठी ! तुमचे वकीलसाहेब तर हजर आहेत !"

"मला काल हार्ट अ‍ॅटॅक आलाय ! मला प्रकृतिअस्वास्थ्यामुळं इथं बसवत नाही !"

"मग इतका वेळ कसा बसलास ? तू आजारी आहेस हे तुझ्या वकीलसाहेबांना-देखील ठाऊक नाही ! No ! तारीख मिळणार नाही !"

पण अमरिकसिंग असा सुदैवी की त्या दिवशी वेळ कमी पडल्यामुळे ( for want of time ! ) अखेर तारीख पडलीच !

(But Amriksingh had the devil's own luck ! )

मॅजिस्ट्रेट कोर्टामध्ये आरोपींचीदेखील वर्गवारी असते ! नुसती शिवीगाळ करणारे, लहान सहान चोऱ्या करणारे, रॅश ड्रायव्हिंग करणारे, असे लहान सहान गुन्हेगार जामिनावर मोकळे असतात. तारीख असली की येऊन कोर्टातल्या बाकावर बसतात. पण खून करणारे, खुनाचा प्रयत्न करणारे, बलात्कार करणारे, घरफोडी करणारे ! अशी या क्षेत्रातली 'नामवंत' मोठी माणसे (!) जामिनावर नसतात ! त्यांना जामीन दिला जात नाही ! तारीख असली की त्यांना कोर्टातल्या समोरच्या खास लाकडी पिंजऱ्यात कडेकोट बंदोबस्तात, पोलिसांच्या पहाऱ्यात बसावे लागते. अमरिकसिंगाची आज तारीख होती. पोलीस पहाऱ्यात त्याला कोर्टात आणण्यात आले. लाकडी पिंजऱ्यात ठेवण्यात आले. पिंजऱ्याच्या दोन्ही बाजूंना पोलीस उभे होते.

असंख्य लोक कोर्टात हजर होते. अनेक पोलीस होते. सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग होते. इतर अनेक पोलीस ऑफिसर्स होते. अमरिकसिंगाची केस पुकारली गेली. ज्युडीशियल क्लार्कने त्याचे नाव मोठ्याने पुकारले, "अमरिकसिंग तेजासिंग." सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग घाईघाईने पिंजऱ्यात शिरले. त्यांनी मॅजिस्ट्रेटना सलाम ठोकला. अमरिकसिंगाला आणण्यासाठी कॉन्स्टेबल लाकडी पिंजऱ्याजवळ गेला आणि गोंधळला. गडबडून गेला. भांबावला ! पिंजऱ्यात अमरिकसिंग नव्हता. होय ! इतक्या सगळ्या लोकांच्या नजरा चुकवून अमरिकसिंग पळाला होता.

कॉन्स्टेबल पुन्हा एकदा ओरडला,

"अमरिकसिंग तेजासिंग !" सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग त्यांच्या पोलीस स्टेशनच्या कॉन्स्टेबलवर ओरडले, "अरे, आण त्याला लवकर ! साध्या साध्या गोष्टींना वेळ लावता ? अक्कल नाही एवढी की हे कोर्ट आहे !" आणि कॉन्स्टेबल एकटाच परत आला. इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांना त्याने भीत भीत सांगितले, "साहेब ! अमरिकसिंग पळाला !" सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगांना घाम फुटला. त्यांच्या पायाखालची वाळू सरकली. त्यांनी देखील भीत भीत मॅजिस्ट्रेटसाहेबांना सांगितले, 'साहेब ! अमरिकसिंग पळाला !' काय झालंय ते लोकांना कळलं. आणि कोर्टात हलकल्लोळ माजला. 'अमरिकसिंग पळाला ! अमरिकसिंग पळाला !' असे ओरडत लोक कोर्टाबाहेर धावत सुटले ! पंजाबमधली संध्याकाळची वृत्तपत्रे तडाखेबंद संपली !

"मॅजिस्ट्रेट कोर्टातून खुनी इसम पळाला !"

"केस कोर्टात आणि आरोपी गुल !"

इंग्रजी पेपर्स म्हणत होते.

"DESPERATE CRIMINAL ESCAPES FROM COURT !'

"कुप्रसिद्ध खुनी अमरिकसिंग फरारी !"

पोलिसी चक्रे वेगाने फिरू लागली. सायरनचा आवाज देत पोलिसांच्या जीपस् आणि व्हॅनस् अमरिकसिंगाला शोधण्यासाठी धावू लागल्या. अंबाला रेल्वे स्टेशन, बसेसचे अड्डे इथे पोलीस बंदोबस्त अवघ्या तासात वाढला, येणाऱ्याजाणाऱ्या प्रत्येक माणसाकडे नीट पाहून पोलीस खात्री करून घेत होते की, 'हा अमरिकसिंग नाही !' अंबाल्यातून बाहेर जाणारी प्रत्येक प्रायव्हेट कार, लॉरी, टॅक्सी, पोलिसांनी थांबवली ! कसून झडती घेतली ! प्रत्येक माणसाकडे पाहून खात्री पटवून घेतली की 'हा अमरिकसिंग नाही !'

दुपारी पंजाब राज्याच्या इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीसने C. I. D. अधिकाऱ्यांची खास सभा घेतली. त्यांचा भलताच गैरसमज झाला. त्यांना वाटले इन्स्पेक्टर इन्द्रसिंग यांनी अमाप पैसा खाऊन मुद्दामच अमरिकसिंगाला पळून जायची संधी दिली असेल. ते खवळले. त्यांनी पोलीस कमिशनरला फायर केला. सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग यांचे 'प्रीव्हियस कॉन्फिडेन्शियल रेकॉर्ड मागवले. पोलीस कमिशनरनी असिस्टंट पोलीस कमिशनरला फायरिंग दिले. असिस्टंट पोलीस कमिशनरने इन्स्पेक्टर ऑफ पोलीस अंबाला पोलीस स्टेशनला फायर केला. आणि इन्स्पेक्टर ऑफ पोलीस अंबाला पोलीस स्टेशन यांनी सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग यांना फायर केले. 'नालायक ! नालायक !' हा शब्द असा वरपासून खालपर्यंत उतरत उतरत सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगांच्यापर्यंत पोचला ! इन्स्पेक्टरसाहेब सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगांना बोलत होते, "नालायक ! तुम्ही कोर्टात हजर असताना खुनी आरोपी पळतो ? मग तुम्ही काय करीत होता ! व्हाय डोंच्यू ओपन ए सलून !"

सरकारी नोकरी म्हणजे काय ते सबइन्पेक्टर इन्द्रसिगांना प्रथमच कळले ! इथे केवळ स्वत:च्याच चुकीमुळे धोका असतो असे नव्हे, तर कधीकधी आपल्या हाताखालच्या माणसांच्या चुकीमुळे आपण धोक्यात येतो ! का ? कारण सरकार म्हणते, " तुमची कदाचित चूक नसेल पण अल्टिमेट रिस्पॉन्सिबिलिटी (!) तुमचीच होती ना ? गेट आऊट ! वुई डोन्ट वाँट युवर होपलेस सर्व्हिस ! "

ज्या अमरिकसिंगाला पकडत असताना " इतकी सोपी केस आजपर्यंतच्या सर्व्हिसमध्ये कधी मिळाली नव्हती ! " असे सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग म्हणाले होते, त्यांची सर्व्हिसच अमरिकसिंगाने पळून जाऊन धोक्यात आणली ! त्यांचे नशीब इतकेच की त्यांचे प्रीव्हियस कॉन्फिडेन्शियल रेकॉर्ड स्वच्छ होते. जे दोन कॉन्स्टेबल त्या दिवशी कोर्टात आरोपीवर नजर ठेवण्यासाठी लाकडी पिंजऱ्याजवळ उभे होते त्यांना कमिशनरसाहेबांनी सस्पेंड केले आणि सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग यांची अंबाला पोलीस स्टेशनवरून ट्रॅन्स्फर केली ! त्यांच्या जागी नवीन नेमणूक झालेल्या सबइन्स्पेक्टरचे नाव होते चौधरी राधाकिशन. त्यांनी ही केस इथून पुढे हाताळायची होती आणि ज्याचे रेकॉर्ड चांगले आहे तो सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग ? ट्रॅन्स्फर ! नालायक कुठचा !

वरिष्ठ C. I. D. अधिकाऱ्यांची मीटिंग दुपारी चालूच होती. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, पंजाब स्टेट, बोलत होते " पाहा ! आरोपी जर व्यसनी असेल तर तो पोलीस कस्टडीतून पळाल्यावर प्रथम त्याचे व्यसन एंजॉय करतो ! आरोपी अमरिकसिंगाला काही व्यसने आहेत का ? "

" आहेत सर ! दारू आणि बाया ! "

" मग तुम्ही असं करा आज संध्याकाळपासूनच दारूचे गुत्ते आणि वेश्यांचे अड्डे या दोन ठिकाणी रात्रभर बसा ! एकही गुत्ता सोडू नका ! माझी खात्री आहे, उद्या सकाळच्या आत आरोपी अमरिकसिंग पकडला जाईल. वर्णन लक्षात आहे ना ? हे वाचा ! ' डाव्या डोळ्याच्या भुवईवर जखमेचा व्रण, दोन्ही गालफडांवर जखमा, उजव्या पायाच्या नळीवर पुढच्या बाजूला जखम ! उंची ? पाच फूट नऊ इंच ! ' चला निघा ! बी क्विक ! वुईश यू ऑल सक्सेस ! "

त्या रात्री पंजाबमधल्या प्रत्येक वेश्यागृहात गिऱ्हाइकाचे नाव विचारले जावे अशा सूचना दिल्या गेल्या व प्रत्येक बाई गालावर चापट मारून आपल्या गिऱ्हाइकाला विचारत होती, " बोलो ! तुम्हारा नाम क्या है ?" त्यात कोणी हरनामसिंग होता ! कुणी गुरनामसिंग होता ! पण अमरिकसिंग नव्हता ! जाणारे प्रत्येक गिऱ्हाईक एकेका वरिष्ठ C. I. D. ऑफिसरच्या नजरेखालून जात होते ! पण त्यात अमरिकसिंग नव्हता.

सकाळी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीसला प्रत्येक C. I. D. ऑफिसरने रिपोर्ट दिला की, I am sorry sir ! I could not arrest Amriksigh ! पंजाब-



**अंबाला पोलीस अमरिकसिंगाच्या शोधात...**

मधल्या प्रत्येक दारूच्या गुत्यावर आणि पंजाबमधल्या ‘ कॅनेडी ब्रिज ’, ‘ त्रिभुवन लेन ’, ‘ पेपर मिल लेन ’, ‘ फोरास रोड ’, ‘ किका स्ट्रीट ’, ‘ सुखलाजी स्ट्रीट ’ या प्रत्येक वेश्यांच्या वस्तीत प्रत्येक वेश्येकडे एकेक वरिष्ठ C. I. D. ऑफिसर त्या रात्री होता ! तरी अमरिकसिंग मिळाला नव्हता ! अमरिकसिंग पंजाब पोलीसपेक्षा अधिक हुशार ठरला होता ! आणि ऑफिसमध्ये दोन्ही हात पाठीमागे घेऊन रागारागाने फेऱ्या मारणारा तो इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, स्टेट ऑफ पंजाब, विचार करीत होता की, ‘ अमरिकसिंग कसा पळाला ? कसा पळाला ?’

भर कोर्टातून अमरिकसिंग पळाला होता. त्याला त्याच दिवशी पकडण्याचे पंजाब पोलिसांचे प्रयत्न फुकट गेले होते. दुसऱ्याच दिवशी पंजाब आणि मद्रासमधल्या प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये पंजाब पोलिसांचे सर्क्युलर गेले ! त्यात अमरिकसिंगाचे पूर्ण वर्णन होते. त्या सर्क्युलरमध्ये पंजाबच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा सक्त हुकूम होता की ‘ जिवाचं रान करा पण शक्य तितक्या लवकर या वर्णनाच्या अमरिकसिंगाला पकडा ! ’ पंजाबमधल्या सर्व प्रमुख वर्तमानपत्रांत अमरिकसिंगाचा स्पष्ट आणि ठळक फोटो छापला गेला. अमरिकसिंग हा पोलिसांना हवा असलेला गुन्हेगार आहे म्हणून जाहीर केले गेले !

(Amriksingh was declared as proclaimed offender ! )

एवढेच नव्हे, पोलीस कमिशनरनी सहीशिक्क्यानिशी अमरिकसिंगाला वृत्तपत्रां-

तून जाहीर नोटीस दिली ! "अमरिकसिग तेजासिंग ! ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आपणहून पोलिसांपुढे हजर हो ! तसे केले नाहीस तर तुझी व्यक्तिगत मिळकत जप्त करण्यासाठी पोलीस योग्य ती कायदेशीर कारवाई करतील ! एवढेच नव्हे तर पंधरा दिवसांनंतर योग्य त्या कोर्टापुढे तुझ्या अनुपस्थितीतच साक्षीपुरावा नोंदला जाईल व त्याच्या परिणामांची जबाबदारी तुझ्यावरच राहील, याची दखल घे !"

अमरिकसिंग इतके धाडस करून पळाला होता तो काय स्वत:हून पोलीस स्टेशनवर हजर होण्यासाठी ? उलट ही नोटीस वाचून तो समजला असता की, आपल्याला पकडण्याच्या कामी पोलिसांनी आता हात टेकले आहेत, हाच या दमदाटी करणाऱ्या नोटिशीचा खरा अर्थ !

अमरिकसिंगाने स्वत:च्या सुपीक मेंदूतून अशी शक्कल काढली होती की पंजाब पोलिसांनी त्याला पकडले असते तरीदेखील त्यांना अमरिकसिंगावर खुनाचा आरोप सिद्ध करणे भारी पडले असते ! कदाचित तो निर्दोष सुटला असता. अमरिकसिंगाला पोलीस पकडू शकत नव्हते. अमरिकसिंग हजर होत नव्हता. अशी तब्बल तीन वर्षे गेली ! मधल्या काळात अमरिकसिंगाच्या अनुपस्थितीतच एक–दोन साक्षीदारांच्या साक्षी नोंदवून अंबाल्याच्या फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटने खटला सेशन कमिट केला. पुन्हा एकदा वर्तमानपत्रांत खळबळ माजली. स्फुटे आली, कायद्याच्या आणि न्यायदानाच्या या अजब पद्धतीला काही अर्थ आहे का ? अमरिकसिंगाविरुद्ध पुरावा भरपूर आहे. सरदार लाभसिंगांचा भीषण खून करताना त्याला प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहणारे साक्षीदार केव्हाही कोर्टात यायला, साक्ष द्यायला तयार आहेत ! अगदी समजा, एकतर्फी पुरावा नोंदवून घेऊन सेशन्स जज्जाने फाशीची सजा जरी अमरिकसिंगाला ठोठावली तरी फाशी द्यायचे कुणाला ? आहे कुठे अमरिकसिंग ?

वृत्तपत्रांतल्या या टीकेचा परिणाम चांगला झाला. पोलिसांनी ठरवले की आधी आरोपी अमरिकसिंगाला पकडायचे नि मग त्याच्याविरुद्ध केस चालवायची ! सरकारी वकिलांनी सेशन्स जज्जांना स्पेशल अर्ज दिला आणि अमरिकसिंगाची केस बेमुदत तहकूब करण्याची विनंती केली. ती मान्य झाली.

...आणि नंतरच्या या तीन वर्षांत पंजाबमधले लोक आता अमरिकसिंगाला विसरू लागले. लोक हे असे असतात ! त्यांना गर्दी करायला वेळ लागत नाही, चर्चा करायला वेळ लागत नाही आणि विसरायलाही वेळ लागत नाही ! अमरिकसिंगाला पकडण्याची आशा आता पंजाब पोलिसांनी सोडली होती ! त्यांना पुन्हा पुन्हा वाटत होते की आपल्या एका लहानशा चुकीमुळे एक बदमाश खुनी कायमचा सुटला !

वीस जून १९५३ चा दिवस. त्या दिवशी अंबाला पोलीस स्टेशनचे सबइन्स्पेक्टर

चौधरी राधाकिशन यांना नाईट ड्यूटी होती. रात्रीचे बारा वाजून गेले होते आणि अचानक अंबाला पोलीस स्टेशनवरचा फोन खणखणला ! सबइन्स्पेक्टर चौधरींनी रिसीव्हर उचलला ! पाठीमागे रेलून बसत त्यांनी सवयीप्रमाणे म्हटले, "अंबाला पोलीस स्टेशन ! सबइन्स्पेक्टर चौधरी हियर !" ऑपरेटरने त्यांना सांगितले " चौधरीसाहेब ! दिल्ली पोलीस तुमच्याशी बोलू इच्छितात ! प्लीज होल्ड ऑन !" सबइन्स्पेक्टर चौधरींच्या मनात आले, "दिल्ली पोलीस आपल्याशी बोलू इच्छितात ? आत्ता ? इतक्या रात्री ? काय भानगड आहे कुणास ठाऊक !" आणि पुन्हा एकदा फोन लागला. त्वरित पुढे झुकून बसत त्यांनी पुन्हा एकदा म्हटले, "अंबाला पोलीस स्टेशन ! सबइन्स्पेक्टर चौधरी स्पीकिंग !" आणि दिल्लीहून पोलीस ऑफिसरचा आवाज आला.

( " Hallo ! Is Amriksingh a proclaimed offender of your Police Station ?" )

(अमरिकसिंग नावाचा इसम तुम्हांला हवा आहे, हे खरं का ?)

सब इन्स्पेक्टर चौधरी जवळजवळ ओरडलेच (Yes ! He shouted back) त्याला गेली तीन वर्षे आम्ही शोधतोय !

" मग दिल्ली पोलिसांना त्याचे वर्णन कळवा !" सबइन्स्पेक्टर चौधरी ताडकन उठले ! घाईघाईत त्यांनी अमरिकसिंगाचे केस पेपर्स शोधून काढले आणि दिल्ली पोलिसांना त्याचे वर्णन सुरू केले. " अमरिकसिंग तेजासिंग ! उंची पाच फूट नऊ इंच ! डाव्या डोळ्याच्या भुवईवर व्रण . . . . आरोप ? सरदार लाभसिंग यांचं खून करणं ! दोन खुनांचा प्रयत्न करणं ! आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणं हे !' सबइन्स्पेक्टर चौधरींची उत्सुकता शिगेला पोचली ! त्यांनी दिल्ली पोलिसांना विचारले की, " अमरिकसिंगाची इतकी सर्व माहिती तुम्ही इतक्या रात्री का विचारलीत ? काही विशेष ? " आणि दिल्ली पोलिसांनी सांगितले, " होय, विशेषच आहे ! इथे एक ' खबरी ' यऊन बसलेला आहे ! त्याने आम्हांला अशी खबर दिली की, इथल्या क्वीन्स रोड (Queen's Road) वर असलेल्या 'अमृत हॉटेल'-मध्ये जो इसम उतरला आहे तोच तुम्हांला हवा असलेला अमरिकसिंग ! तो फक्त आजचीच रात्र दिल्लीत आहे. आणि उद्या दुपारच्या गाडीने दिल्ली सोडणार आहे ! खबरी पुढे म्हणतोय की, साहेब ! त्याला आता रात्री पकडायला जाण्यात फायदा नाही ! रात्री तो हॉटेलमध्ये नसणार ! उद्या ११–००, ११–३० वाजता तो हॉटेलवर येईल ! नक्की येईल !"

सबइन्स्पेक्टर चौधरींनी दिल्ली पोलिसांना धोक्याची सूचना दिली की, आरोपी अमरिकसिंग त्याला नक्की फाशी होणार, या भीतीपोटी निर्माण झालेल्या नैराश्याने पळाला आहे ! त्याला पकडताना काळजी घ्या !

( S. I. Chaudri warned the Delhi Police to be particularly

vigilant and take special precautions, because the man was a desperate criminal. )

दिल्ली पोलिसांनी सांगितले, " काळजी करू नका ! तुमचा अमरिकसिंग उद्याच इथून पाठवतो !"

( " Rest assured " said the voice over the wires, " your man will be delivered to you tomorrow ! " )

दुसऱ्या दिवशी सकाळी पावणेअकरा वाजल्यापासून दिल्लीतल्या क्वीन्स रोड-वरील अमृत हॉटेलसमोर अनेक वरिष्ठ C. I. D. अधिकारी साध्या वेशात येऊन विखरून उभे राहिले. प्रत्येकाजवळ भरलेले पिस्तुल होते ! पोलिसांचा खबरी एखाद्याने सहज उभे राहावे तसा समोरच्या फुटपाथवर उभा होता ! अमरिकसिंगा-विरुद्ध पोलिसांनी व्यूह रचला होता ! (The ambush was laid ! ) ११॥ वाजले आणि एक टांगा क्वीन्स रोडवरून धावत अमृत हॉटेलच्या दिशेने येऊ लागला ! नखशिखान्त युरोपियन पद्धतीचा पोशाख केलेला एक पॅसेंजर मागे एक-टाच बसला होता !

( There was one solitary passenger sitting on the back seat ! )

टांगा थांबला ! पॅसेंजर खाली उतरला ! .... आणि खबरीने पोलीस अधि-काऱ्यांकडे पाहून रुमाल हलवला ! सिग्नल दिला ! दिल्ली पोलीस पुढे धावले ! त्यांनी अमरिकसिंगाला राऊंड-अप केले ! पिस्तूल रोखून एका अधिकाऱ्याने त्याला सांगितले, " अमरिकसिंग ! आम्ही पोलीस आहोत ! उगाच गडबड करू नकोस. मुकाट्याने आमच्याबरोबर चल ! " अमरिकसिंग चपापला, गडबडला, पण क्षणभरच ! आपल्या चेहऱ्यात बदल केला तो फक्त त्याला आश्चर्य वाटतंय अशा अर्थाचा ! डोळे मोठे करीत त्याने दिल्ली पोलिसांना विचारले, " अमरिकसिंग ? कोण अमरिकसिंग ? तुमचा काहीतरी गैरसमज होतोय ! तुम्ही ज्याला अमरिक-सिंग समजता तो मी नव्हेच ! मी डॉक्टर अमरस्वरूप आझाद ! मी बनारसला प्रॅक्टिस करतो ! " दिल्ली पोलिसांनी अमरिकसिंगाकडे नीट पाहिले. दोन्ही गाल-फडांवर जखमा ! हनुवटीखाली जखम ! डाव्या डोळ्यांच्या भुवईवर व्रण ! दिल्ली पोलीस अमरिकसिंगाला म्हणाले, " बघू आपण तुम्ही खरे कोण आहात ते ! आत्ता तरी तुम्हांला आमच्याबरोबर यावे लागेल डॉक्टरसाहेब. तुम्ही अटकेत आहात ! " त्यानंतर मात्र अमरिकसिंगाने फारशी खळखळ केली नाही !

( But he offered no resistance and allowed himself to be conducted to the Police Station ! )

दिल्ली पोलीस स्टेशनवर नेल्याबरोबर अमरिकसिंगाची झडती घेण्यात आली ! त्याच्याजवळ त्याच्या डॉ. अमरस्वरूप तेजासिंग आझाद या नव्या नावाचा पासपोर्ट

मिळाला! फोटो मिळाले! प्रत्येक फोटो एकेका सुंदर बाईचा होता! पण त्यापैकी कुठलाच फोटो बलजीतकौरचा नव्हता! जयपालकौरचा नव्हता! 'बोर्ड ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी सिस्टीम ऑफ मेडिसिन्स्' या बनारसच्या वैद्यकीय संस्थेचे सर्टिफिकेट होते! संस्था म्हणत होती, हा अधिकृत डॉक्टर आहे व याला प्रॅक्टिस करण्याची परवानगी आहे. मात्र त्या सर्टिफिकिटावर तारीख होती २० फेब्रुवारी १९५३!

दिल्ली पोलिसांनी अमरिकसिंगाला विचारले, "डॉक्टरसाहेब! तुम्ही १९५३ च्या फेब्रुवारीत डॉक्टर झालात त्या पूर्वी कोण होता?"

आणि अमरिकसिंगाने शांतपणे सांगितले, डॉक्टरच होतो! तुम्ही जी कागदपत्रे माझ्याकडून हिसकावून घेतलीत ना? त्यात माझे आणखी एक सर्टिफिकेट आहे ते बघा! पोलिसांनी पाहिले! 'यु. पी. बोर्ड ऑफ इंडियन मेडिसिन्स'चे सर्टिफिकेट होते. त्यावर तारीख होती २५ ऑक्टोबर १९५१! झडतीचे काम पुढे चालूच होते. त्यांच्या एका पेशंटने "आझाद साहिब"ना लिहिलेले एक पत्र मिळाले! आणि रेल्वे क्लोकरूमची लगेज रिसीट मिळाली. त्यावर नाव व सही होती ती बलजीतकौर म्हणून! अचानक अटक झाल्यामुळे हा महत्त्वाचा पुरावा पोलिसांना त्याच्याकडून मिळाला.

पोलीस पार्टी त्याला अमृत हॉटेलच्या खोलीत तो राहत होता तिथे घेऊन गेली. तिथले त्याचे सामान व वर दिलेल्या सर्व वस्तू दिल्ली पोलिसांनी पंचनामा करून ताब्यात घेतल्या आणि अमरिकसिंगाला कोठडीत बंद केले! पंजाब पोलिसांशी संपर्क साधून त्यांना खबर दिली की अमरिकसिंगाला अटक झाली! पंजाब पोलीसांनी मुद्दामच ही खबर ताबडतोब प्रेसला दिली! आणि पंजाबातल्या सर्व वृत्तपत्रांनी ठळक मथळे दिले.



" कुप्रसिद्ध खुनी, फरारी अमरिकसिंगाला दिल्लीत अटक !"
" अखेर अमरिकसिंग दिल्लीत सापडला !"
" पंजाबच्या खुन्याला दिल्लीत नाटयपूर्ण अटक !"

झाले ! लोकांना पुन्हा अमरिकसिंग आठवला. लोकांनी अंबाला पोलीस स्टेशन-वर गर्दी केली ! पोलिसांनी त्यांना खबर दिली की, अमरिकसिंगाला उद्या इथे आणले जाईल ! दिल्ली पोलीस त्याला कडेकोट बंदोबस्तात गाडीने घेऊन येताहेत ! गाडी संध्याकाळी अंबाल्याला पोचणार होती ! लोक अंबाला रेल्वे स्टेशनवर आधीच हजर ! दोन्ही हातांत हातकडचा आणि दंडाला काढण्या घातलेल्या अम-रिकसिंगाला खाली उतरवण्यात आले; आणि लोकांत दोन आवाज उमटले; काही म्हणत होते, " तो बघा अमरिकसिंग !" तर काही म्हणत होते " छे: ! छे: ! हा अमरिकसिंग नव्हे ! हा कोणीतरी वेगळाच दिसतोय !" काही लोकांना तसे वाटावे हे साहाजिक होते ! अमरिकसिंगाने दाढी मिशा काढून टाकल्या होत्या ! शीख धर्मप्रमाणे न वागता डोक्यावरचे केस बारीक केले होते ! तो आता डॉ. अमर-स्वरूप आझाद होता ना ! अमरिकसिंग नव्हे !

सबइन्स्पेक्टर चौधरी राधाकिशननी रात्री डॉ. साहेबांना बेदम ठोकले ! रात्र-भर त्याला सरदार लाभसिंगांच्या खुनाबद्दल खूप प्रश्न विचारले. आणि तरी अम-रिकसिंग सांगत होता, " इन्स्पेक्टरसाहेब, तुम्ही मला कितीही मारलेत तरी जो मी नाही तो मी आहे असे सांगून भलत्याच माणसाने केलेला खून मी स्वत:वर उगाच ओढवून घेऊ? मी तुम्हांला जीव तोडन सांगतो, कोण सरदार लाभसिंग तो काळा होता की गोरा मी कधी जन्मात पाहिलाही नव्हता ! 'अमरिकसिंग ! अमरिकसिंग !' म्हणून तुम्ही जो समजता तो मी नव्हे ! मी डॉक्टर अमरस्वरूप आझाद !"

इन्स्पेक्टर चौधरी समजले की, हे काम वाटतंय तेवढे सोपे नाही ! त्यांनी डॉक्टरसाहेबांची उंची मोजली ! पाच फूट नऊ इंच. जिथ जिथे म्हणून आरोपी अमरिकसिंगाच्या जखमा होत्या तिथेच आणि नेमक्या तश्श्याच जखमा या अमरिक-सिंग तेजासिंग ऊर्फ डॉक्टर अमरस्वरूप तेजासिंगाच्या अंगावर होत्या. इन्स्पेक्टर चौधरींनी या तथाकथित डॉक्टर अमरस्वरूपच्या डाव्या हाताचा अंगठा घतला आणि आरोपी अमरिकसिंगाच्या आयडेंटिटी कार्डासकट फिंगर प्रिंट ब्युरोकड पाठ-वला ! रिपोर्ट आला ! दोन्ही अंगठे तंतोतंत जुळताहेत. ते एकाच माणसाचे आहेत. सबइन्स्पेक्टर चौधरींची खात्री पटली की, हा काहीही म्हणत असला तरी हाच तो अमरिकसिंग ! पण त्यांना हेही ठाऊक होते की त्यांनी स्वत: नुसते " हाच तो अमरिकसिंग " असे म्हणून चालणार नव्हते ! सेशन्स जज्ज त्यांच्या एकटयाच्या म्हणण्यावर कितपत विश्वास ठेवील ? साक्षीदारांनीदेखील तसेच म्हणायला हवे ! त्यासाठी ओळखपरेड (Identification Parade !) व्हायलाच हवी. विशे-

षत: या केसमध्ये ! कारण इथे आरोप गंभीर आहेत ! आणि आरोपी म्हणतो की "ज्याने हे केले तो मी नव्हेच !"

ओळखपरेड ही नेहमी मॅजिस्ट्रेटच्या उपस्थितीतच व्हावी लागते ! बरोबर ५ फूट ९ इंच उंचीची आणि अमरिकसिंगाच्याच अंगलटीची आणखी ८ माणसे पोलीसांनी शोधून आणली आणि त्यांच्यांतच अमरिकसिंगाला सोडले ! अमरिकसिंग ऊर्फ अमरस्वरूप आझाद याने मॅजिस्ट्रेटसाहेबांना तक्रार केली, "थोडीफार माझ्यासारखी दिसणारी आणखी कितीही माणसे आणली तरी साक्षीदार पोलिसांच्या सांगण्यावरून मलाच अमरिकसिंग म्हणून ओळखणार ! कारण 'त्या' (!) अमरिकसिंगसारख्याच माझ्या चेहऱ्यावर जखमा आहेत ! डाव्या डोळ्याच्या भुवईवर जखम आहे ! दोन्ही गालांवर आहेत ! हनुवटीखाली आहेत ! या दुर्दैवी आणि विचित्र योगायोगामुळेच चतुर पोलीस मला अमरिकसिंग समजताहेत ! माझ्यासारख्या जखमा यांच्यापैकी कुणाच्याच चेहऱ्यावर नाहीत ! शिवाय मला ज्या दिवशी इथे आणण्यात आले त्या दिवशी काही लोकांना पोलिसांनी मला दाखवून ठेवले आहे. आता काय ? ज्याच्या चेहऱ्यावर जखमा आहेत तोच अमरिकसिंग असं साक्षीदार म्हणणार. मॅजिस्ट्रेटसाहेब, हा अन्याय नाही का ?"

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी डॉ. अमरस्वरूप आझाद (!) यांच्या या तक्रारीची गंभीर दखल घेतली आणि ती त्यांच्याच भाषेत लिहून घेऊन त्यांची त्याच्यावर सही घेतली ! आणि त्यांना शांत करीत म्हटले, "डॉक्टर ! पोलिसांनी असं काही करून उगाच भलत्याच माणसाला गोत्यात आणू नये म्हणून तर ओळखपरेड मॅजिस्ट्रेटपुढच झाली पाहिजे, असं कायदा म्हणतो. तुम्ही चिंता करू नका. मी तुमच्या सर्व तक्रारी दूर करतो."

ज्या हॉलमध्ये ओळखपरेड घेण्यासाठी मॅजिस्ट्रेटसाहेब खुर्ची-टेबल टाकून बसले होते, त्यांच्या डाव्या हाताला हॉलच्या बाहेर जाण्याचा दरवाजा होता आणि हॉलला लागूनच त्यांच्या उजव्या हाताला एक खोली होती. मॅजिस्ट्रेटसाहेबांनी सबइन्स्पेक्टर चौधरी आणि इतर कॉन्स्टेबल्स यांना बाहेर जाण्याचा हुकूम दिला आणि त्यांच्या डाव्या हाताच्या रस्त्याने ते 'पोलीस' बाहेर पडले. मॅजिस्ट्रेटसाहेबांनी तो डाव्या हातचा दरवाजा आतून बंद करून घेता घेता त्यांनी पोलिसांना सक्त हुकूम दिला की, 'मी दरवाजा उघडीपर्यंत तुमच्यापैकी कोणी किंवा अन्य कोणीही दरवाज्यातून आत पाहण्याचा प्रयत्न करू नका. दरवाज्यापासून फार लांब राहा."

किती झालं तरी मॅजिस्ट्रेटचा तो पोलिसांना हुकूम होता. पोलिसांनी तो पाळला. डावीकडच्या बंद दरवाज्यापासून ते फार दूर गेले. दरवाजा बंद झाला. आता आत होते ते फक्त मॅजिस्ट्रेटसाहेब. अमरिकसिंग ऊर्फ डॉक्टर अमरस्वरूप आझाद ! त्यांच्यासारखी दिसणारी इतर आठ माणसे आणि मेक-अप-मन ! मॅजिस्ट्रेटसाहे-

बांनी मेक-अप्-मनला हुकूम दिला, ' हे बघा, या डॉक्टरसाहेबांच्या चेहऱ्यावर जिथे जिथे जखमा आहेत तिथे तिथे ती जखम झाकली जाईल अशा पांढऱ्या चिकट पट्टया चिकटवा आणि नेमक्या त्याच आकाराच्या आणि तशाच पट्टया त्याच ठिकाणी बाकीच्या लोकांच्या चेहऱ्यांवर पण चिकटवा ! त्यानंतर प्रत्येकाला सारखाच ड्रेस करा.

(The Magistrate did a most extraordinary thing ! He allowed the alledged "Amriksingh to paste pieces of paper on his face so that they covered and completely concealed his scars ! )

झाले ! तिथे हजर असलेल्या माणसांच्या डाव्या डोळ्याच्या भुवईवर, गालफडांवर, हनुवटीखाली एकाच आकाराच्या पांढऱ्या पट्टया चिकटवल्या गेल्या. एवढे करून अमरिकसिंगाने फेटा बांधण्याची परवानगी मागितली. तीही त्याला मॅजिस्ट्रेटसाहेबांनी दिली. मेक-अप्-मनने सगळ्यांनाच शीख पद्धतीचे सारखे फेटे बांधले. अमरिकसिंगाने आपल्या डाव्या डोळ्याच्या भुवईचा व्रण, त्यावर पांढरी पट्टी चिकटवलेली असूनदेखील फेटा थोडा पुढे ओढून ती पट्टी झाकून टाकली. मॅजिस्ट्रेटसाहेबांनी परेडमध्ये भाग घेणाऱ्या प्रत्येकाला सांगितले, " हे बघा ! डॉक्टरसाहेबांनी जसा आणला आहे तसा डावीकडून फेटा थोडा पुढे आणून भुवईपर्यंत आणा ! " मेक-अप्-मनने प्रत्येकाला मदत केली. सगळ्यांचे फेटे पुढे ओढले गेले ! त्यानंतर मॅजिस्ट्रेटसाहेबांनी सगळ्यांना त्यांच्यासमोर एका ओळीत उभे केले. सगळेच्या सगळे नऊ 'अमरिकसिंग' एकासारखे एक दिसत होते. मॅजिस्ट्रेटना एकीकडे आतल्या आत हसू येत होते. जुन्या नाटकात शेवटच्या अंकाच्या शेवटच्या प्रवेशात सर्व ' पात्रे ' एकदम एका ओळीत रंगभूमीवर यावीत तसे नऊ ' अमरिकसिंग ' त्यांच्यापुढे एका ओळीत उभे होते !

( The row of nine 'Amriksinghs' presented a ridiculous tableau, as if it were a part of a farcical scene from a comic pantomime ! )

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी मेक-अप्-मनला त्यांच्या उजव्या बाजूच्या खोलीत बंद केले आणि अमरिकसिंगाला म्हटले, " डॉक्टर ! या ओळीत तुम्ही तुमच्या इच्छेप्रमाणे कुठलीही जागा घेऊ शकता. "

अमरिकसिंगाने डावीकडून चौथे उभे राहण्याचे पसंत केले. मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या डाव्या हाताला आता प्रथम तीन तथाकथित ' अमरिकसिंग ', नंतर चौथा खरा अमरिकसिंग आणि त्यानंतर त्यांच्या उजव्या हाताला आणखी पाच ' अमरिकसिंग ' उभे होते.

मॅजिस्ट्रेटसाहेब डाव्या हाताच्या दरवाजापर्यंत स्वतः चालत गेले आणि दरवाजा अर्धवट उघडून त्यांनी पोलिसांना 'पाठवा तुमचा साक्षीदार' अशा अर्थाचा इशारा केला.

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी आत येणाऱ्या माणसाला त्याचे नाव विचारले ! त्याला घाईघाईने आत घेऊन दरवाजा बंद करून घेतला. हे होते सरदार गुरुबक्षसिंग ! सरदार लामसिंगांचा जावई म्हणून अमरिकसिंगाला त्याचे जयपालशी लग्न झाल्यापासून ओळखत होते. शिवाय तारीख १५ फेब्रुवारी १९५० ला अमरिकसिंगाने गोळ्या मारल्या त्या दिवशी सरदार गुरुबक्षसिंग पंच म्हणून हजर होते. झालेला प्रकार त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला होता. त्यांनी आत येऊन पाहिले तिथे नऊ अमरिकसिंग उभे होते. मॅजिस्ट्रेटसाहेबांनी त्यांना सांगितले की, "ओळखा पाहू यांच्यांत खरा अमरिकसिंग कोण आहे ते !" सरदार गुरुबक्षसिंग डावीकडून प्रत्येकाकडे निरखून पाहत उजवीकडे जाऊ लागले ! १ अमरिकसिंग २......३......४ अमरिकसिंग......५......६ अमरिकसिंग ! डावीकडून चौथ्या उभ्या असलेल्या खऱ्या अमरिकसिंगाला हायसे वाटले ! त्याला सोडून सरदार गुरुबक्षसिंग पुढे गेले होते ! ...आणि अचानक अमरिकसिंगाचे दुर्दैव आड आले ! अचानक मॅजिस्ट्रेटसाहेबांकडे पाहत ते म्हणाले, "साहेब ! अमरिकसिंगाला कसा ओळखणार ? हे सगळे सारखेच दिसतात !"

"कसा ओळखायचा ते मी नाही सांगणार ! पाहा, तुम्हांला ओळखतो का ते !"

"पण साहेब, त्यांनी फेटेच असे बांधल्येत की 'चेहरा' असा कुणाचाच दिसत नाही !"

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी सर्व अमरिकसिंगांना हुकूम दिला की, "एकमेकांकडे न बघता आपापले फेटे थोऽऽऽडे वर घ्या !"

९ अमरिकसिंगांचे १८ हात वर गेले ! आणि प्रत्येकाने अक्षरशः थोऽऽऽडा फेटा वर केला ! अजूनही ते सर्व अमरिकसिंग सारखेच दिसताहेत ना याची मॅजिस्ट्रेटसाहेबांनी खात्री पटवली आणि म्हटले, "सरदार गुरुबक्षसिंग, पुन्हा एकदा डावीकडून उजवीकडे जाऊन पाहा तुम्हांला अमरिकसिंग ओळखता येतो का !"

सरदार गुरुबक्षसिंग पुन्हा एकदा प्रत्येकाकडे निरखून पाहत डावीकडून उजवीकडे निघाले.

१ अमरिकसिंग ऽऽ २ अमरिकसिंग ऽऽ ३ ऽऽ आणि चार ! बरोबर डावीकडून चौथ्या उभ्या असलेल्या डॉक्टर अमरस्वरूप तेजासिंग आझाद यांच्या छातीवर हात ठेवून सरदार गुरुबक्षसिंग म्हणाले, "मॅजिस्ट्रेटसाहेब ! हाच अमरिकसिंग ! हाऽच !"

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी या सर्व प्रकाराची नीट नोंद केली ! आणि सरदार गुरुबक्षसिंगांना सांगितले, "सरदार ! तुम्हांला बाहेर जाता येणार नाही ! ती उजवीकडे खोली आहेना तिच्यात जरा बसा ! उजवीकडच्या खोलीत सरदार गुरुबक्षसिंग बंद झाले ! मॅजिस्ट्रेटसाहेब पुन्हा डावीकडचा दरवाजा अर्धवट उघडीत म्हणाले,

" Yes ! Next witness ! "

या वेळी आत आली ती रामरखी, अमरिकसिंगाची सासू. आत आल्याबरोबर दरवाजा बंद झाला ! समोर त्यांचे नऊ जावई उभे होते ! रामरखींनी अगोदरच मॅजिस्ट्रेटसाहेबांना सांगितले,

" साहेब ! माझ्या दोन्ही डोळ्यांत मोतीबिंदू झाल्येत. मला नीट दिसत नाही! "

" बघा ! जमेल तितकं बघा नि सांगा मला अमरिकसिंग कोण ते ! "

त्यांचे सगळे ' जावई ' त्यांना सारखेच दिसत होते. त्यांनी मॅजिस्ट्रेटसाहेबांना कळवळून विनंती केली, " साहेब, त्यांना फेटे वर करायला सांगा, तरच मला नीट बघता तरी येईल. " मॅजिस्ट्रेटसाहेबांनी पुन्हा एकदा हुकूम दिला " सगळ्यांनी फेटे आणखी वर करा ! " फेटे वर गेले ! आणि अमरिकसिंगाच्या छातीत धडधडू लागले ! मधाशी फेटा थोऽऽऽडा वर गेल्यामुळेच घोटाळा झाला होता ना ! रामरखी डावीकडून उजवीकडे प्रत्येकाकडे निरखून पाहत निघाल्या आणि अरेरे ! डावीकडन चौथ्या उभ्या असलेल्या अमरिकसिंगाला सोडून देऊन त्या पुढे गेल्या ! आणि भलत्याच इसमाच्या अंगाला हात लावून त्यांनी सांगितले, " हा अमरिकसिंग ! " अमरिकसिंगाचा जीव भांड्यात पडला !

रामरखी उजवीकडच्या खोलीत बंद झाल्या आणि अमरिकसिंगाला अचानक काय वाटले कुणास ठाऊक ? त्याने विचारले, " मॅजिस्ट्रेटसाहेब, मी माझी जागा बदलू शकतो का ?


" अवश्य ! तुझा हक्क आहे तो ! "

अमरिकसिंगाने जागा बदलली ! या वेळी तो डावीकडून सातवा आणि उजवीकडून तिसरा होता !

ओळख पटविण्यासाठी आता आत आले होते ते कॅप्टन मेनन ! ज्यांची सही अमरिकसिंगाच्या आयडेंटिटी कार्डावर होती, त्या अमरिकसिंगाला ते Civil Gazetted Officer म्हणून ओळखत होते ! कॅप्टन मेनन डावीकडून उजवीकडे नीट बघत अगदी नवव्या ' अमरिकसिंगा 'पर्यंत गेले ! तिथून परत आले ! नीट बघत ! आणि डावीकडून चौथ्या माणसाला हात लावून त्यांनी सांगितले ' हा अमरिकसिंग ! ' तो अमरिकसिंग नव्हता. कारण या वेळी अमरिकसिंग होता डावीकडून सातवा !

अट्टल गुन्हेगाराजवळ काहीतरी शक्ती असली पाहिजे. अकल्पित योगायोग त्याला मदत करणारे ठरत असले पाहिजेत ! नेमके कॅप्टन मेनन आत येण्यापूर्वीच आपली डावीकडून चौथी जागा सोडावी असे अमरिकसिंगाला का वाटले असेल ? दैवी शक्ती ? की केवळ अकल्पित योगायोग ? काहीही असेल ! पण घडले हे असे घडले खरे !

... आणि " बा आदब ! बाऽ मुलाहिजा ! निगाह रखो मेहेरबाऽऽन ! "



**जयपाल, ओळख तुझे दुर्दैव !**

पोलिसांतर्फे अमरिकसिंगाला ओळखण्यासाठी शेवटची म्हणून जी साक्षीदार आणली गेली ती खुद्द जयपालकौर ! ती आत आली. डावीकडचा दरवाजा बंद झाला. ज्याचं या जन्मात 'थोबाड' पाह्यचे नाही, असे ती म्हणत होती अशी नऊ 'थोबाडं' तिच्यापुढे ओळीने उभी होती ! दरवाजे बंद ! आधार काय तो फक्त मॅजिस्ट्रेटचा ! की ज्यांची तिला आदरयुक्त भीतीच वाटत होती ! वातावरण तुरुंगाचे. तिला भूतकाल आठवला. तिचा अमरिकसिंगाबरोबरचा 'संसार' आठवला ! तो भीषण गोळीबार आठवला ! आपल्याला कशी गोळी लागली ! आपण हॉस्पिटलमध्ये तब्बल सात महिने कसे तळमळलो ते आठवले ! आपले गेलेले मूल आठवले ! आणि तिच्या डोळ्यांत पाणी तरळले ! मॅजिस्ट्रेटसाहेब एकीकडे हुकूम देत होते ! "जयपालकौर ! चल, लवकर ! बघत काय बसलीस ! सांग ! यांच्यापैकी 'अमरिकसिंग' कोण ?"

जयपालकौरने अनिच्छेने प्रत्येकाकडे नीऽट पाहिले आणि ती म्हणाली, "मॅजिस्ट्रेटसाहेब, त्यांना चेहऱ्यावरच्या पट्टया काढायला सांगा. आणि फेटे आणखी मागे घ्यायला सांगा. तरच मी माझा नवरा ओळखू शकेन !"

मॅजिस्ट्रेटसाहेब रागावले. म्हणाले, "छे: ! छः ! तसं कसं ? मी काही अमरिकसिंगाचा 'शत्रू' नव्हे. मला काय करायचंय ? आहे अशाच स्थितीत ओळख कोण आहे अमरिकसिंग ?"

त्यानंतर मॅजिस्ट्रेटसाहेबांना काय वाटले कुणास ठाऊक ? किती झाले तरी ते एक बुद्धिमान फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट होते ! त्यांच्या मनात आले, ' काय हरकत आहे ? चेहऱ्यावरच्या पट्ट्या काढायचा हुकूम दिला म्हणून ? कारण नाहीतरी ही सगळ्यात शेवटची साक्षीदार आहे आणि धरून चालू की तिने अमरिकसिंगाला बरोबर ओळखले तरी अमरिकसिंगाची तक्रार अगदी सुरुवातीलाच आलेली आहे की, आपल्या चेहऱ्यावर जखमा आहेत म्हणून केवळ ही मला अमरिकसिंग समजते. मी अमरिकसिंग नव्हे !" उलट अशा परिस्थितीत जयपालकौरने अमरिकसिंगाला ओळखणे म्हणजे त्याला मदतच आहे !

आणि मॅजिस्ट्रेटसाहेबांनी हुकूम फर्मावला, " अमरिकसिंगांनो ! आपापल्या चेहऱ्यावरच्या पट्ट्या काढून टाका ! माझ्यावर विश्वास ठेवा ! मी तुमच्यावर अन्याय करू इच्छीत नाही ! " प्रत्येक ' अमरिकसिंगाने ' चेहऱ्यावरच्या पट्ट्या काढून टाकल्या आणि दुर्दैव असे की जयपालकौरने मॅजिस्ट्रेटसाहेबांना सांगितले, " साहेब ! एवढ्याने भागणार नाही ! माझ्या नवऱ्याचा आवाज मी ओळखते. प्रत्येकाला माझ्याशी कमीत कमी चार चार वाक्ये बोलायला सांगा !" मॅजिस्ट्रेटने धाडस केले आणि जयपालकौरला तीही परवानगी दिली. जयपालकौर निघाली. डावीकडून उजवीकडे आणि हाय रे दुर्दैवा ! ओळखपरेडमध्ये भाग घेत असलेल्या राधा किशन नावाचा भलताच इसम तिच्याशी चार वाक्ये बोलल्याबरोबर तिने त्याचा हात धरून सांगितले की, ' हाच अमरिकसिंग !' जयपालकौरकडून झालेली ही चूक तिच्या मनावर ताण पडला होता म्हणून झाली ? की आपला कसाही असला तरी शेवटी नवरा असलेल्या अमरिकसिंगाला वाचवण्यासाठी ? कळायला मार्ग नाही.

( Jaipalkaur, affirmed her erroneous choice, either to save husband or due to her weak power of observation ! )

ओळखपरेडचा मॅजिस्ट्रेटच्या सहीशिक्क्याचा अहवाल वाचून सबइन्स्पेक्टर चौधरी राधाकिशननी कपाळाला हात लावला. ' तो मी नव्हेच !' या त्याच्या म्हणण्याला प्रत्यक्ष पोलिसांनी ओळखपरेड घेऊन मदत केली होती ! पोलिसांचे चारपैकी तीन साक्षीदार त्याला ' अमरिकसिंग ' म्हणून ओळखू शकले नव्हते ! आरोपीचा बचाव पोलिसांनी बळकट केला होता !

काय करणार ? दैव आपलं ! आपण आपलं काम बरोबर केलंय असं म्हणून.

( The Police were now quite content to leave matters as they were and let the law take its normal course.)

सबइन्स्पेक्टर राधाकिशन चौधरी यांनी तथाकथित आरोपी याला अंबाला येथील फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेटपुढे हजर केले. आरोपी अमरिकसिंग ऊर्फ डॉक्टर अमरस्वरूप तेजासिंग याला आरोपपत्रक (फ्रेश चार्जशीट) दिले गेले. मॅजिस्ट्रेट-

साहेबांनी आरोपीवर इंडियन पीनल कोड कलम ३०२, ३०७, ३०९ आणि २२४ (होय ! आरोपी अमरिकसिंग यावर आता एक आरोप वाढला होता इं. पी. को. कलम २२४ प्रमाणे पोलीस कस्टडीतून पळून जाणे हादेखील शिक्षापात्र गुन्हा आहे !) खाली चार्ज फ्रेम केला ! मॅजिस्ट्रेटसाहेबांनी चार्जशीट नीट वाचले ! आरोपी अमरिकसिंग ऊर्फ डॉ. अमरस्वरूप याच्याकडे बलजीतकौर नावाच्या स्त्रीच्या सहीचे बिल दिल्ली पोलिसांना मिळाले ! चारपैकी एका साक्षीदाराने का होईना पण आरोपी अमरस्वरूप तेजासिंग हाच अमरिकसिंग होय, असे ओळखून काढले. फिंगर प्रिंट एक्सपर्टचा रिपोर्ट दाखवतो की दोन्ही व्यक्ती एकच आहेत ! एवढ्या प्राथमिक पुराव्यावर सरदार लाभसिंग खून खटला सेशन कमिट केला !


( The formality of Magisterial enquiry was concluded, and the prisoner, Amar Swarup alias Amriksingh, was committed to stand his trial at the Court of Session ! )

दुसऱ्या दिवशी पंजाबच्या वृत्तपत्रांतून पुन्हा एकदा ठळक मथळा आला !

" सरदार लाभसिंग खून खटला सेशन कमिट झाला ! "

कडक पोलिस बंदोबस्तात अमरिकसिंग ऊर्फ डॉ. अमरस्वरूप याला पोलिस व्हॅनमध्ये चढविण्यात आले. लोकांचा लोंढा मागे होताच ! अमरिकसिंग ऊर्फ डॉ. अमरस्वरूपने पांढऱ्या फडक्याने आपला चेहरा झाकून घेतला आणि तो ढसढसा रडू लागला ! कशाकरिता एवढा रडला तो ? तो खरोखरच अमरिकसिंग होता व आपण एवढी हुशारी दाखवूनदेखील पोलिसांनी आपल्याला पकडले, आता आपल्याला नक्की फाशी होणार या भीतीने ? की तो खरोखरच अमरिकसिंग नसूनदेखील केवळ चेहऱ्यात साम्य आहे म्हणून भलत्याच माणसाने केलेल्या गुन्ह्याबद्दल उगाचच फाशी होणार या भीतीने ? भगवंताला ठाऊक ! (क्रमशः)


क्र. ४३ मध्यें ११ बिनचूक विजेत्यांनीं प्रत्येकीं रु. १,९१० जिंकले



# जमाते इस्लामीचे

जमाते इस्लामी या जात्यंध मुस्लीम संघटनेचे नांदेड जिल्हा अधिवेशन नुकतेच नांदेडच्या गाडीपुरा भागातील बडी दर्गा येथे ४ व ५ जानेवारीस पार पडले. जमाते इस्लामी या अखिल भारतीय संस्थेचे जॉइंट जनरल सेक्रेटरी मौलाना सय्यद हामीद हुसेन हे दिल्लीहून खास या अधिवेशनासाठी नांदेडला आले होते. इतर कार्यक्रमाबरोबरच परिसंवादाचा जाहीर कार्यक्रमहि आयोजित करण्यात आला होता. परिसंवादाचा विषय होता, ' राष्ट्रीय ऐक्य आणि ते साधण्याचे उपाय. ' जनसंघ, रिपब्लिकन, जमाते इस्लामी या संघटनांचे नेते व आमच्यासारख्या अपक्ष प्राध्यापक मंडळींचा वक्त्यांत समावेश करण्यात आला होता.

मराठवाडा व विदर्भाच्या तेरा जिल्ह्यांच्या जमाते इस्लामींचे प्रमुख श्री. महमूद अहमदखान (औरंगाबाद) यांनी प्रास्ताविक भाषण केले. परिसंवादाचे अध्यक्ष मौलाना सय्यद हामी हुसेन यांनी परिसंवादाच्या संचलनासंबंधी काही सूचना दिल्या व नंतर भाषणांना प्रारंभ झाला. पीपल्स कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक व प्रसिद्ध समीक्षक प्रा. नरहर कुरुंदकर हे बोलावयास उभे राहिले. अरबीमिश्रित ' शुद्ध ' उर्दूत लिहून आणलेली सात आठ पाने त्यांनी अस्खलितपणे ' वाचून ' दाखविली. भाषण लिहून आणले असल्याने वक्तृत्वाची जी ' मजा ' येते ती या वेळी आली नाही पण अनेक मूलभूत मुद्दे त्यामुळे थोड्या अवधीत स्पष्ट करता आले. या दृष्टीने कुरुंदकरांनी चांगलाच ' धोरणी 'पणा दाखविला असे म्हणायला हवे. कारण आठ दहा मिनिटे प्रत्येकाच्या वाट्याला आली होती व वक्तृत्वाच्या ओघात, वेळेचे बंधन असल्याने, मूळ विषयाकडे वळायला वक्त्याने सुरुवात करावी तोच भाषणास दिलेला वेळ संपावा अशी परिस्थिती होण्याची भीती होती, जनसंघाचे श्री. चंद्रकांत मस्की यांच्याबाबतीत अशीच काहीशी परिस्थिती झाली.

प्रा. नरहर कुरुंदकरांनी संसदेला सार्वभौम मानणे व राज्यघटनेशी इमान राखणे म्हणजे राष्ट्रीयता ही गोष्ट सर्वांनी मान्य केली की, राष्ट्रीय ऐक्याचा प्रश्न बराचसा सुटेल असे सांगितले. सवतबंदीविधेयक महाराष्ट्र विधानसभेत चर्चेस आले असता मुस्लीम लीगचे आमदार बनातवाला यांनी त्यास विरोध व हे विधेयक पास होण्यासाठी ' आमच्या प्रेतावरून ' जावे लागेल अशी धमकी दिली. अशा

प्रा. देवदत्त तुंगार

धमक्या राजकीय डावपेचाचा भाग असून कोणाच्याही प्रेतावरून न जाता निर्धा-गने सरकारने असे पुरोगामी कायदे केलेच पाहिजेत. हिंदू कोड बिलाच्या वेळी सनातनी हिंदूंनीही असाच त्रागा करून 'प्रेता'ची भाषा केली होती पण हे विधेयक पास झालेच याचीही आठवण प्रा. कुरुंदकरांनी करून दिली.

## परखड सवाल

प्रा. देवदत्त तुंगार यांनी भारताच्या व्यापक राष्ट्रीय जीवनप्रवाहाशी मुस्लिमां-सारख्या अल्पसंख्य समाजांनी समरस व्हावे व फुटीरतेची भावना निर्माण करू नये असे सांगून राष्ट्रीय ऐक्यामध्ये (नक्षलवाडी) कम्युनिस्टांचा व जमाते इस्लामी-सारख्या कम्युनॅलिस्टांचा (जातीयवाद्यांचा) फार मोठा अडथळा आहे असे प्रति-पादन केले. चर्चेची पातळी दैनंदिन व्यवहाराकडे आणण्यासाठी प्रा. तुंगारांनी राष्ट्रीय ऐक्यासंबंधी परिसंवाद आयोजित करणाऱ्या 'जमाते इस्लामी' य संघटनेच्या नेत्यांना, परखडपणे तीन चार 'सवाल' टाकले. अरब-इस्राइल युद्धात भारतातील मुस्लीम व जमाते इस्लामीसारख्या संस्था अरबांच्यासंबंधी सहानुभूती ठेवतात आणि 'पॅलेस्टाइन फंड' जमा करतात. परंतु हे लोक भारतीय मुस्लीम सैनिकांसाठी असा एखादा निधी का उभारत नाहीत ? भारत–पाक युद्धाच्या वेळी जमाते इस्लामीने रक्तदान मोहिमेला का विरोध केला ? पं. नेहरूंची सारी हयात मुस्लिमांचे हित साधण्यात गेली असतानासुद्धा यांच्या मृत्युनंतर मशिदींतून त्यांच्या-साठी कुराण-पठन होणे 'इस्लाम'च्या विरोधी आहे अशी भूमिका 'जमाते इस्लामी'ने घेतली नव्हती काय ? या व अशा बाबींमुळेच जमाती-जमातींत संशयाचे वातावरण निर्माण होते व राष्ट्रीय ऐक्य साधणे शक्य होत नाही. केवळ परिषदा, सभा, संमेलने घेऊन राष्ट्रैक्य साधणार नाही. त्यासाठी विशाल व व्यापक राष्ट्र जीवनाच्या प्रवाहाशी सर्वांनी समरस व्हावे यावर प्रा. तुंगार यांनी प्रामुख्याने भर दिला. वाढती प्रांतीयता संकुचित भाषिकवार व क्षुद्र जातीयता यांमुळे राष्ट्रीय ऐक्य साधणे कठीण होत आहे असेही त्यांनी प्रतिपादले.

प्रा. गो. रा. म्हैसेकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की 'इस्लाम' हा पूर्ण व अंतिम धर्म आहे ही भूमिका चुकीची असून राष्ट्रीय ऐक्यासाठी सामाजिक ऐक्य आवश्यक आहे. मुस्लीम समाज स्त्रियांना समानतेचे हक्क नाकारतो. अर्ध्या लोक-संख्येला मानवी हक्कापासून वंचित ठेवून सामाजिक ऐक्य कसे साधणार ? भाषिक-वार प्रांतीयता हे राष्ट्रैक्यातील अडसर आहेत हे तुंगारांचे म्हणणे काही अंशी बरोबर असले तरी या अडसरापेक्षाही फार मोठा अडसर प्रतिगामी (कदामतपसंदी)

विचारसरणीचा आहे. प्रत्येक प्रांतात, गावात, गल्लीत, ठिकठिकाणी प्रतिगामी विचारसरणीचे जे अड्डे आहेत त्यांमुळेच राष्ट्रीय एकात्मता साधत नाही यावर प्रा. म्हैसेकर यांनी जोर दिला.

रिपब्लिकन पक्षाचे नेते श्री. लक्ष्मणराव गायकवाड यांनी राष्ट्रैक्यासाठी जाती-जातींत बंधुत्वाची भावना रुजविण्याची जरुरी प्रतिपादन करून उत्तर प्रदेशांत हरिजनावर जे अत्याचार नुकतेच करण्यात आले त्यांचा उलेख करून हथियागडमध्ये आई व मुलाचा अनैतिक संबंध घडवून आणण्याचा सक्तीने काही स्पृश्य समाजातील लोकांनी जो निंच प्रकार केला त्याचा निषेध करून अस्पृश्य समाजावर असे अत्याचार राजरोसपणे होऊ लागले तर एक–राष्ट्रीयत्वाची भावना कशी निर्माण होईल असा प्रश्न उपस्थित केला. चंद्रमोहन यांनीही इंग्रजीत एक निबंध वाचला.

परिसंवादाचा अध्यक्षीय समारोप केला अखिल भारतीय 'जमाते इस्लामी'चे जॉइंट जनरल सेक्रेटरी मौलाना सय्यद हामीद हुसेन यांनी ! सर्व वक्त्यांना 'वेळ' नेमून दिला होता परंतु त्यांना जास्त वेळ का आवश्यक आहे हे सांगताना त्यांनी अनेक कारणे दिली. ज्या जमाते इस्लामीतर्फे हा परिसंवाद घेण्यात आला त्याचे ते एक पदाधिकारी आहेत. अनेक वक्ते प्राध्यापक पेशातील होते तसेच तेही एके काळी प्राध्यापक होते व ज्या महाराष्ट्रात हा परिसंवाद होत आहे त्याच महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील 'एलिचपूर'चे ते रहिवासी आहेत ! सध्या दिल्लीला असले तरी महाराष्ट्राशी त्यांचा असा घनिष्ट संबंध आहे व म्हणून जास्त वेळ बोलण्याचा त्यांना हक्क पोचतो असे गंमतीने त्यांनी सांगितले. मौलानासाहेबांची भाषेवर चांगली पकड आहे. बोलण्यातही विरोधकांना कोपरखळ्या मारण्यापेक्षा 'अजीजीने' आपले म्हणणे गळी उतरविण्यावर त्यांचा मुख्य भर असतो. माझ्या भाषणांत मी जमाते इस्लामी व रा. स्व. संघ ह्या संस्था सेक्युलॅरिझमच्या विरोधी असल्याने त्या तेवढ्या सीमेपर्यंत राष्ट्रहितविरोधी आहेत या केंद्रीय गृहमंत्री ना. यशवंतराव चव्हाण, यांच्या विधानाचा उल्लेख केला होता. मौलानांनी प्रारंभीच त्याचे उत्तर देताना सांगितले की, भारताच्या राज्यघटनेत कुठेही 'सेक्युलॅरिझम' हा शब्द नाही. अशा परिस्थितीत सेक्युलॅरिझमला विरोध म्हणजे राष्ट्र-द्रोह हे ना. यशवंतराव चव्हाण यांचे विधान हे घटनाविरोधी व अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे. जमाते इस्लामी व आर. एस. एस. ह्या संस्था काँग्रेसविरोधी आहेत असे चव्हाणांनी म्हणावे, राष्ट्रविरोधी आहेत असे म्हणण्याचा त्यांना हक्क नाही.

## रंगलेला परिसंवाद

राज्यघटनेशी इमानी राहणे याचा अर्थ राज्यघटनेतील प्रारंभी नमूद केलेल्या (Preamble) उद्देशांशी सहमत असणे होय. राज्यघटनेतील सर्व कलमांशी सहमत असणे नव्हे असे मौलानांनी सांगून जमाते इस्लामी राज्यघटनेच्या प्रिॲम्बलवर श्रद्धा ठेवते असे प्रतिपादले. राज्यघटनेच्या इतर भागात दुरुस्ती सुचविणे घटना-

द्रोह नव्हे व अशा दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत हेही त्यांनी स्पष्ट केले.

वृत्तपत्र आणि राष्ट्रैक्य यांसंबंधी विवेचन करताना 'ऑर्गनायझर' वीर अर्जुन, प्रताप (दिल्ली) ,शवूर (हैद्राबाद) या वृत्तपत्रांवर मौ. सय्यद हामीद हुसेन यांनी टीका केली. जमाते इस्लामीच्या 'दावत' दैनिकातून नेहमी जातीयवादी टीका येते परंतु त्याचा समावेश 'जातीयवादी' पत्रांत त्यांनी का केला नाही ? जातीय दंगलींचा उल्लेख करून त्यांनी सांगितले की पोलिसांना केवळ शारीरिक शिक्षण देऊनच भागणार नाही, नैतिक शिक्षणही दिले पाहिजे. 'चारित्र्य' ही फार दुर्मिळ गोष्ट झाली आहे व सरकारी अधिकाऱ्यांत तर त्याचा आभावच आढळतो असेही ते म्हणाले.

एकंदरीत राष्ट्रीय ऐक्यावरचा हा परिसंवाद चांगलाच रंगला. परिसंवादात 'उर्दू' हिंदी आणि इंग्रजी या भाषांचा वापर करण्यात आला. मौलानांची 'उर्दू' श्रोत्यांना सोपी वाटली. प्रा. कुरुंदकर व प्रा. म्हैसेकर यांची अरबीमिश्रित 'उर्दू' फक्त 'दर्दी' जाणकारांनाच समजली. परिसंवादाप्रमाणे श्री. महमूद अहमदखान यांचे 'इस्लाम'मध्ये सामूहिक जीवनाचे महत्त्व या विषयावर भाषण झाले. मौ. सय्यद हामीद हुसेन यांचे शेवटच्या दिवशी झालेले भाषण अभ्यासपूर्ण होते. साम्यवादी जीवनपद्धतीचे अपयश चीन व रशियांच्या उदाहरणांवरून स्पष्ट झाले. तथाकथित 'लोकशाही'चा अमेरिकेतील प्रयोग सध्या तेथे ढासळलेल्या नैतिक मूल्यांवरून अयशस्वी झाल्याचे दिसतेच आहे. आता हिंदू राष्ट्रवाद व इस्लामी जीवनपद्धतीचे राज्य हेच पर्याय राहिले आहेत. हिंदू राष्ट्रवादाचा अभ्यास आपण केला नाही असे सांगून इस्लामी राज्यपद्धतीचे श्रेष्ठत्व त्यांनी सांगितले. पाकिस्तान व इतर राष्ट्रे 'इस्लामी' राष्ट्रे नाहीत. तेथील राज्यकर्ते 'मुस्लीम' आहेत एवढेच, ही गोष्ट विशेषत्वाने त्यांनी स्पष्ट केली.

दोन दिवस झालेल्या अधिवेशनाने एक गोष्ट स्पष्ट झाली व ती म्हणजे आपल्या कोषांतून ( व गोशातून ) जमाते इस्लामी आणि मुस्लीम समाज 'बाहेर' येऊ पाहत आहे ! इतरांशीही विचार-विनिमय करू इच्छीत आहे. 'जमाते इस्लामी' संघटनेला मी 'जातीयवादी' समजतो व राष्ट्रीय ऐक्यात अडथळा आणणारी ती संस्था आहे असे मी सांगेन, वाटल्यास मला परिसंवादात बोलण्यास बोलवा की बोलवू नका असे मी स्पष्टपणे सांगितले असताही त्यांनी बोलावले व शांतपणे माझे विचार ऐकून घेतले हे माझ्या दृष्टीने 'कमी' नाही. इस्लामीच्या व्यासपीठावर प्रा. कुरुंदकर, प्रा. म्हैसेकर व माझ्यासारख्या 'जमाते इस्लामी' विरोधकांना ते बोलावतात व 'ऐकून' घेतात ही माझ्या दृष्टीने स्वागतार्ह बाब आहे. जमाते इस्लामीने व इतर जात्यंध मुस्लीम संघटनांनी असाच उपक्रम चालू ठेवावा. त्यातून भावी काळात काही 'चांगले'ही निघू शकेल असे 'उगीचच' वाटते ! असो.

O

# पुस्तके

'पंचविसावा तास 'ही सी. व्हर्जिल जॉर्ज्यू या रुमानियन लेखकाची कादंबरी प्रथम फ्रेंच भाषेत प्रसिद्ध होऊन नंतर हानेमानकडून इ. स. १९५० मध्ये इंग्रजीत प्रकाशित झाली. तिला गॅब्रिएल मार्सेल या विख्यात फ्रेंच लेखकाची प्रभावी प्रस्तावना आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारलेले हे पुस्तक अत्याचारांनी व्यथित अशा मानवतेचा निराशायुक्त आक्रोश आहे असे तो म्हणतो. या पुस्तकात यणारे प्रसंग व विचार अविस्मरणीय आहेत. अद्यापिही पुस्तकातला विषय जुना झालेला नाही. हे पुस्तक परत प्रकाशित होऊ नये अशी अमेरिकेकडून व्यवस्था करण्यात आली आहे असे कळते व त्यामुळे हा ग्रंथ यापुढे पाहण्यासही मिळणे कठीण. याचे हिंदीत भाषांतर झाले आहे. आपल्याकडे या पुस्तकाची वाचकांना विशेष माहिती नाही म्हणून या लेखात त्याचा पूर्ण आशय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

कथानकाला रुमानियातल्या फॉन्टाना या गावात सुरुवात होते. तेथे जोहान मॉरिट्झ्, सुसाना व तिचा बाप जुर्गू कोरुगा हा एक विचारवंत पाद्री व जॉर्ज डॅमिअन–तेथील सरकारी वकील राहत असतात. कोरुगाचा मुलगा ट्राइअन डॅमिअनचा वर्गबंधू असून प्रसिद्ध लेखक असतो. जोहान अमेरिकेला जाण्याच्या बेतात असतो, पण त्याची प्रेयसी सुसानाला दांडग्या व संतापी बापापासून पळून जावे लागते; त्यामुळे अमेरिकेला जाणे राहते. जुर्गू हा जर्मन वंशाचा. त्याचे माणसापेक्षा घोड्यावर जास्त प्रेम. तो संतापाच्या भरात बायकोला ठार करतो व तुरुंगात जातो. इकडे पळालेल्या सुसानाला जुर्गूच्या भयाने कोणी थारा देत नाही पण कोरुगा व ट्राइअन हे त्या उभयतांना जवळ करतात. ट्राइअन तर घरासाठी आणलेले पैसे जोहानला देऊन टाकतो. तेवढ्यात युद्धाचे वारे वाहू लागतात. जुर्गू सुटतो व गणवेश चढवतो. गावातल्या सार्जंटची सुसानावर नजर जाते व ती ऐकत नाही हे पाहून जोहानला काही दिवस दूर करण्यासाठी तो जोहान 'संशयास्पद' व्यक्ती असल्याचे वर कळवतो पण चुकीने तो ज्यू या सदरात घातला जातो व जोहानची ज्यूंच्या कामगार कॅंपमध्ये रवानगी होते. गावात गोल्डवर्ग हा खरा ज्यू असतो पण तो सार्जंटला पैसे देऊन राहतो. तथापि कट्टर कम्युनिस्ट असलेला त्याचा पॅरिसहून

# पंचविसावा तास

## ज. शा. देशपांडे

अलेला मुलगा मार्कू धरला जातो. जोहानने आपण ज्यू नसल्याची तक्रार केली, कोरुगाने खूप खटपट केली पण व्यर्थ ! ज्यू म्हणून जोहानची मालमत्ता जप्त करण्याची वेळ आली, तेव्हा मात्र सार्जंटला पेच पडला. एवढ्यावर प्रकरण येईल असे त्याला वाटले नव्हते. आता बोलता पण येईना. शेवटी मिनतवारीने हे सर्व तात्पुरते आहे असे सांगून त्याने घटस्फोटाच्या कागदावर सुसानाची सही मिळवली. घर वाचले, पण तिकडे जोहानवर वज्राघात झाला. तो पक्का ज्यू ठरला.

ट्राइअननेही कोरुगाच्या सांगण्यावरून जोहानसाठी खटपट केली व तो प्रसिद्ध लेखक असल्याने ती यशस्वी झाली असती. तेवढ्यात त्याचे नोरा वेस्ट हिच्याबरोबर लग्न झाले. तिची पूर्वपीठिका ज्यू निघाली. जोहानची सुटका बाजूला राहिली व नोरा आणि ट्राइअन यांना पळावे लागले. कँपमधून काही ज्यू सोबत्यांबरोबर जोहान हंगेरीत पळाला. तेथून त्याचे सोबती अमेरिकेत गेले पण जोहान ज्यू नाही म्हणून त्याला मदत मिळाली नाही. शेवटी ओळखपत्र नाही म्हणून जोहान पकडला गेला. त्याची हकीकत कोणाला खरी वाटेना व त्याच्या ओळखीचे लोक ओळख नाकारू लागले. जोहानला हेर म्हणून मरेमरेस्तवर मारण्यात आले. शेवटी हंगेरीने जर्मनीकडून हजारो कामगारांची मागणी आली त्यासाठी हंगेरिअन नसलेले परदेशीय पकडून देण्याचे ठरवले. त्यात जोहानची जर्मनीत रवानगी झाली. कँपमध्ये सर्व कडक काम. दयामाया वगैरे काही नव्हते. जोहान वगैरे मंडळी खरे कैदीच होते व त्यांनी जास्त काम करावे म्हणून त्यांसाठी दुर्दैवी जर्मनेतर मुली धरून आणल्या होत्या. कर्मधर्मसंयोगाने जोहानवर एका जर्मन कर्नलसाहेबांची नजर गेली व जोहान हा आर्यवंशाचा अस्सल नमुना असल्याचे त्यांनी ठरवले. लगेच जोहान जर्मन सैनिक झाला. तो आजारी पडल्याने त्याच्या दिमतीला हिल्डा नावाची जर्मन मुलगी आली व दोघे लग्न करून बसली.

जर्मनीच्या पराजयाची चिन्हे दिसू लागली. जोहान व त्याच्या मदतीने त्याचे सोबती पळून गेले. रशियन पुढे येऊ लागले. एक दिवस हिल्डाच्या घरात गणवेशात जुर्गू आला व त्याने रशियनांच्या हातात सापडू नये म्हणून आत्महत्या केली. त्याच्या खिशात सुसानाचा फोटो होता. रशियन आले व हिल्डाने घर पेटवून दिले

आणि त्यात ती घरासकट भस्मसात् झाली. जोहान व त्याचे सोबती अमेरिकन हद्दीत गेले. प्रथम जोहानचे स्वागत झाले पण मग शत्रुदेशाचा नागरिक म्हणून त्याची रवानगी तारेच्या कुंपणात झाली. तिथे त्याच कारणास्तव नोरा व ट्राइअन येऊन दाखल झाले. त्यांचे म्हणणे, अर्ज-विनंत्या कोणी ऐकून घेईनात. नोराला नाझी कुत्री म्हणून ज्यू अधिकाऱ्यांकडून शिव्या मिळाल्या तर जोहानला संतप्त कैद्यांनी हुलीवरून नाझी हस्तक म्हणून चेचून काढले. त्या जमावाला कोणावर तरी राग काढावयाचा होताच. कँपमध्ये अन्नपाणी धड नाही. झडत्यांचे सत्र वगैरे सर्व गोष्टी होत्या. जोहान व ट्राइअन अर्ज करीत; कारण एवढेच ते करू शकत होते. अधिकाऱ्यांशी त्यांच्या मुलाखती होत पण त्या अगदी यांत्रिकपणे. ट्राइअन चळवळ करतो म्हणून त्याची अधिकाऱ्यांनी वेडाच्या तपासणीसाठी रवानगीही केली. अधिकारी फक्त वर्तमानपत्रात बोभाटा होऊ नये एवढे जपत.

## सखोल विचार

फॉन्टानात रशियन शिरल्याबरोबर मार्कू जनतान्यायालयाचा व गावानला प्रमुख झाला व त्याने गावातल्या प्रतिष्ठित लोकांना तडकाफडकी पकडून प्रतिक्रांतिकारक म्हणून गोळ्या घालण्यास सुरुवात केली. जोहानच्या आईला मंडळात घेतले. पण मार्कूने डॅमियन व कोरुगा यांना देहांतशासन फर्माविले. तेव्हा जोहानची आई व सुसाना रात्री तपास करण्यास गेली तो कोरुगाला गोळी घातलेली. तथापि त्याच्यात धुगधुगी होती. दोघींनी त्याला उचलून रस्त्यावर आणले. तेवढ्यात तेथून जर्मन जात होते, त्यांनी कोरुगाला त्यांच्या हवाली केले. पण सकाळपर्यंत ही वातमी फुटली व सकाळी जोहानच्या वृद्ध आईला ठार मारण्यात आले. सुसाना मुलांना घेऊन जंगलात पळाली. एक दिवस पाय गेलेला कोरुगा ट्राइअनच्या कँपमध्ये दाखल झाला. नोरा कुठे हालवली गेली त्याचा पत्ता लागेना. कोरुगा निधन पावला. त्याच्या अंत्य विधीसाठी ट्राइअनला जाऊ देईनात. ट्राइअन अगदी बेचैन झाला. त्याने जोहानला सांगितले की, मी या स्थितीत जास्त टिकाव धरू शकणार नाही. नोरा वाचेल. ती कधी तुला भेटली तर तिला माझा चष्मा दे. माझ्याजवळ दुसरे काहीच उरले नाही. शेवटी एक दिवस ट्राइअनने फिरत फिरत जाणुनबुजून हद्द ओलांडली व पाहरेकऱ्याने त्याला गोळी घातली.

पुढे सर्व स्थिरस्थावर झाल्यावर जोहान सुटला व सुसानाबरोबर राहू लागला. पण सर्व प्रकारांनी तो हादरलेला होता. परत युद्ध सुरू झाले. नोरा एका अमेरिकन कचेरीत कामाला लागली. तिथला अधिकारी 'माझ्याशी लग्न कर' म्हणून सुचवू लागला. नोरा म्हणते "तू उमदा तरुण आहेस, पण स्वार्थी आहेस. तुझ्या मागे पुढे काही नाही. तुझे माझे जग निराळे आहे. माझ्या जगात प्रेमासाठी लोक जीव देत. माझ्यासारखी जगात बाई नाही असे तुला वाटते का ? तुला प्रेम ही चीज सिगारेटच्या धुरासारखी वाटते." युद्ध सुरू झाल्यावर स्वयंसैनिकांची रीघ लागली.

नोराने सांगितले की हे लोक अगतिक म्हणून हालअपेष्टा टाळण्यासाठी येताहेत. त्याचा भलता अर्थ घेऊ नका. एक दिवस जोहानच मुलासकट येऊन दाखल झाला व वय झाले तरी स्वयंसैनिक करावे अशी विनंती केली. नोराशी बोलताना ट्राइअनचा उल्लेख निघाला. तेव्हा नोराने ट्राइअनची पत्नी म्हणून स्वतःची ओळख दिली व जोहानने चष्मा काढून नोराला दिला. तिकडे जोहानकुटुंबाचा अमेरिकन लोकांनी प्रसिद्धीसाठी फोटो घेतला.

लेखकाने मानवी स्वभावाचे चित्रण उत्कृष्ट केले आहे. जोहानला श्रीमंत सासरा मिळाला म्हणून आनंदित झालेली त्याची आई सुसाना बापाच्या घरून पळून आली हे कळल्याबरोबर तिच्यावर तुटून पडते. डॅमियनपुढे जुर्गूचे प्रकरण आल्यावर तो विचार करीत बसतो की, जुर्गूचा खरा गुन्हा बायकोला मारणे किंवा घोड्यावर माणसापेक्षा जास्त प्रेम करणे हा नसून रानटीपणा हा आहे, पण रानटीपणा हा गुन्हा आहे असे कोठलाच कायदा म्हणत नाही. जोहानच्या बाबतीत हात घालण्यास प्रत्येक अधिकारी भितो. आम्हांला नोकरी टिकवणे आहे हे प्रत्येकाचे म्हणणे. अमेरिकन विचार व आचार फार विदारक तऱ्हेने दाखवले आहेत.

कादंबरीत जागोजागी सखोल विचार आढळतात. ट्राइअन फॉन्टानात येतो, तेव्हा त्याचा बाप व डॅमिअन हे हजर असतात. ट्राइअन आपल्या आगामी पुस्तकाबद्दल बापाला सांगतो, " माझ्या पुढल्या पुस्तकात खऱ्या गोष्टी येणार. त्याचे नायक सामान्य असतील पण त्यांचे अनुभव सर्व कादंबऱ्यांना मागे टाकतील. भविष्यकाळात काहीतरी भयप्रद गोष्टी होणार आहेत, असे मला वाटते. आताच प्रत्येकाला भीती वाटते. तिचे मूलभूत कारण मनुष्य यंत्राचा गुलाम होत चालला आहे हेच होय. हे गुलाम बहुसंख्य होणार. यंत्राचे गुण माणसात शिरले की, आपण मानवी मूल्यांना मकणार. त्यात माझ्या शोकपर्यवसायी कादंबरीचे मूळ आहे. भविष्यकाळात सर्व यांत्रिक होईल. यंत्रासारखी माणसे पकडली जातील, यंत्रासारखी त्यांना शिक्षा होईल व यांत्रिक रीतीने त्यांना ठार करण्यात येईल. करमणूकसुद्धा यांत्रिक होईल. एंजिनच्या पिस्टनला जेवढे व्यक्तिमत्त्व तेवढेच माणसाला उरेल. पळण्यास जगात कुठे जागा मिळणार नाही. पूर्वीच्या रानटी अवस्थेत घोड्याची किंमत माणसापेक्षा जास्त होती, पण आधुनिक शास्त्रप्रणीत रानटीपणात माणसाला तेवढीही किंमत असणार नाही." डॅमिअन हे ऐकून दचकला. " हे खरेच होणार का ?" असे त्याने विचारले. ट्राइअन म्हणाला, " हो, खरेच होणार ! ही घडामोड आपल्यासमोर उभीच आहे. आपण तीतून वाचणार नाही व माझे पुस्तकही पुरे होणार नाही. मी उगाच बडबडतो असे समजू नका. आता माणसाला वाटेल तेव्हा पकडता येईल, योजनांसाठी मजूर करता येईल व गुन्ह्याशिवाय तुरुंगात पाठवता येईल. यांत्रिक संस्कृती ऐषआरामाची साधने निर्माण करील, पण तिला प्रकाश दाखवता येणार नाही. तिच्यात प्रज्ञावंत लोक निर्माण होणार नाहीत आणि ज्या

संस्कृतीत प्रज्ञावंत लोक होत नाहीत, तिचा विनाश अटळ आहे. आइन्स्टीन एकदा म्हणाले, " खऱ्या शास्त्रप्रेमी प्रज्ञावंतांचा अभाव असलेल्या दोन पिढ्या गेल्या तरी शास्त्रीय संस्कृतीचा डोलारा कोसळेल. असा डोलारा कोसळल्यावर कदाचित प्रकाश दिसेल, पण तो पूर्वेकडून. पश्चिमेकडून नव्हे. तोपर्यंत आपण शिल्लक राहत नाही."

डॅमियनने विचारले, " पुस्तकाचे नाव काय ?"

" पंचविसावा तास. तो म्हणजे शेवटच्या घटकेनंतरचा तास. त्यानंतर प्रत्यक्ष परमेश्वर उतरला तरी काही आशा नाही. " ट्राइअनने उत्तर दिले.

## माणूस–एक वस्तू

नोरा व ट्राइअन, ट्राइअन व जोहान यांच्या संवादांतही गंभीर विचार उमटतात. तुमचे पुस्तक कोठपर्यंत आले असे नोरा विचारते, तेव्हा ट्राइअन सांगतो, " पूर्वी एकदा पाणबुडीत गेलो होतो. तेथे हवा संपू लागली अथवा दूषित झाली तर कळावे म्हणून ससे ठेवले होते. त्या सशांप्रमाणे वातावरण बिघडत असल्याचे मला कळत आहे. सरकार, राज्ययंत्र, नोकरशाही इत्यादी सर्वजण माणसांना गुदमरून टाकतील, पण हे कोणाला समजत नाही. माझ्या कादंबरीचा नायक जोहान होणार." नोरा व ट्राइअन पकडली जातात तेव्हा नोरा विचारते, " आपल्याविरुद्ध आहे तरी काय ?" ट्राइअन उत्तर देतो, " आपल्याविरुद्ध तसे काही नाही. शेवटाकडे चाल-लेल्या संस्कृतीची ही कथा आहे. त्यात माणूस हा माणूस नसतो. तू केवळ शत्रु-राष्ट्रातली एक वस्तू असून आकडेशास्त्राप्रमाणे तुझा रुमानिअन भाग पकडला गेला. माणूस ही केवळ कल्पना असून त्यात व्यक्तीला अस्तित्व नाही. हा दोष संस्कृतीचा. माणसाचा चक्काचूर करणाऱ्या रेल्वे एंजिनचा काय दोष ?" ट्राइअन एकदा जोहानला म्हणतो, " हल्ली पृथ्वीवर एक नवीन पशू उत्पन्न झाला आहे. त्याला नागरिक म्हणतात. हे पशू जंगलात राहत नसून कचेऱ्या बांधतात. पण त्यांचे क्रौर्य पशूपेक्षा जास्त असते. मनुष्य व यंत्र यांपासून निर्माण झालेल्या या जातीला हृदयाच्या जागी एक यंत्र असते. "

हंगेरीचे वृत्तपत्रप्रमुख काउंट बार्थोली हे ट्राइअन व कोरुगासारखे विचारी गृहस्थ. हंगेरीने जर्मनीची कामगारपुरवठ्याची मागणी जर्मनीचा रोष न ओढवता पुरी करता यावी म्हणून परदेशीय निर्वासितांना पाठवण्याचे ठरवले तेव्हा ते फार बेचैन झाले. त्यांनी आपला मुलगा ल्युसिअन याला विचारले, " तुला या प्रकाराबद्दल काय वाटते ?"

" ही फार मोठी मुत्सद्देगिरी झाली, असे मला वाटते. " ल्युसिअन म्हणाला.

" हा गुलामांचा व्यापार नाही काय ? या व्यापारात तुझ्या बापाचाही हातभार आहे. "

ल्युसिअन म्हणाला, " त्या लोकांच्या पायांत बेड्या थोड्याच होत्या !"

काउंट म्हणाले, " आधुनिक काळात बेड्यांची जरुरी नाही. बेड्यांचे काम

रेशनकार्ड, नाना तऱ्हेचे परवाने इत्यादी गोष्टी करतात. त्यांची गुलामगिरी बेड्यां-पेक्षा भयंकर आहे. तुला या प्रकाराबद्दल काहीच वाटत नाही, याचा अर्थ तुझा माणुसकीबद्दलचा आदरच नष्ट झाला."

ल्युसिअन म्हणाला, "मी माणसाकडे केवळ समाजाचा एक घटक म्हणून पाहतो व बाकीचेही लोक तसेच म्हणतात."

काउंट म्हणाले, "मग निकाल लागला. आपल्या संस्कृतीत ग्रीसपासून सौन्दर्य-प्रेम, रोमकडून कायद्याबद्दल आदर व ख्रिश्चन धर्मापासून मानवता प्रेम आले होते. या गोष्टी गेल्या तर संस्कृती संपली."

तेवढ्यात वाजले किती म्हणून ल्युसिअनने विचारले. काउंट गंभीरपणाने म्हणाले, "पंचविसावा तास सुरू झाला!"

कोरुगा हे या पुस्तकातले एक उदार गृहस्थ. कोणालाही मदत करावी एवढेच त्यांना ठाऊक. ते नेहमी विचार करीत. ते जोहानसाठी खटपट करीत असता गजबजलेल्या इमारती पाहून इलियटची वाक्ये आठवली. "शहरात आलेला पाहुणा विचारतो की, हे शहर म्हणजे काय आहे? तुम्ही इतक्या दाटीदाटीने राहता ते प्रेमामुळे का? काय उत्तर देणार? आम्ही एकमेकांपासून पैसे मिळवण्यासाठी एकत्र येतो व त्याला समाज म्हणतो."

कोरुगाचे मृत्युसमयीचे भाष्य अत्यंत अर्थपूर्ण आहे. तो सांगतो "मला अमेरिका पाहण्याची इच्छा होती, पण अमेरिकाच माझ्याकडे आली. लोकशाहीच्या नावाने आजची संस्कृती माणुसकी नष्ट करू पाहत आहे. जीवनाचा हेतू कळून घ्यावयाचा असेल तर धर्म, कला, काव्य यांकडे वळले पाहिजे. तेथे गणित, आकडेशास्त्र इत्यादी गोष्टी दुय्यम ठरतात. या गोष्टी गुलाम तयार करतील व त्यांच्या अश्रूंनी नद्या वाहतील. शेवटी परमेश्वराला माणसाची दया येईल व युगायुगात झाले त्याप्रमाणे तो अवतरून त्याचा उद्धार करील. तोपर्यंत काही मूठभर लोक शृंखलाबद्ध होऊन बुडाच्या चिखलात रुतणार नाहीत व पाण्यावर तरंगतील. त्यांच्यामुळे मानवजात वाचेल. मुक्ती ही वैयक्तिकच बाब राहील व ती सामुदायिक होणार नाही."

या ग्रंथाला सतरा वर्षे झाली, पण चित्र तसेच आहे. पहिल्या महायुद्धापेक्षा जास्त हत्या कोरियात झाली व आता दुसऱ्या छोट्या राष्ट्रांत मानवतेवर अत्याचार चालू आहेत. पूर्वेकडून प्रकाश दिसण्याची चिन्हेही मावळली. जगात प्रज्ञावंत लोक नाहीत असे नाही, पण त्यांची जात नष्ट होत चालली असून, आहेत त्यांचा प्रभाव पडत नाही. या निराशापूर्ण चित्रात गॅब्रिएल मार्सेल म्हणतात त्याप्रमाणे कोरुगाच्या शेवटच्या उद्गारात तेवढा आशेचा किरण दिसतो. मात्र तो आशेचा किरण दिसण्यापूर्वी प्रज्ञाविहीन मानवसृष्टीत शंकराचे तांडवनृत्य तर होणार नाहीना, अशी भीती मनात येते.

O

# लक्ष्मीबाई टिळक

**चंद्रकांत वर्तक**

ता. २९ डिसेंबर, १९६८.

स्थळ : सार्वजनिक वाचनालय, नाशिक, ह्यांचे प्रेक्षागृह.

प्रेक्षक साठसत्तरपेक्षा अधिक नाहीत.

हीही गर्दी पाहून उचंबळून येणाऱ्या आणि गर्दीवरच अभिनयाचा कमीअधिक, उच्चनीच दर्जा ठरण्याची सवय झालेल्या नटाला ह्या बऱ्याचशा रिकाम्या प्रेक्षागृहाने खचल्यासारखेच झाले असते.

त्याचे काम पडले असते. मूड गेला असता. लय बिघडली असती. सूर हरवला असता.

साहजिक आहे असे होणे. गर्दीची वाढती सवय झालेल्याला. गर्दीने न गुदमरणाऱ्याला.

सौ. कुसुम कुलकर्णी ह्याला अपवाद असाव्यात.

आणि जमलेले पन्नास-साठ प्रेक्षकही. मरणाएवढ्या थंडीला न जुमानता ते आलेले. प्रेक्षागृहाच्या रिकामेपणाने थंडी वाढून आलेली. आपोआपच, दातावर दात आपटताहेत पण तरीही जे सादर केले जाणार त्याकडे डोळ्यांत (आणि कानातही) प्राण आणून मनःपूर्वकतेने पाहणारे आणि ऐकणारे. त्यांनी जेथे दाद दिली ती अभिनयाची जागा ' खास उच्च '–किमान ' लक्ष्यणीय ' असणार अशी नटाने वा नटीने खात्री बाळगावी.

प्रेक्षकांच्या ह्या समजाची (समंजसपणाची) समज बाईंना चांगली असावी. म्हणून त्यांनीही मनःपूर्वकतेने हा साभिनय दर्शनाचा प्रयोग सादर केला.

बाईंचे एका बाबतीत अभिनंदन करावयाचे.

अशासाठी की कलावंत अष्टावधानी असावा लागतो. सौ. कुसुम कुलकर्णी ह्यांच्या नजरेत हा विषय भरला हे त्यांच्या अष्टावधानी दृष्टीचे (वृत्तीचे) लक्षणच. म्हणून अभिनंदन.

लक्ष्मीबाई टिळकांच्या साभिनय चरित्र दर्शनाचा हा कार्यक्रम म्हणजे निव्वळ

# एक साभिनय दर्शन

एकपात्री प्रयोग नव्हे की जो त्याचा एकसूरीपणा (एकाच पात्राने तऱ्हेतऱ्हेच्या पात्रांनुसार आवाजात वदल करून संवाद म्हणूनही) वगळला तर नाटकाच्या जवळ येऊन उभा राहतो. हा कार्यक्रम एक प्रकारचे मिश्रण होते. एकपात्री प्रयोगापेक्षादेखील त्याला हकीकत कथनाचे रूपच अधिक होते–फक्त हावभाव, आवाजातले चढउतार, कारुण्य, क्रोध, विनोद, थोडासा भाबडा गोष्टीवेल्हाळपणा ह्यांचा आश्रय करून ही हकीकत सांगितली गेली.

सौ. कुसुम कुलकर्णींनी ती तीन विभागांत सांगितली. पहिल्या विभागात तंगडी मोडायला निघालेला मुलगाच वधूपरीक्षेला आला व त्याच्याशी लग्न झाले येथपासून घारूमाईचे लग्न व पुन्हा नाशकाला भिकूताईकडे येथपर्यंत ह्या हकीकतीने वाटचाल केली. दुसऱ्या विभागात टिळकांचे ख्रिश्चन होणे, त्यांची बऱ्याच काळानंतर भेट येथपासून प्लेगच्या धामधुमीत बेबीला झालेल्या प्लेगशी लक्ष्मीबाईंनी सामना कसा दिला येथपर्यंत पोचून तिसऱ्या विभागात बालकवींची झालेली ओळख, एखाद्या माणसाने सापाने कात टाकावी त्याप्रमाणे वृत्तिवैशिष्ट्यांचा निरास करीत करीत संतपणाच्या अवस्थेत पोचावे–तसेच मनस्वी टिळकांच्या बाबतीत होऊन त्यांच्या मृत्यूला सामोरे जाण्याचा भाग आला आहे. येथे सौ. कुलकर्णींचा हा साभिनय हकीकतीचा प्रयोग संपतो.

तंत्र म्हणून ह्यात एक वैशिष्ट्य जाणवते. प्रत्येक भागाची अखेर पुढे काय ह्याची उत्सुकता वाढवणारी, पण त्याच वेळी विलक्षणपणे अस्वस्थ व विमनस्क करणारी, कारुण्याने परिपूर्ण, पर्यायाने लक्ष्मीबाईंच्या अवती भवतीच्या विषण्ण व भीषण परिस्थितीची तीव्र जाणीव करून देणारी अशी रचण्यात तंत्रकुशलतेचा प्रत्यय येतोच.

सौ. कुसुम कुलकर्णी ह्यांनी हे तीनही भाग विलक्षण प्रत्ययकारिकतेने सादर केले. सोंगट्या खेळायला येऊ नको म्हणून काठी घेऊन आलेला मुलगा आपला नवरा होणार ह्यातली अनपेक्षितता आणि घरात येऊ देणार नाही असे सांगणाऱ्या मुलाला

“सारे जग श्वास रोखून बसेल”

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

आपल्याला नेहमीसाठी घरात घ्यावी लागली, ह्यात एकाची कशी जिरली हे वजावताना व्यक्त होणारी बाल्यसुलभ निरागसता त्यांनी सुरेख व्यक्त केली—तर टिळक लक्ष्मीबाईंना शिकवत असताना उत्पन्न होणारा विनोद त्यांनी अप्रतिम रंगवला. भिकूताईंची श्रीमंती आणि आपली गरिबी ह्यांतला फरक त्यांनी नेमका दाखवला. दिवा घेऊन वऱ्हाडी मंडळींत लक्ष्मीबाईला शोधीत येणारी भिकूताई, लक्ष्मीबाईंनी केलेली घुसफूस आणि दुसऱ्या दिवशी भिकूताईंचेच अंगभर ल्यायलेले दागिने ह्यात बहिणी-बहिणींचे व्यक्त झालेले प्रेम प्रेक्षकांपर्यंत नीट पोचले.

टिळकांचे ख्रिश्चन होणे व लक्ष्मीबाईंची अगतिकता—ह्या अगतिकतेतही टिळकांवरचे त्यांचे प्रेम हे आले. आला नाही तो टिळकांचा मनस्वीपणा. 'स्मृतिचित्रां'तून उभे राहणारे टिळक मनस्वी आहेत, चंचल आहेत, बायकोची चिंता न करणारे आहेत, प्रगल्भ, समतेचे, न्यायाचे विचार बोलणारे टिळक पत्नीशी वागताना मात्र हे विचार विसरत—आडमुठ्या नवऱ्याची भूमिकाच (काही वेळा असंस्कृत भासावी इतकी!) पार पाडीत. लक्ष्मीबाईंना जिन्यावरून ढकलल्याचा प्रसंग ह्या हकीकतीत आला नाही हे खटकले—हा प्रसंग यायला हवा होता कारण, त्यात लक्ष्मीबाई आणि टिळक ह्यांची खरीखुरी व्यक्तिमत्त्वे अतिशय बोलकेपणी व्यक्त झालेली आहेत. सौ. कुसुम कुलकर्णींनी तो सांगितला असता तर ह्या प्रयोगाची उंची वाढली असती. दत्तूचे मामाकडे होत असलेले शिक्षण, त्याचे बैल, नांगर इ. मधून लक्ष्मीबाईंना वाटणारी ओशाळगत व्यवस्थित प्रकट झाली. अभिनयाचा कस लागला बेबीच्या प्लेगप्रसंगाच्या निवेदनात. रानात जाऊन येशूची केलेली प्रार्थना—त्या वेळची लक्ष्मीबाईंच्या मनात दाटून आलेली आर्तता आणि बेबी बरी झाल्यावरच्या आनंदातली निर्भयता सौ. कुलकर्ण्यांनी उत्कृष्टपणे आविष्कृत केली. पाणी पिण्याचा प्रसंग व बाप्तिस्मा घेण्याची झालेली प्रेरणा, चर्चमध्ये झालेले पहिलेच व्याख्यान हे प्रसंग, त्याचप्रमाणे बालकवी ठोंबऱ्यांबद्दलचा वात्सल्यभाव त्यांनी असाच उत्कटपणे रंगवला. टिळकांची संतपदाकडे कशी ओढ होत होती ह्याचे कथनही बऱ्यापैकी केले.

रंगमंचावरच्या सौ. कुसुम कुलकर्णी ह्यांच्या हालचाली मुक्त वाटल्या म्हणजे ज्याची भूमिका आपण वठवीत आहोत त्याचा काच करून न घेता त्यांनी ह्या हालचाली केल्या. ह्या अशा झाल्या हे बरेच झाले. कारण त्यामुळे लक्ष्मीबाईंच्या आयुष्यात ज्यांच्या ज्यांच्याशी संबंध आला, सहवास झाला त्या व्यक्तीदेखील सजीव झाल्या—प्रत्यक्ष स्टेजवर नसूनही. ह्या कार्यक्रमाचे हे एक लक्षणीय यश होय.

पण तरीही एक महत्त्वाची गोष्ट असायला हवी होती. लक्ष्मीबाईंचे टिळकांच्या निधनानंतरचे आयुष्य. त्यातले संघर्ष, दारुण अनुभव, उदा. :—जुहूला अकरा मुली बुडाल्यानंतर घोसळून निघालेले लक्ष्मीबाईंचे व्यक्तिमत्त्व—'स्मृतिचित्रे' लिहिताना लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वात आलेला संयम तरीही समृद्धी जाणवावी असा आलेला भाग—हे येते तर कलात्मकतेकडे कार्यक्रम अधिक पोचता. आहे ह्या स्वरूपातला

कार्यक्रम टिळक निधनापाशी संपतो हे मला वाटते प्रेक्षकांवर होणाऱ्या परिणामाचे गणित केल्यामुळेच. लक्ष्मीबाईंचे व्यक्तिमत्त्व नंतरही विकसित झाले, समृद्ध झाले—अगोदर त्या काहीशा दबावाखालीच होत्या—म्हणून पुढचा भाग हवा.

दुसरी गोष्ट—तीन भागांतला प्रवास म्हणजे नववधू ते वैधव्य असा आहे. त्या त्या भागानुरूप पोषाख करून सौ. कुलकर्णी रंगमंचावर आल्या तर परिणामकारकतेत भर पडेल. आज चित्रामध्ये जशा लक्ष्मीबाई दिसतात तसे सौ. कुलकर्णींनी यायला काय हरकत आहे? पाच वारी (सहा वारी) साडी (साऱ्या प्रयोगभर म्हणजे) अपेक्षाभंग करते.

तिसरी गोष्ट—लक्ष्मीबाईंचे बोलणे-चालणे हे काल्पनिक बसवलेले असावे लक्ष्मीबाईंना पाहिलेल्या, त्यांच्याशी बोललेल्या व्यक्ती कमी असल्या तरी असतीलच त्यांना विचारून व त्याचा विचार करून हे बोलणे-चालणे केले तर? साभिनयच करायचे तर कुठेतरी मूळाच्या जवळ जाऊन का करू नये?

चौथी गोष्ट—लक्ष्मीबाई टिळकांची जन्मशताब्दी खरी परंतु नव्या पिढीला 'ह्या कोण?' हीच भावना. (असू नये तरीही) हे कथन शाळा-कॉलेजांतून झाले तर लक्ष्मीबाई ह्या पिढीपर्यंत पोचतील. सौ. कुसुम कुलकर्णींनी हाही प्रयोग करायला हरकत नाही. कारण नाही तर ह्या कथनाला मर्यादा पडण्याचा संभव अधिक. असो

○


# पुरंदऱ्यांची दौलत

**ब. मो. पुरंदरे**

मूल्य साडेतीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

## हिमालयाहून प्राचीन गोष्टी

…… पण मला वाटते या देशातील प्रश्न कळावयाला आणि सोडवावयाला फार मोठ्या तत्त्वज्ञानाची जरुरी नाही. साधे व्यवहारज्ञान त्यासाठी पुरेसे आहे. स्वदेशी, स्वावलंबन, चोख प्रामाणिक कारभार, ज्ञानाबद्दलची तळमळ, ज्ञानवंतांबद्दलचा आदर, सर्वस्व ओतून समोरचे काम करण्याची वृत्ती या तर शेवटी हिमालयाहून प्राचीन गोष्टी आहेत. या साऱ्या गोष्टींचा कडवा आग्रह धरत असतानाच तुम्हांला आणखीही एक काम करावयाचे आहे. या देशाची प्राचीन परंपरा आणि सर्वश्रेष्ठ विज्ञान यांचा समन्वय तुम्हांला घालावयाचा आहे. तुम्हा तरुणांना मार्गदर्शन करतील असे माझ्यासमोर फारसे कोणी नाहीत. तुम्ही तरुणांनीच आता तडफेने आणि जिद्दीने पुढे आले पाहिजे. म्हणून अन्नस्वतंत्रता-संचलन, सोमनाथचे श्रममंदिर या गोष्टींनी मी आनंदित झालो होतो. पण हे प्रयत्न एकाकी आणि तुरळक ठरता कामा नयेत……"

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

आणखी एक विशेष लेख

माणूस

२६ जानेवारी अंक

मूल्य : ६० पैसे

भारतीय समाजघटना
निधर्मी
की
सर्वधर्मसमभावी ?

डॉ. वि. म. दांडेकर

गोखले अर्थशास्त्र आणि

राज्यशास्त्र संस्था, पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर